दैनिक

https://samarthrajyog.com/
E-Mail : dainiksamarthrajyogbeed@gmail.com

# समर्थ राजयोग

SAMARTH RAJYOG

वैभव विवेक स्वामी
सपादक

राजमान्य, राजशक्ती

No.LSB / Beed / RNP - 200 / 2024 - 2026.

बीडसह छत्रपती संभाजीनगर, जालना, परभणी, हिंगोली, नांदेड, लातूर, धाराशिव या जिल्ह्यातून एकाच वेळी प्रकाशित होणारे एकमेव मराठवाडा स्तरीय विभागीय दैनिक...



शुद्ध सोने ! अप्रतिम कलाकुसर !! विश्वासाची परंपरा !!!
प्रमाणित सुवर्ण अलंकाराचे AC दालन
दहिवाळ सुवर्णकार
नवीन पत्ता : डी.पी.रोड, सहयोगनगर, सारडा नगरी जवळ, बीड
☎: 0230377, मो. 8432771777
शाखा : माळीवेस, बीड
☎: 0220377, मो. 9405072777



बीड (महाराष्ट्र) दैनिक मराठी | वर्ष - ७ वे अंक -३१ | शुक्रवार दि.०९ ऑक्टोबर २०२६ | 98 22 62 85 21 | आरएनआय -एमएएचएमएआर/२०२०/७९८०१ | किंमत ३ रू | पाने ४

Beed | Daily Marathi | Year-7th | Issue- 31 | Friday, Dt.09 October 2026 | 98 22 62 85 21 | RNI - MAHMAR/2020/79801 | Price 3 Rs. | Pages 4


# दुष्काळ, पाऊस, पीक नुकसान, पिण्याचे पाणी, जनावरांच्या चाऱ्याबाबत राज्य शासनाकडून केंद्रीय पथकाकडे सविस्तर सादरीकरण

## केंद्रीय पथकाकडून महाराष्ट्रातील दुष्काळी परिस्थितीच्या पाहणीसाठी दौरा सुरू...

मुंबई ।प्रतिनिधी

खरीप हंगाम २०२६ मधील दुष्काळी परिस्थिती आणि पिकांच्या नुकसानीची प्रत्यक्ष पाहणी करण्यासाठी केंद्र सरकारचे आंतरमंत्रालयीन पथक महाराष्ट्राच्या दौऱ्यावर आले आहे. ८ ते ११ ऑक्टोबरदरम्यान होणाऱ्या या दौऱ्यात राज्यातील दुष्काळी परिस्थितीचा आढावा घेण्यात येणार असून, पाऊस, पीक नुकसान, पिण्याच्या पाण्याची उपलब्धता आणि जनावरांच्या चाऱ्याच्या स्थितीची प्रत्यक्ष पाहणी केली जाणार आहे.

केंद्राच्या कृषी व शेतकरी कल्याण मंत्रालयाचे संयुक्त सचिव मुक्तानंद अग्रवाल हे या पथकाचे प्रमुख आहेत. केंद्र शासनाच्या कृषी, जलसंपदा, ग्रामीण विकास, पाणीपुरवठा, अन्न व सार्वजनिक वितरण, पशुसंवर्धन, अर्थ विभाग, नीती आयोग आणि अन्य संबंधित विभागांतील प्रशासकीय आणि तांत्रिक अधिकाऱ्यांचा पथकात समावेश आहे.

राज्य सरकारकडून दुष्काळी स्थितीचे सविस्तर सादरीकरण..

केंद्रीय पथकाच्या मुंबईतील आगमनानंतर सह्याद्री अतिथीगृह येथे आज मुख्य सचिव राजेश अग्रवाल यांच्या प्रमुख उपस्थितीत बैठक झाली. मुख्य सचिव राजेश अग्रवाल यांनी यावेळी पावसाच्या कमतरतेमुळे महाराष्ट्रातील काही भागांत निर्माण झालेली पाणीटंचाई, टँकर्सची संभाव्य गरज, शेतीवर अवलंबून असलेले शेतमजूर व जमीनधारकांचे

पान २ वर...



### पिण्याच्या पाण्याच्या स्थितीचा आढावा..

राज्यातील पावसाचे प्रमाण कमी झाल्याने पिण्याच्या पाण्याच्या उपलब्धतेवर परिणाम झाला आहे. सध्या टँकरद्वारे सुरू असलेला पाणीपुरवठा, मागील तीन वर्षांच्या तुलनेतील पाण्याची स्थिती आणि टँकरद्वारे पाणीपुरवठा सुरू करण्यासाठी प्रस्तावित असलेल्या गावांची माहिती पाणीपुरवठा विभागाचे अपर मुख्य सचिव पराग जैन तसेच भूजल सर्वेक्षण व विकास आयुक्त रवींद्र खेबुडकर यांनी सादर केली. जलसंपदा विभागाचे प्रधान सचिव एकनाथ डवले, जलसंधारण विभागाचे सचिव जितेंद्र पापळकर, रोजगार हमी योजनेचे सचिव अप्पासाहेब धुळाज यांच्यासह ऊर्जा विभागाच्या वतीने सद्यस्थितीचा आढावा सादर करुन आगामी सात महिन्यातील संभाव्य परिस्थितीची माहिती दिली. यावेळी लघुपाटबंधारे तलाव (एमआय टँक), गावांमधील पाण्याचे स्रोत आणि त्यांची सद्यस्थिती याबाबतही केंद्रीय पथकाला माहिती देण्यात आली.

# जिल्ह्यातील पाणीटंचाई व स्वच्छता आढावा बैठक संपन्न

## पाण्याचा प्रत्येक थेंब जतन करा - जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन

बीड (जि मा का)

जिल्ह्यात आगामी काळात पाणीटंचाईचा सामना करण्यासाठी प्रशासनाने तयारी सुरू केली असून, जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांच्या अध्यक्षतेखाली आज जिल्हाधिकारी कार्यालय सभागृहात जिल्ह्यातील सर्व नगरपालिकांच्या मुख्याधिकाऱ्यांची महत्त्वाची आढावा बैठक पार पडली. या बैठकीत नगर प्रशासन अधिकारी संभाजी वाघमारे प्रामुख्याने उपस्थित होते. बैठकीत जिल्ह्यातील पाणीटंचाईची सद्यस्थिती, पिण्याच्या पाण्याचे योग्य नियोजन, तसेच शहरांमधील स्वच्छता आणि घनकचरा व्यवस्थापनाचा सविस्तर आढावा घेण्यात आला.



बैठकीत पाणीटंचाई निवारणासाठी तातडीने उपाययोजना राबवण्याबाबत जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी सूचना दिल्या. पाणीपुरवठ्यासाठी लागणाऱ्या निधीचा प्रस्ताव तातडीने जिल्हा नियोजन समितीकडे सादर करावा, जेणेकरून वेळेवर कामे मार्गी लावता येतील, असे त्यांनी स्पष्ट केले.

सध्याच्या सद्यस्थितीनुसार जिल्ह्यातील पाटोदा आणि आष्टी या दोन नगर परिषद क्षेत्रांमध्ये टँकरद्वारे पाणीपुरवठा सुरू करण्यात आला आहे. यामध्ये पाटोदा येथे १७ टँकर्सच्या माध्यमातून ३३ फेऱ्या सुरू असून याद्वारे १६,८०० लोकसंख्येची तहान भागवली जात आहे, तर आष्टी येथे २० टँकर्सच्या माध्यमातून ४० फेऱ्या सुरू असून याद्वारे २०,००० लोकसंख्येला पाणीपुरवठा केला जात आहे. अशाप्रकारे दोन नगरपरिषदांमध्ये एकूण ३७ टँकर्सच्या माध्यमातून ७४ फेऱ्या सुरू असून एकूण ३६,८०० नागरिकांना टँकरने पाणीपुरवठा होत आहे. तसेच याशिवाय जिल्ह्यात १ ठिकाणी विहीर/बोअरवेल अधिग्रहित करण्यात आली आहे.

टंचाईग्रस्त भागात पाण्याचा सुरळीत पुरवठा करण्यासाठी सार्वजनिक आणि खासगी बोअरवेल अधिग्रहित करण्यात याव्यात, अशी सूचनाही जिल्हाधिकाऱ्यांनी केली. या संपूर्ण मोहिमेत पोलीस, सिंचन, कृषी आणि महसूल या सर्व विभागानी परस्परांशी

पान २ वर...

# निवडणूक तयारीत सर्व यंत्रणांनी समन्वय ठेवावा - विभागीय आयुक्त जी. श्रीकांत

## नोडल अधिकाऱ्यांच्या बैठकीत निवडणूक तयारीचा आढावा

छत्रपती संभाजीनगर ।प्रतिनिधी

५-औरंगाबाद विभाग पदवीधर मतदारसंघाच्या निवडणुकीसाठी सर्व मतदान केंद्रांवर आवश्यक मनुष्यबळ उपलब्ध करून द्यावे. मतपेट्या व पोलीस बंदोबस्ताच्या वाहतुकीसाठी वापरण्यात येणाऱ्या वाहनांना जीपीएस यंत्रणा बसवून मुख्य नियंत्रण कक्षातून त्यांचे निरीक्षण करावे. मतदानापूर्वी पोलीस प्रशासन व संबंधित समितीची बैठक घेऊन कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी योग्य समन्वय ठेवून नियोजन करावे, अशा सूचना निवडणूक निर्णय अधिकारी तथा विभागीय आयुक्त जी. श्रीकांत यांनी दिल्या.

विभागीय आयुक्त श्रीकांत यांच्या अध्यक्षतेखाली नोडल अधिकाऱ्यांची बैठक झाली. यावेळी निवडणूक प्रक्रियेतील विविध बाबींचा आढावाप्रसंगी त्यांनी या सूचना दिल्या. यावेळी सहआयुक्त प्रताप काळे, मंजुषा मिसकर, रित्रा मेत्रेवार, देविदास टेकाळे,



खुशालसिंह परदेशी तसेच विविध कक्षांचे नोडल अधिकारी उपस्थित होते. तसेच आठही जिल्ह्यातील जिल्हाधिकारी दूरदृश्यप्रणालीद्वारे उपस्थित होते. जी.श्रीकांत म्हणाले, मतदान केंद्रांवरील मूलभूत सुविधांकडे विशेष लक्ष द्यावे. प्रत्येक केंद्रावर वीज, फर्निचर, पिण्याचे पाणी व उतारमार्ग यांसह आवश्यक सुविधा उपलब्ध असाव्यात. ऑक्टोबर महिन्यातील उष्णतेचा विचार करून आरोग्य सुविधांची व्यवस्था करावी. संवेदनशील व अतिसंवेदनशील मतदान केंद्रांवर सीसीटीव्हीची व्यवस्था करावी. सर्व मतदान केंद्रांवर छायाचित्रणाची व्यवस्था करण्याबाबतही आवश्यक कार्यवाही करावी.निवडणूक प्रक्रिया सुरळीत पार पाडण्यासाठी अधिकारी, मतदान केंद्राध्यक्ष व संबंधित कर्मचाऱ्यांना कार्यपद्धतीचे योग्य प्रशिक्षण द्यावे. ९, १६ व २२ ऑक्टोबर रोजी होणाऱ्या प्रशिक्षणात मतपेटी सीलबंद करणे, मतपत्रिकेची घडी घालणे व टपाली मतपत्रिकेच्या नमुना १२ बाबत प्रत्यक्ष प्रात्यक्षिके घ्यावीत. मतदान केंद्राध्यक्षांना निवडणूक प्रक्रियेबाबत तयार केलेले सादरीकरण दाखवावे. मतदान केंद्रे मोठ्या क्षेत्रात विखुरलेली असल्याने सूक्ष्म निरीक्षकांची नियुक्ती करून त्यांना ऑनलाइन प्रशिक्षण द्यावे.प्रत्येक जिल्ह्यात आचारसंहिता कक्ष स्थापन करून प्राप्त तक्रारींवर तातडीने कार्यवाही करावी. माध्यम प्रमाणीकरण व संनियंत्रण समिती, निवडणूक समन्वय कक्ष व उमेदवारांच्या निवडणूक खर्चासाठी लेखा कक्ष स्थापन करावेत. निवडणूक साहित्याची मागणी समन्वय कक्षामार्फत नोंदवावी. निवडणूक

पान २ वर...

# नटसम्राट नानांची आकस्मिक 'एक्झिट' धक्कादायक

### मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची ज्येष्ठ अभिनेते नाना पाटेकर यांना श्रद्धांजली

## अभिनय संवेदनशीलतेचा भारदस्त चेहरा काळाच्या पडद्याआड



मुंबई ।प्रतिनिधी

भारतीय चित्रपटसृष्टीचा अभिनय आणि संवेदनशीलतेचा भारदस्त चेहरा ज्येष्ठ अभिनेते नाना पाटेकर यांच्या निधनामुळे काळाच्या पडद्याआड गेला आहे. नटसम्राट नानांची अशी आकस्मिक एक्झिट धक्कादायक आहे, अशी शोकमग्न भावना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केली आहे. नाम फाऊंडेशनच्या माध्यमातून नाना पाटेकर यांनी घेतलेली भूमिका कलाक्षेत्रासह, अनेकांना सामाजिक बांधिलकीचा धडा घालून देणारी ठरली आहे. त्यांच्या निधनामुळे कला आणि सामाजिक क्षेत्राची मोठी हानी झाली आहे, असे नमूद करून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी ज्येष्ठ अभिनेते नाना पाटेकर यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण केली आहे.

शोकसंदेशात मुख्यमंत्री म्हणतात, स्नेही, मित्र म्हणून ज्येष्ठ अभिनेते नाना पाटेकर यांचे घट्ट ऋणानुबंध राहीले आहेत. भारतीय चित्रपट सृष्टीला नानांच्या रुपाने मराठी मातीतील रांगडा, पण तितकाच संवेदनशील असा अभिनेता मिळाला. नाना जितके पडद्यावर मोठे, तितकेच मनाने सुद्धा मोठे होते. मराठी आणि हिंदी चित्रपटसृष्टीला त्यांनी एक कालखंड दिला. त्यातून प्रामुख्याने एक राष्ट्रभक्त अशीच त्यांची प्रतिमा प्रेक्षकांना भावली. 'क्रांतिवीर' ते 'नटसम्राट' या त्यांच्या प्रवासात जो दमदार आणि कसदार अभिनयाचा पट त्यांनी उभा केला, त्याला तोड नाही. त्यामुळे अभिनेता म्हणून त्यांचे जाणे ही मोठी हानी आहे.

नाना जिथे जात तिथे आपल्या व्यक्तिमत्त्वाचा ठसा उमटवत. त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा, स्वभावाचा भारदस्तपणा वातावरण भारून टाकत. नानांचे अस्तित्व त्या परिसराला व्यापून टाकत असे. नाना सर्वांशीच हक्काने आणि वडिलकीच्या, मार्गदर्शकाच्या नात्यानं बोलत असत. त्यामध्ये आत-बाहेर असा भाव नसे. त्यामुळे त्यांच्याशी मनमोकळा संवाद साधता येत असे.



## 'पोलीस आपल्या बांधावर' उपक्रमातून शाळेच्या संरक्षक भिंतीचा वाद मिटला.!

बीड ।प्रतिनिधी

पोलीस केवळ कायद्याची अंमलबजावणी करणारेच नव्हे, तर समाजातील वाद सामंजस्याने मिटविणारे विश्वासाचे माध्यमही आहेत, याचा प्रत्यय नेकनूर पोलिसांच्या 'पोलीस आपल्या बांधावर' उपक्रमातून आला. पोलीस अधीक्षक नवनीत काँवत यांच्या संकल्पनेतून राबविण्यात येणाऱ्या या उपक्रमांतर्गत सावंतवाडी येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेच्या संरक्षक भिंतीचा वाद प्रत्यक्ष जागेवर जाऊन सामंजस्याने मिटविण्यात आला.

सावंतवाडी येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेला संरक्षक भिंत नसल्याने रात्रीच्या वेळी काही व्यक्ती शाळेच्या आवारात मद्यपान करून परिसर अस्वच्छ करीत होत्या. याचा विद्यार्थी व शिक्षकांना त्रास होत असल्याने ग्रामस्थांनी लोकवर्गणीतून संरक्षक भिंत उभारण्याचा निर्णय घेतला होता. मात्र, लगतच्या काही नागरिकांनी बांधकाम आपल्या जागेत येत असल्याचा आक्षेप घेतल्याने कामात अडथळा निर्माण झाला होता.

याबाबत शाळा प्रशासन व लोकप्रतिनिधींकडून

पान २ वर...

# अखेर वडगाव ढोक जिल्हा परिषदेची विठ्ठल मंदिरात भरणारी शाळा पुन्हा हक्काच्या इमारतीत भरली..!

## तहसीलदारांच्या आदेशाने महसूल व पोलिस बंदोबस्तात तारेचे कुंपण हटवुन शाळेचा रस्ता खुला,पालकांचा सुटकेचा निःश्वास - डॉ. गणेश ढवळे

बीड ।प्रतिनिधी

गेवराई तालुक्यातील वडगाव ढोक येथील जिल्हा परिषद शाळेचा वहिवाटीचा रस्ता दोन शेतकऱ्यांनी तारेचे कुंपण उभारून बंद केल्याने गेल्या चार दिवसांपासून तब्बल १३० विद्यार्थ्यांना गावातील विठ्ठल-रुक्मिणी मंदिरात वर्ग भरवून शिक्षण घ्यावे लागत होते. अखेर तहसील प्रशासनाने दखल घेत तहसीलदारांच्या आदेशाने महसूल व पोलिस बंदोबस्तात तारेचे कुंपण हटवून शाळेचा रस्ता खुला केला. त्यामुळे विद्यार्थ्यांचे वर्ग पुन्हा त्यांच्या हक्काच्या शाळेच्या इमारतीत सुरू झाले असून पालकांनी सुटकेचा निःश्वास सोडला आहे.




संबंधित प्रकरणी सरपंच आशाबाई ढाकणे व सचिन ढाकणे यांनी तहसील कार्यालयात शाळा भरविण्याचा इशारा दिला होता. सामाजिक कार्यकर्ते डॉ. गणेश ढवळे लिंबागणेशकर यांनी जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी जितिन रहेमान आणि शिक्षणाधिकारी जयश्री चव्हाण यांना लेखी निवेदन देऊन विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक हितासाठी तातडीने शाळेचा रस्ता खुला करण्याची मागणी केली होती.दि. ५ रोजी उपविभागीय अधिकारी शुभम पवार व तहसीलदार गितांजली गरड यांनी घटनास्थळी प्रत्यक्ष पाहणी करून संबंधित शेतकऱ्यांना रस्ता खुला करण्याच्या सूचना दिल्या होत्या. मात्र, त्यानंतरही रस्ता खुला न झाल्याने प्रशासनाने अखेर कठोर भूमिका घेतली.दि. ७ रोजी दुपारनंतर तहसीलदार गितांजली गरड यांच्या आदेशानुसार पोलिस बंदोबस्तात तारेचे कुंपण हटवून शाळेचा रस्ता मोकळा करण्यात आला. यावेळी गेवराई पोलिस ठाण्याचे पोलिस उपनिरीक्षक आप्पासाहेब रोकडे, पोलिस हवालदार राठोड, राऊत, बारगजे, महिला पोलिस अंमलदार शेळके व निगुळे तसेच महसूल प्रशासनाचे मंडळ अधिकारी जे. एस. लेंडाळ, ग्राममहसूल अधिकारी लक्ष्मण ईटनकर, ग्रामविकास

पान २ वर...

## संपादकीय....

# नाना गेले पण ‘नाना’ नावाचा आवाज कायम घुमत राहील..!

बीड - महाराष्ट्राच्या मातीतला अस्सल कलावंत काळाच्या पडद्याआड गेले आहेत. अभिनय, माणुसकी आणि परखडपणाची समृद्ध परंपरा मागे ठेवून नाना पाटेकर यांना भावपूर्ण श्रद्धांजली

नाना पाटेकर हे नाव उच्चारले की डोळ्यांसमोर येतो तो एक वेगळाच चेहरा भारदस्त आवाज, डोळ्यांतली आग, संवादफेकीतील धार आणि अभिनयातून थेट काळजाला भिडणारा एक अस्सल कलाकार. आज तो आवाज कायमचा शांत झाला आहे. ज्येष्ठ अभिनेते नाना पाटेकर यांचे ७५ व्या वर्षी गोव्यात निधन झाले. त्यांच्या निधनाने मराठी रंगभूमी, मराठी चित्रपटसृष्टी आणि भारतीय सिनेसृष्टीने एका विलक्षण प्रतिभावंताला गमावले आहे.

नाना पाटेकर केवळ अभिनेता नव्हते ते अभिनयाची स्वतंत्र शाळा होते. रंगभूमीपासून सुरू झालेला त्यांचा प्रवास हिंदी आणि मराठी चित्रपटांपर्यंत पोहोचला आणि प्रत्येक माध्यमावर त्यांनी स्वतःची वेगळी छाप निर्माण केली. परिंदा, क्रांतिवीर, प्रहार, तिरंगा, अब तक छप्पन, वेलकम यांसारख्या हिंदी चित्रपटांपासून नटसम्राट, आपला माणूस अशा मराठी कलाकृतींपर्यंत त्यांनी साकारलेल्या भूमिका आजही प्रेक्षकांच्या स्मरणात जिवंत आहेत.

नानांचा अभिनय हा केवळ संवाद बोलण्यापुरता कधीच नव्हता. त्यांच्या डोळ्यांतून संवाद व्हायचा आणि त्यांच्या शांततेतही अनेकदा शब्दांपेक्षा अधिक अर्थ दडलेला असायचा. त्यांच्या आवाजातील चढ-उतार, संवादातील नैसर्गिकपणा आणि पात्राच्या भावविश्वात पूर्णपणे शिरण्याची त्यांची क्षमता त्यांना इतरांपेक्षा वेगळे ठरवत होती. तीन राष्ट्रीय चित्रपट पुरस्कार आणि पद्मश्रीसारख्या सन्मानांनी त्यांच्या कलेची राष्ट्रीय पातळीवर दखल घेतली.

मात्र नानांचे मोठेपण केवळ पुरस्कारांच्या यादीत मावणारे नव्हते. रुपेरी पडद्यावरचा हा ‘नायक’ प्रत्यक्ष जीवनातही समाजाच्या वेदनेशी जोडलेला होता. मकरंद अनासपुरे यांच्या साथीने ‘नाम फाउंडेशन’च्या माध्यमातून शेतकरी, दुष्काळग्रस्त कुटुंबे आणि जलसंधारणाच्या कामासाठी त्यांनी योगदान दिले. प्रसिद्धीच्या झोतात राहूनही समाजातील सामान्य माणसाच्या प्रश्नांशी नाते जोडण्याचा त्यांचा प्रयत्न त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा महत्त्वाचा पैलू होता.

त्यांच्या व्यक्तिमत्त्वातील आणखी एक गोष्ट महाराष्ट्राला कायम आठवत राहील त्यांचा स्पष्टवक्तेपणा. सत्तेच्या जवळ असतानाही सत्तेला प्रश्न विचारण्याचे धैर्य आणि चुकीच्या गोष्टींवर आपले मत स्पष्टपणे मांडण्याची वृत्ती त्यांनी जपली. लोकप्रियता मिळवण्यासाठी स्वतःला बदलण्यापेक्षा स्वतःच्या भूमिकेशी प्रामाणिक राहण्याचा त्यांचा स्वभाव होता.

आज नाना नाहीत, पण त्यांनी साकारलेली पात्रे आहेत. त्यांचा आवाज आहे. त्यांचे संवाद आहेत. त्यांच्या अभिनयातील अस्वस्थ करणारी तीव्रता आहे. आणि सर्वांत महत्त्वाचे म्हणजे ‘कलाकार असणे म्हणजे केवळ प्रसिद्ध असणे नव्हे, तर समाजाशी जोडलेले असणे’ हा संदेश त्यांच्या आयुष्याने दिला आहे.

महाराष्ट्राच्या मातीत जन्मलेला हा कलावंत देशाच्या कलाक्षेत्रात आपल्या कर्तृत्वाने अढळ स्थान निर्माण करून गेला. त्यांचे जाणे ही केवळ एका अभिनेत्याची उणीव नाही ती एका अस्सल कलावंताची, एका परखड आवाजाची आणि एका संवेदनशील माणसाची उणीव आहे.नानांच्या जाण्याने पडदा पडला आहे.पण त्यांच्या अभिनयाचा आवाज कधीच थांबणार नाही.अस्सल मातीतल्या या महान महाराष्ट्रीयन कलाकाराला ‘दैनिक समर्थ राजयोग’ परिवाराची भावपूर्ण श्रद्धांजली..!नाना, आज तुम्ही आमच्यात नाहीत मात्र तुमचा आवाज कायम घुमत राहील!

# संवेदनशील मनाचा ‘नटसम्राट’ हरपला - ना. पंकजाताई मुंडे

मुंबई ।प्रतिनिधी

चित्रपट सृष्टीतील हरहुन्नरी अभिनेता नाना पाटेकर यांच्या निधनाने संवेदनशील मनाचा नटसम्राट हरपला आहे अशा शब्दांत राज्याच्या पर्यावरण व पशुसंवर्धन मंत्री ना.पंकजाताई मुंडे यांनी आपल्या शोकभावना व्यक्त करत नानांना भावपूर्ण श्रध्दांजली अर्पण केली.प्रसिध्द अभिनेते नाना पाटेकर यांचे दुःखद निधन मनाला चटका लावून गेले.आपल्या दमदार अभिनयाने चित्रपट सृष्टीत त्यांनी एक वेगळी ओळख निर्माण केली होती. केवळ अभिनय क्षेत्रातच नव्हे तर सामाजिक क्षेत्रातही नाना अग्रेसर होते. नाम फाऊंडेशनच्या माध्यमातून जलसंवर्धनाची मोठी चळवळ उभा करून त्यांनी योगदान दिले. आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांच्या कुटुंबियाच्या मदतीला धावून जाणारा या संवेदनशील मनाच्या व्यक्तिमत्वाला माझी भावपूर्ण श्रद्धांजली अशा शब्दांत ना. पंकजाताईंनी आपल्या भावना व्यक्त केल्या.

पान १ वरून..

**जिल्ह्यातील ....**

समन्वय साधून संयुक्तरीत्या काम करावे, अशा सूचना त्यांनी दिल्या.

या बैठकीदरम्यान जिल्हाधिकाऱ्यांनी जिल्ह्यातील सर्वसामान्य नागरिकांना आवाहन केले आहे. ज्या दिवशी आपल्या भागात नळाद्वारे पाणीपुरवठा केला जातो, त्या पाण्याचा पुरेपूर वापर करावा, पाणी वाया जाऊ देऊ नका आणि पाण्याचा एक-एक थेंब जतन करा, असे आवाहन त्यांनी केले. तसेच, शहरांमध्ये आर.ओ. (ठज) आणि फिल्टर वॉटर वितरित करणाऱ्या व्यावसायिक वॉटर सप्लायर्सनाही सूचना देण्यात आल्या आहेत. फिल्टर प्रक्रियेनंतर वाया जाणारे सांडपाणी (वेस्ट वॉटर) तसेच इतर सांडपाणी फेकून न देता, त्याचा योग्य पर्यायी वापर कसा होईल यासाठी संबंधित यंत्रणांनी व सप्लायर्सनी उपाययोजना कराव्या, असे सांगण्यात आले.

जिल्ह्यातील उपलब्ध सर्व जलसाठे आता केवळ पिण्यासाठीच आरक्षित करण्यात आले असून, पाण्याचा इतरत्र होणारा दुरुपयोग टाळावा, ही काळाची गरज आहे आणि यासाठी नागरिकांनीही आपली समजूतदारी दाखवावी, अशी अपेक्षा जिल्हाधिकाऱ्यांनी व्यक्त केली.

पाणीटंचाईच्या मुद्यासोबतच बैठकीत शहरांमधील स्वच्छता आणि घनकचरा व्यवस्थापनावरही चर्चा झाली. घनकचऱ्याची शास्त्रीय पद्धतीने विल्हेवाट लावण्यासाठी सर्व नगरपालिकांच्या मुख्याधिकाऱ्यांनी मोहीम राबवावी आणि स्वच्छतेबाबत योग्य ती काळजी घ्यावी, असे सांगत जिल्हाधिकाऱ्यांनी सर्व मुख्याधिकाऱ्यांना आवश्यक त्या सूचना दिल्या.

**दुष्काळ, पाऊस, पीक ....**

प्रश्न, मजुरांची स्थलांतराची शक्यता आणि शेतकरी आत्महत्या या बाबींकडे केंद्रीय पथकाचे लक्ष वेधले.

राज्याच्या मदत व पुनर्वसन विभागाच्या वतीने अपर मुख्य सचिव विनिता वेद-सिंगल यांनी राज्यातील पावसाची स्थिती, अल निनोमुळे हवामान आणि पावसावर झालेले परिणाम तसेच शेतीपिकांच्या नुकसानीची सविस्तर आणि तांत्रिक माहिती दिली. पिण्याच्या पाण्याच्या उपलब्धतेबाबतही सविस्तर आढावा सादर करण्यात आला.

कृषी विभागाच्या वतीने सचिव परिमल सिंह आणि आयुक्त सुरज मांढरे यांनी राज्यातील पिकांच्या नुकसानीची आणि जिल्हानिहाय परिस्थितीची वस्तुनिष्ठ माहिती केंद्रीय पथकासमोर मांडली. पशुसंवर्धन विभागाच्या वतीने आयुक्त डॉ.किरण पाटील यांनी जनावरांच्या चाऱ्याची सद्यस्थिती तसेच आगामी सात महिन्यांसाठीच्या संभाव्य परिस्थितीची माहिती दिली.

प्रत्यक्ष पाहणीसाठी जिल्हे आणि ठिकाणे निश्चित..

राज्य सरकारने सादर केलेली आकडेवारी, उपलब्ध पुरावे आणि विविध विभागांकडून मिळालेल्या माहितीची केंद्रीय पथकाने दखल घेतली. या माहितीच्या आधारे दुष्काळी परिस्थितीची प्रत्यक्ष पाहणी करण्यासाठी कोणत्या जिल्ह्यांना आणि ठिकाणांना भेटी द्यायच्या, याबाबत नियोजन करण्यात आले.

केंद्रीय पथकातील अधिकारी राज्यातील विविध भागांत जाऊन दुष्काळी परिस्थिती, पिकांचे नुकसान आणि पाणीटंचाईची प्रत्यक्ष पाहणी करणार आहेत. यासाठी विविध पथके तयार करुन जास्तीत जास्त क्षेत्राचा आढावा घेण्याचे नियोजन करण्यात आले आहे. या पाहणीदरम्यान स्थानिक अधिकारी, तज्ज्ञ आणि राज्य शासनाचे संबंधित अधिकारीही उपस्थित राहणार आहेत.

प्रत्यक्ष पाहणी पूर्ण केल्यानंतर केंद्रीय पथक मुंबईत परतणार असून ११ ऑक्टोबर रोजी दुष्काळी परिस्थितीबाबत पुढील सविस्तर चर्चा करणार आहे. या दौऱ्याच्या माध्यमातून राज्यातील दुष्काळाची वस्तुस्थिती, शेतीपिकांचे नुकसान, पाणीटंचाई आणि आवश्यक उपाययोजनांची माहिती केंद्र सरकारसमोर मांडली जाणार असल्याचे यावेळी सांगण्यात आले.

या बैठकीस महसूल विभागाचे अपर मुख्य सचिव विकास खारगे, ग्रामविकास विभागाचे सचिव डॉ.चंद्रकांत पुलकुंडवार, पर्यावरण विभागाच्या सचिव जयश्री भोज यांच्यासह केंद्रीय पथकातील सदस्य आणि राज्यातील संबंधित विभागांचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

**‘पोलीस आपल्या बांधावर’ ....**

तक्रार प्राप्त होताच नेकनूर पोलिसांनी ‘पोलीस आपल्या बांधावर’ उपक्रमांतर्गत थेट घटनास्थळी भेट दिली. दोन्ही बाजूंचे म्हणणे ऐकून घेत शाळा व लगतच्या जागाधारकांच्या कागदपत्रांची पाहणी केली. प्रत्यक्ष जागेची मोजणी करून उपलब्ध कागदपत्रानुसार संरक्षक भिंतीचे बांधकाम शाळेच्याच जागेत होत असल्याचे संबंधितांना समजावून सांगितले.

पोलिसांच्या संयमी संवादामुळे नागरिकांचे जागेवरच समाधान झाले. ‘शाळेच्या संरक्षक भिंतीच्या बांधकामास आमची कोणतीही हरकत नाही,’ अशी भूमिका त्यांनी घेतल्याने बांधकामाचा मार्ग मोकळा झाला.

मुलांच्या सुरक्षिततेसाठी उभारली जाणारी भिंत माणसांच्या मनात भिंत निर्माण करणारी ठरू नये, हा संदेश देत नेकनूर पोलिसांनी गावातील शांतता व सामाजिक सलोखा जपण्याचे आवाहन केले.गावपातळीवरील वाद विकोपाला जाण्यापूर्वी नागरिकांच्या बांधावर पोहोचून संवाद व सामंजस्यातून प्रश्न सोडविण्याचा ‘पोलीस आपल्या बांधावर’ हा उपक्रम प्रभावी ठरत आहे.वाद मिटवू संवादाने... गाव जोडू विश्वासाने.!

मंगेश साळवे प्रभारी अधिकारी
नेकनूर पोलीस स्टेशन

**निवडणूक तयारीत....**

कर्तव्यावरील कर्मचाऱ्यांची अंतिम यादी १६ ऑक्टोबरपर्यंत तयार करून टपाली मतदानासाठी आवश्यक पाकिटांची उपलब्धता सुनिश्चित करावी. टपाली मतपत्रिकांची छपाई व वाटपाचे नियोजन वेळेत पूर्ण करावे.नांदेड, परभणी, धाराशिव, लातूर, बीड व जालना जिल्ह्यांनी मतदान केंद्रांच्या संख्येनुसार वाहनांचे सूक्ष्म नियोजन करावे. मतदान व मतमोजणीसाठी आवश्यक वाहने सुस्थितीत ठेवून पर्यायी वाहनांची व्यवस्था तयार ठेवावी. मतमोजणीसाठी उपजिल्हाधिकारी व तहसीलदार दर्जाच्या सुमारे ३०० अधिकाऱ्यांची नियुक्ती करण्यात येणार असून, निवडणूक कालावधीत त्यांना रजा देऊ नये. १५ ऑक्टोबर रोजी मतदान साहित्य, मतपेट्या, वाहतूक व सुरक्षा व्यवस्थेचा पुन्हा आढावा घेण्यात येणार आहे. सर्व जिल्ह्यांनी पोलीस प्रशासनाशी समन्वय ठेवून कायदा व सुव्यवस्थेचे काटेकोर नियोजन करावे, अशा सूचनाही त्यांनी दिल्या.मतदान केंद्रांची संख्या, मनुष्यबळ, वाहतूक, सुरक्षा, प्रशिक्षण, मतदान साहित्य, टपाली मतदान व मतमोजणीच्या तयारीबाबत संबंधित अधिकाऱ्यांकडून माहिती घेण्यात आली. विविध जिल्ह्यांतील निवडणूक तयारीतील त्रुटी तातडीने दूर करण्याच्या सूचना देण्यात आल्या.

**अखेर वडगाव ढोक ....**

अधिकारी नागरगोजे, सरपंच आशाबाई ढाकणे, सचिन ढाकणे व पालक उपस्थित होते.

विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक सुविधांकडे जिल्हा प्रशासनाने गांभीर्याने लक्ष देणे आवश्यक असून भविष्यात शाळेच्या मूलभूत सुविधांवर अशा प्रकारे अडथळे निर्माण होणार नाहीत, याची दक्षता घेण्यात यावी, अशी मागणी डॉ. गणेश ढवळे लिंबागणेशकर यांनी केली.

३ दिवस मंदिरात वर्ग..!

शाळेचा रस्ता बंद झाल्यामुळे १३० विद्यार्थ्यांना ३ दिवस विठ्ठल-रुक्मिणी मंदिरात वर्ग भरवून शिक्षण घ्यावे लागले. शाळेची इमारत असूनही रस्ता बंद असल्याने विद्यार्थ्यांना मंदिराचा आधार घ्यावा लागला.

प्रशासनाच्या पाहणीनंतरही प्रश्न कायम

दि. ५ रोजी उपविभागीय अधिकारी व तहसीलदारांनी घटनास्थळी पाहणी करून रस्ता खुला करण्याच्या सूचना दिल्या होत्या. मात्र, त्यानंतरही रस्ता खुला न झाल्याने पालकांमध्ये नाराजी होती.

निवेदन अन् पाठपुराव्यानंतर अखेर कारवाई..

तहसील कार्यालयात शाळा भरविण्याचा इशारा, जिल्हा प्रशासनाला देण्यात आलेले लेखी निवेदन आणि प्रसारमाध्यमांनी प्रश्न लावून धरल्यानंतर अखेर प्रशासनाने पोलिस बंदोबस्तात रस्ता खुला केला.

## खंडेश्वरी देवी यात्रा महोत्सवासाठी बीडमध्ये

# विशेष एसटी बससेवा सुरू करा - नितेश उपाध्ये

बीड । प्रतिनिधी

बीड शहरातील प्रसिद्ध श्री खंडेश्वरी देवी यात्रा महोत्सवाच्या पार्श्वभूमीवर भाविकांच्या सोयीसाठी बीड शहरात विशेष एसटी बससेवा सुरू करावी, अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते पत्रकार नितेश उपाध्ये यांनी जिल्हाधिकाऱ्यांकडे निवेदनाद्वारे केली आहे.



खंडेश्वरी देवी यात्रा महोत्सव हा बीड शहरातील मोठा धार्मिक उत्सव असून, या काळात बीड शहरासह जिल्ह्यातील विविध तालुक्यांमधून मोठ्या संख्येने भाविक शहरात दाखल होत असतात. त्यामुळे यात्रा काळात शहरातील वाहतुकीवर मोठा ताण निर्माण होण्याची शक्यता आहे. ग्रामीण भागातून येणाऱ्या भाविकांना शहरातील विविध ठिकाणी तसेच खंडेश्वरी देवी मंदिर परिसरात जाण्यासाठी सार्वजनिक वाहतूक व्यवस्था अपुरी पडू शकते.या पार्श्वभूमीवर बीड बसस्थानक, रेल्वे स्टेशन आणि खंडेश्वरी देवी मंदिर परिसराला जोडणाऱ्या विशेष एसटी बसफेऱ्या सुरू करण्याची मागणी करण्यात आली आहे.यात्रे दरम्यान महिला, ज्येष्ठ नागरिक, लहान मुले तसेच ग्रामीण भागातून येणाऱ्या भाविकांची गैरसोय होऊ नये, यासाठी संबंधित परिवहन अधिकाऱ्यांना आवश्यक सूचना देऊन विशेष एसटी बससेवा तातडीने सुरू करावी, अशी विनंती नितेश उपाध्ये यांनी जिल्हाधिकाऱ्यांकडे केली आहे.

या मार्गांवर विशेष बससेवा सुरू करा..रेल्वे स्टेशन ते धानोरा रोड मार्गे नगर नाका, बीड बसस्थानक, मांठा रोड ते एमआयडीसी, खंडेश्वरी.रेल्वे स्टेशन ते पंचशील नगर, नवनाथ कॉलेज, शिवराज चौक, बार्शी नाका ते तेलगाव नाका, नाळवंडी रोड, खंडेश्वरी. याशिवाय बीड बसस्थानक आणि रेल्वे स्टेशन येथून खंडेश्वरी देवी मंदिरासाठी स्वतंत्र विशेष बसफेऱ्या ठेवाव्यात, अशीही मागणी निवेदनातून करण्यात आली आहे.

## ज्येष्ठ अभिनेते नाना पाटेकर यांच्या निधनाने

# भारतीय कलाविश्व आणि समाजकारणाची मोठी हानी - उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार

मुंबई ।प्रतिनिधी

भारतीय चित्रपटसृष्टी आणि रंगभूमीवर आपल्या अजोड, दमदार अभिनयाचा ठसा उमटवणारे ज्येष्ठ अभिनेते नाना पाटेकर यांच्या निधनाची बातमी अत्यंत दुःखद आणि मनाला चटका लावणारी आहे. त्यांच्या जाण्याने मराठी तसेच भारतीय कलाविश्वाने एक हरहुन्नरी आणि संवेदनशील कलाकार गमावला आहे, अशा शब्दांत उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार यांनी त्यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण केली.



आपल्या शोकसंदेशात उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार म्हणाल्या, नाना पाटेकर हे केवळ एक उत्कृष्ट अभिनेते नव्हते, तर अभिनयाचा अस्सल आविष्कार आणि संवेदनशील सामाजिक जाणिवांचा सुंदर संगम त्यांच्या व्यक्तिमत्त्वात होता. रंगभूमीपासून रुपेरी पडद्यापर्यंत आपल्या सहज आणि प्रभावी अभिनयाने त्यांनी अनेक व्यक्तिरेखा अजरामर केल्या. 'नटसम्राट', 'क्रांतिवीर', 'परिंदा' यांसारख्या कलाकृतींमधून त्यांनी भारतीय चित्रपटसृष्टीवर उमटवलेली अमीट छाप रसिकप्रेक्षकांच्या मनात सदैव कायम राहील.नाना पाटेकर आणि पवार कुटुंबातील आपुलकीच्या संबंधांचा उल्लेख करताना त्या भावूक झाल्या. नानांचे आदरणीय अजितदादांशी अतिशय जिव्हाळ्याचे, आपुलकीचे आणि स्नेहाचे संबंध होते. कौटुंबिक सुख-दुःखाच्या प्रत्येक प्रसंगात ते नेहमी पाठीशी उभे राहिले. त्यामुळे त्यांच्या निधनाने निर्माण झालेली पोकळी ही माझ्यासाठी आणि आमच्या संपूर्ण कुटुंबासाठी अत्यंत वैयक्तिक आणि विशेष दुःखद आहे, असे त्या म्हणाल्या.

अभिनयातील यशाच्या शिखरावर असतानाही नानांनी आपल्या सामाजिक बांधिलकीचे भान कधीही सुटू दिले नाही. 'नाम फाउंडेशन'च्या माध्यमातून त्यांनी समाजातील वंचित घटक, दुष्काळग्रस्त आणि शेतकरी बांधवांसाठी केलेले कार्य सदैव प्रेरणादायी राहील.कलेचा आणि सामाजिक सेवेचा ध्यास घेतलेल्या या अष्टपैलू, संवेदनशील कलाकाराला भावपूर्ण श्रद्धांजली,अशा शब्दांत सुनेत्रा पवार यांनी त्यांना श्रद्धांजली वाहिली.

**जाहिर प्रगटण**

**मा. श्री. रविंद्र अ. मिसाळ, न्यायदंडाधिकारी प्र. वर्ग, न्यायालय क्र. १, गेवराई, जि. बीड यांच्या न्यायालयात**

**कि. फौ. अर्ज क्रमांक ४३७ / २०२६**

**कैलास नामदेव डाके वि. मा. ग्रामविकास अधिकारी, ग्रामपंचायत कार्यालय, आमला**

**(मार्फत ॲड. बी. ई. खरात)**

ज्याअर्थी अर्जदार नामे कैलास पि. नामदेव डाके, रा. आमला, ता. गेवराई यांनी गैरअर्जदार ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय, आमला ता. गेवराई, जि. बीड यांचे विरुध्द जन्म मृत्यु नोंदणी अधिनियम १९६९ चे कलम १३ (३) प्रमाणे अर्जदाराचा मुलगा नामे रवि पि. कैलास डाके याचा मृत्यू दिनांक ३०/०८/२०२० रोजी मौजे आमला येथे झाल्याबाबतची नोंद घेणेबाबत असा अर्ज या न्यायालयात सादर केला आहे व त्याबाबत गैरअर्जदारास नोटीस जाहिर प्रगटनाव्दारे बजावणी व्हावी असा अर्ज या न्यायालयात दाखल केला आहे.

त्यापेक्षा सदर अर्जावर गैरअर्जदारास किंवा इतर कोणास काही म्हणणे असेल तर हया घोषणेच्या दिनांकापासुन तीस दिवसाच्या आत त्याने हया न्यायालयात हजर होउन आपली हरकती कळवावी आणि हया लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत गैरअर्जदाराने योग्य हरकती न दाखविल्या तर सदर अर्जाच्या हक्कावरुन लागलीच पुरावा घेउन त्याचा हक्क शाबीत दिसल्यास अर्जदाराचा अर्ज मंजुर करण्यात येईल.

आज दिनांक ०७/१०/ २०२६ रोजी न्यायालयाचे सही व शिक्क्यानिशी दिले.

पुढील तारीख :- २६/१०/२०२६

**क. लिपीक** शिक्का **आदेशावरुन सहा. अधिक्षक, फौजदारी न्यायालय, गेवराई.**

**वारस प्रमाणपत्रा बद्दल जाहीर घोषणा**

**श्री. रविंद्र अ. मिसाळ दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर, गेवराई जि. बीड यांचे न्यायालयात**

**किरकोळ दिवाणी अर्ज क्रमांक ८३५/२०२६**

**शिलाबाई भ्र.सूर्यकांत गोरे वि. वंदना सूर्यकांत गोरे आणि इतर**

**(ॲड. एस. बी. नाकाडे यांच्या माध्यमातून)**

ज्याअर्थी मयत नामे सुर्यकांत नारायण गोरे, रा. गोविंदवाडी तहत गेवराई ता. गेवराई जि.बीड हे/हया दिनांक १२/०९/२०२६ रोजी गोविंदवाडी तहत गेवराई ता. गेवराई जि. बीड येथे मयत झाले /झाल्या आहेत, अर्जदार शिलाबाई भ्र. सुर्यकांत गोरे, वय ६२ वर्षे, धंदा घरकाम, रा. गोविंदवाडी तहत गेवराई ता. गेवराई जि. बीड गैरअर्जदार क्र. १ वंदना भ्र. सुर्यकांत गोरे- वंदना लक्ष्मण येवले लग्नानंतरचे व पुर्वीचे नाव, वय ५० वर्षे, धंदा घरकाम, रा. गोविंदवाडी तहत गेवराई ता. गेवराई जि. बीड गैरअर्जदार क्र. २ किरण सुर्यकांत गोरे, वय ३१ वर्षे, धंदा शेती, रा. गोविंदवाडी तहत गेवराई ता. गेवराई जि.बीड, गैरअर्जदार क्र. ३ राहुल सुर्यकांत गोरे, वय २५ वर्षे, धंदा शेती, रा. गोविंदवाडी तहत गेवराई ता. गेवराई जि.बीड, गैरअर्जदार क्र. ४ प्रियंका शरद भोसले, वय २७ वर्षे, धंदा घरकाम, रा. धोंडराई ता. गेवराई जि.बीड, गैरअर्जदार क्र. ५ नारायण पि. साधु गोरे, वय ९० वर्षे, धंदा शेती, रा. गोविंदवाडी तहत गेवराई ता. गेवराई जि.बीड यांनी शासकीय / निमशासकीय कामकाजासाठी कायदेशीर वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. करिता मुंबई रेग्युलेशन ॲक्टचे कलम २ प्रमाणे वारसाचे प्रमाणपत्र मिळावे असा अर्ज त्यांनी या न्यायालयाकडे केला आहे.

त्यापेक्षा सदर अर्जदार हे सदरहू मयताचे कायदेशीर वारस नव्हते असे कोणाचे म्हणणे असेल तर, या घोषणेच्या दिनांकापासून तीस दिवसाचे आत त्याने या न्यायालयात हजर होवुन आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असेही कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्यास सदर न्यायालय सदर अर्जदाराच्या हक्कावरुन लागलीच पुरावा घेवुन त्याचा हक्क शाबीत दिसल्यास अर्जदार यांना सदर मयत सुर्यकांत नारायण गोरे यांचे वारस प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक ०८/१०/२०२६ रोजी माझ्या स्वाक्षरीनिशी व न्यायालयाच्या शिक्कानिशी दिले.

पुढील तारीख - २५/११/२०२६

स्वाक्षरित/- **कनिष्ठ लिपीक** दिवाणी न्यायालय, क.स्तर,गेवराई

शिक्का

आदेशावरून स्वाक्षरित/- **सहाय्यक अधिक्षक** दिवाणी न्यायालय, क.स्तर,गेवराई

**मा. श्री. एच. एम. मोमीन, न्यायदंडाधिकारी प्र. वर्ग, न्यायालय क्र. २, गेवराई, जि. बीड यांच्या न्यायालयात**

**कि. फौ. अर्ज क्रमांक ४०८/२०२६**

**मुकादम दुलेखा पठाण वि.ग्रामपंचायत कार्यालय, महार टाकळी**

(मार्फत ॲड एस.एस.काळे)

ज्याअर्थी अर्जदार नामे **मुकादम दुलेखा पठाण वय-७० वर्षे, रा.महारटाकळी ता.गेवराई जि.बीड** यांनी **गैरअर्जदार ग्रामपंचायत कार्यालय, महारटाकळी ता.गेवराई जि.बीड** यांचे विरुध्द जन्म मृत्यु नोंदणी अधिनियम १९६९ चे कलम १३ (३) **अर्जदाराचे वडील नामे दुलेखा महेबुब पठाण, रा.महारटाकळी ता.गेवराई जि.बीड यांच्या दि.१३/०५/१९७६** रोजीची मृत्यू नोंद घेणेबाबत असा अर्ज या न्यायालयात सादर केला आहे व त्याबाबत गैरअर्जदारास नोटीस जाहिर प्रगटनाव्दारे बजावणी व्हावी असा अर्ज या न्यायालयात दाखल केला आहे.

त्यापेक्षा सदर अर्जावर गैरअर्जदारास किंवा इतर कोणास काही म्हणणे असेल तर हया घोषणेच्या दिनांकापासुन तीस दिवसाच्या आत त्याने हया न्यायालयात हजर होउन आपली हरकती कळवावी आणि हया लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहु मुदतीत गैरअर्जदाराने योग्य हरकती न दाखविल्या तर सदर अर्जाच्या हक्कावरुन लागलीच पुरावा घेउन त्याचा हक्क शाबीत दिसल्यास अर्जदाराचा अर्ज मंजुर करण्यात येईल.

आज दिनांक / ०९/ २०२६ रोजी न्यायालयाचे सही व शिक्क्यानिशी दिले.

पुढील तारीख :- २६/१०/२०२६.

**क. लिपीक** शिक्का **आदेशावरुन सहा. अधिक्षक, फौजदारी न्यायालय, गेवराई.**

**तालुका दंडाधिकारी तथा तहसिलदार यांचे कार्यालय अंबड**
**जा.क्र.२०२६/सेतु/कावि-१२३३ दि.२३.०९.२०२६**

## जाहिर प्रगटन

**तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी, अंबड यांचे न्यायालय**

अर्जदार **श्री अमोल काकासाहेब मैंद रा.झीर्पी ता.अंबड जि.जालना** यांनी यांच्या **मुलगा** च्या जन्म / मृत्यू नोंदीबाबतचा आदेश मिळणेकामी या कार्यालयात विनंती अर्ज सादर केला आहे. तसेच संबधित निबंधकाने त्यांच्या जन्म /मृत्यू नोंदीच्या अनुषंगाने अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्राय या कार्यालयास सादर केला आहेत्याची जन्म /मृत्यूची तारीख खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | नाव | अर्जदाराशी नाते | जन्म दिनांक |
|---|---|---|---|
| १ | विराज अमोल मैंद | मुलगा | १२.०५.२०२५ |

निबंधकानी दिलेल्या जन्म /मृत्यू नोंदीच्या अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्रायनुसार सदर जाहिर प्रगटन प्रसिध्द करण्यात यावे.

तसेच या जाहिर प्रगटनाव्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, उक्त नमुद अर्जदार यांच्या जन्म / मृत्यू नोंदीबाबत काही आक्षेप असेल तर यांनी जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासुन १५ दिवसाच्या आत या कार्यालयास लेखी आक्षेप सादर करावा. सदर कालावधीमध्ये या कार्यालयाकडे आक्षेप प्राप्त झाला नाही. तर संबधित प्रकरणात नियमानुसार उचित कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी

आज दिनांक- -/-/२०२६ रोजी माझ्या सहीने व या कार्यालयाच्या शिक्यानिशी जाहिर प्रगटन दिले आहे.

**स्वाक्षरित/- तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी, अंबड**

**तालुका दंडाधिकारी तथा तहसिलदार यांचे कार्यालय अंबड**
**जा.क्र.२०२६/सेतु/कावि-७८८ दि.१२.०८.२०२६**

## जाहिर प्रगटन

**तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी, अंबड यांचे न्यायालय**

अर्जदार **प्रभु शिवनाथ सुखदेव रा.शहागढ ता.अंबड जि.जालना** यांनी यांच्या **मुलगा** च्या जन्म / मृत्यू नोंदीबाबतचा आदेश मिळणेकामी या कार्यालयात विनंती अर्ज सादर केला आहे. तसेच संबधित निबंधकाने त्यांच्या जन्म /मृत्यू नोंदीच्या अनुषंगाने अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्राय या कार्यालयास सादर केला आहेत्याची जन्म /मृत्यूची तारीख खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | नाव | अर्जदाराशी नाते | जन्म दिनांक |
|---|---|---|---|
| १ | आदिराज प्रभु सुखदेव | मुलगा | ०२.०६.२०२५ |

निबंधकानी दिलेल्या जन्म /मृत्यू नोंदीच्या अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्रायनुसार सदर जाहिर प्रगटन प्रसिध्द करण्यात यावे.

तसेच या जाहिर प्रगटनाव्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, उक्त नमुद अर्जदार यांच्या जन्म / मृत्यू नोंदीबाबत काही आक्षेप असेल तर यांनी जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासुन १५ दिवसाच्या आत या कार्यालयास लेखी आक्षेप सादर करावा. सदर कालावधीमध्ये या कार्यालयाकडे आक्षेप प्राप्त झाला नाही. तर संबधित प्रकरणात नियमानुसार उचित कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी

आज दिनांक- १२/०८/२०२६ रोजी माझ्या सहीने व या कार्यालयाच्या शिक्यानिशी जाहिर प्रगटन दिले आहे.

**स्वाक्षरित/- तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी, अंबड**

**तालुका दंडाधिकारी तथा तहसिलदार यांचे कार्यालय अंबड**
**जा.क्र.२०२६/सेतु/कावि-११२९ दि.-.-.२०२६**

## जाहिर प्रगटन

**तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी, अंबड यांचे न्यायालय**

अर्जदार **रौनक लायक सय्यद, रा.हिरडपुरी ता.पैठण जि.संभाजीनगर** यांनी यांच्या **नातु** च्या जन्म / मृत्यू नोंदीबाबतचा आदेश मिळणेकामी या कार्यालयात विनंती अर्ज सादर केला आहे. तसेच संबधित निबंधकाने त्यांच्या जन्म /मृत्यू नोंदीच्या अनुषंगाने अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्राय या कार्यालयास सादर केला आहेत्याची जन्म /मृत्यूची तारीख खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | नाव | अर्जदाराशी नाते | जन्म दिनांक |
|---|---|---|---|
| १ | हाशिम नदीम शेख | नातु | ०२.०५.२०२५ |

निबंधकानी दिलेल्या जन्म /मृत्यू नोंदीच्या अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्रायनुसार सदर जाहिर प्रगटन प्रसिध्द करण्यात यावे.

तसेच या जाहिर प्रगटनाव्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, उक्त नमुद अर्जदार यांच्या जन्म / मृत्यू नोंदीबाबत काही आक्षेप असेल तर यांनी जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासुन १५ दिवसाच्या आत या कार्यालयास लेखी आक्षेप सादर करावा. सदर कालावधीमध्ये या कार्यालयाकडे आक्षेप प्राप्त झाला नाही. तर संबधित प्रकरणात नियमानुसार उचित कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी

आज दिनांक- ०१/०९/२०२६ रोजी माझ्या सहीने व या कार्यालयाच्या शिक्यानिशी जाहिर प्रगटन दिले आहे.

**स्वाक्षरित/- तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी, अंबड**

**तालुका दंडाधिकारी तथा तहसिलदार यांचे कार्यालय अंबड**
**जा.क्र.२०२६/सेतु/कावि-१०१९ दि.२६.०९.२०२५**

## जाहिर प्रगटन

**तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी, अंबड यांचे न्यायालय**

अर्जदार **मुकूंद रामनाथ शिंदे, रा.लालवाडी ता.अंबड जि.जालना** यांनी यांच्या **मुलगा** च्या जन्म / मृत्यू नोंदीबाबतचा आदेश मिळणेकामी या कार्यालयात विनंती अर्ज सादर केला आहे. तसेच संबधित निबंधकाने त्यांच्या जन्म /मृत्यू नोंदीच्या अनुषंगाने अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्राय या कार्यालयास सादर केला आहेत्याची जन्म /मृत्यूची तारीख खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | नाव | अर्जदाराशी नाते | जन्म दिनांक |
|---|---|---|---|
| १ | रूद्र मुकूंद शिंदे | मुलगा | ०१.०७.२०१२ |

निबंधकानी दिलेल्या जन्म /मृत्यू नोंदीच्या अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्रायनुसार सदर जाहिर प्रगटन प्रसिध्द करण्यात यावे.

तसेच या जाहिर प्रगटनाव्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, उक्त नमुद अर्जदार यांच्या जन्म / मृत्यू नोंदीबाबत काही आक्षेप असेल तर यांनी जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासुन १५ दिवसाच्या आत या कार्यालयास लेखी आक्षेप सादर करावा. सदर कालावधीमध्ये या कार्यालयाकडे आक्षेप प्राप्त झाला नाही. तर संबधित प्रकरणात नियमानुसार उचित कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी

आज दिनांक- -/-/२०२६ रोजी माझ्या सहीने व या कार्यालयाच्या शिक्यानिशी जाहिर प्रगटन दिले आहे.

**स्वाक्षरित/- तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी, अंबड**

# ऊसतोड कामगारांच्या आरोग्यसेवेत खंड पडू देऊ नका, अवैध गर्भलिंग निदानाविरुद्ध यंत्रणा सक्रिय करा - डॉ. नीलम गोऱ्हे

बीड ।प्रतिनिधी

दुष्काळ आणि हंगामी स्थलांतराच्या पार्श्वभूमीवर ऊसतोड कामगार महिला, पुरुष व बालकांच्या आरोग्यसेवेत खंड पडू देऊ नये. अनावश्यक गर्भाशय शस्त्रक्रियांना प्रतिबंध करण्यासोबतच अवैध गर्भलिंग निदानाविरुद्ध आरोग्य विभाग आणि पोलिसांनी समन्वयाने काम करावे, अशा सूचना डॉ. नीलम गोऱ्हे यांनी दिल्या. सोनोग्राफी केंद्रे असलेल्या महत्त्वाच्या सार्वजनिक रस्त्यांवर उउढत बसवण्याच्या दृष्टीने आवश्यक ठिकाणांचे प्रस्ताव सादर करावेत, अशी सूचनाही त्यांनी केली.

बीड येथील जिल्हा शल्यचिकित्सक कार्यालयात आयोजित बैठकीत ऊसतोड कामगारांचे आरोग्य, गर्भाशय काढण्याच्या शस्त्रक्रिया तसेच झउझछऊ व चढझ कायद्यांच्या अंमलबजावणीचा आढावा घेण्यात आला. विधान परिषद सदस्या तथा माजी उपसभापती आणि या दोन्ही कायद्यांच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी राज्यस्तरीय कृती दलाच्या अध्यक्ष डॉ. गोऱ्हे यांनी अधिकाऱ्यांकडून प्रगती, अडचणी व पुढील नियोजनाची माहिती घेतली.

आरोग्यसाथींची निवड पडताळा, प्रशिक्षण व औषधपुरवठा सुनिश्चित करा..

प्रत्यक्ष ऊसतोडीसाठी टोळ्यांसोबत जाणाऱ्या महिलांची आरोग्यसाथी म्हणून निवड झाल्याची खात्री करावी. सामाजिक संस्थांनी दिलेली माहिती आणि प्रशासनाकडील यादी यांची पडताळणी करण्यासाठी दोन ते तीन दिवसांत बैठक घ्यावी, अशी सूचना डॉ. गोऱ्हे यांनी केली. स्थलांतर न करणाऱ्या महिलांना गावपातळीवर आरोग्यसाथी म्हणून सहभागी करून घेता येईल; मात्र स्थलांतरित टोळीसोबत प्रशिक्षित आरोग्यसाथी असणे आवश्यक असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

आरोग्यसाथींना ओळखपत्र, पुरेसे प्रशिक्षण आणि प्रथमोपचार साहित्य उपलब्ध असावे, अशी सूचना करण्यात आली. औषधे संपल्यानंतर त्यांचा नियमित पुरवठा व्हावा. संबंधित आरोग्य केंद्रांचे संपर्क क्रमांक उपलब्ध करून औषधांच्या उपलब्धतेची माहिती व्हॉट्सपद्वारे कळवावी, असेही त्यांनी सांगितले.




आरोग्य कार्डामध्ये महिला, पुरुष व बालकांच्या गरजांनुसार तपासण्यांची नोंद असावी. रक्तक्षय, मधुमेह, उच्च रक्तदाब, हृदयविकार तसेच डोळे, कान व दातांच्या तपासण्यांचा समावेश करावा. स्थलांतराचे मार्ग आणि मुक्कामाची ठिकाणे जाणून घेऊन फिरती आरोग्यसेवा व स्थानिक आरोग्य केंद्रांशी संपर्काची व्यवस्था करावी. बालकांचे लसीकरण, पोषण आहार आणि अंगणवाडी सेवांसाठी महिला व बालविकास विभागाशी समन्वय साधावा, असे त्यांनी नमूद केले.

गर्भाशय शस्त्रक्रिया झालेल्या महिलांना मेनोपॉज क्लिनिकशी जोडा..

खाजगी रुग्णालयांतील गर्भाशय काढण्याच्या शस्त्रक्रियांची वैद्यकीय आवश्यकता आणि संबंधित नोंदी तपासाव्यात. अनावश्यक शस्त्रक्रिया आढळल्यास प्रतिबंधात्मक उपाययोजनांच्या शिफारशी कराव्यात. बीडमधील महिलांच्या लगतच्या जिल्ह्यांत झालेल्या शस्त्रक्रियांची माहिती मिळवण्याचा विषय राज्यस्तरीय बैठकीत चर्चेसाठी मांडण्यात येईल, असे डॉ. गोऱ्हे यांनी सांगितले.

गर्भाशय शस्त्रक्रिया झालेल्या महिलांचा नियमित आरोग्य पाठपुरावा करावा. त्यांना आवश्यकतेनुसार रजोनिवृत्ती अर्थात मेनोपॉज क्लिनिकशी जोडून शारीरिक व मानसिक आरोग्यविषयक समुपदेशन, पोषणविषयक मार्गदर्शन आणि आवश्यक उपचार उपलब्ध व्हावेत. महिलांचे स्वमदत गट तयार करून त्यांचे मनोबल वाढवावे. गर्भाशयाच्या आजारांविषयी आणि कर्करोगाच्या भीतीविषयी योग्य माहिती देऊन अनावश्यक शस्त्रक्रिया टाळण्यासाठी जनजागृती करावी, अशी सूचना त्यांनी केली.

मनीषा तोकले व ड. संगीता चव्हाण यांनी मांडले प्रश्न

मनीषा तोकले व ड. संगीता चव्हाण यांनी चर्चेत दुष्काळामुळे वाढलेले स्थलांतर, आरोग्यसेवेपासून वंचित राहणारे कामगार, आरोग्यसाथींच्या निवडीतील त्रुटी आणि औषधपुरवठ्यातील अडचणी मांडल्या. गर्भाशय शस्त्रक्रिया झालेल्या महिलांच्या समुपदेशन व नियमित आरोग्य पाठपुराव्याची गरजही अधोरेखित करण्यात आली.

झउझछऊ अंमलबजावणीसाठी जिल्हा कृती दल सक्रिय करा..

अवैध गर्भलिंग निदान रोखण्यासाठी जिल्हास्तरीय कृती दलाची रचना व सदस्यांचे नामनिर्देशन शासन निर्देशांनुसार तपासून नियमित बैठका घ्याव्यात. सामाजिक क्षेत्रातील सक्रिय महिलांचा सहभाग वाढवून माहिती संकलन, जनजागृती आणि कार्यवाहीचा पाठपुरावा मजबूत करावा, असे डॉ. गोऱ्हे यांनी सांगितले.

सोनोग्राफी केंद्रांची नोंदणी प्रमाणपत्रे, 'फॉर्म एफ' आणि संबंधित अभिलेखांची नियमानुसार तपासणी करावी. पशुवैद्यकीय सोनोग्राफी यंत्रांचा मानवी गर्भलिंग निदानासाठी गैरवापर होत असल्याच्या तक्रारींची पुराव्यांसह चौकशी करावी. ऑनलाइन विक्री व जाहिरातींबाबतच्या तक्रारीही पडताळून संबंधित यंत्रणांकडे पाठवाव्यात, अशी सूचना त्यांनी केली.

अनधिकृत व्यक्तींकडून होणारे गर्भपात व इतर गैरप्रकार रोखण्यासाठी तपासणी मोहीम राबवावी. झउझछऊ व चढझ प्रकरणांतील तपास आणि कार्यवाहीसाठी आरोग्य विभाग व पोलिसांनी संयुक्त कार्यपद्धती निश्चित करावी. नियमांचे पालन करणाऱ्या डॉक्टरांनी तपासणीला सहकार्य करावे; तपासणीच्या नावाखाली धमकावणे किंवा गैरप्रकार होऊ नयेत, असे त्यांनी स्पष्ट केले.

सार्वजनिक रस्त्यांवर उउढत बसवण्याबाबत प्रस्ताव सादर करा..

सोनोग्राफी केंद्रे असलेल्या बीड शहर व तालुक्यांतील महत्त्वाच्या सार्वजनिक रस्त्यांवर उउढत बसवण्यासाठी आवश्यक ठिकाणांची यादी व प्रस्ताव सादर करण्याच्या सूचना डॉ. गोऱ्हे यांनी आरोग्य विभागाला दिल्या. संशयास्पद हालचालींवर लक्ष ठेवण्यास आणि अवैध गर्भलिंग निदानाला प्रतिबंध करण्याच्या प्रयत्नांना यामुळे मदत होईल, असे त्यांनी सांगितले. तक्रारींसाठी स्वतंत्र संपर्क सुविधा उपलब्ध करून तक्रारदारांची गोपनीयता जपण्यावरही त्यांनी भर दिला.

महिलांच्या अधिकारांचा आदर राखून सुरक्षित सेवा द्या..

चढझ सेवांसाठी येणाऱ्या महिलांना गोपनीयता, सन्मान आणि त्यांच्या अधिकारांचा आदर राखून सुरक्षित उपचार व समुपदेशन मिळावे. खाजगी रुग्णालयांतील समुपदेशन व्यवस्था सक्षम करण्यासाठी इंडियन मेडिकल असोसिएशनशी संवाद साधावा. अल्पवयीन मुलींची गर्भधारणा, बालविवाह व लैंगिक अत्याचाराच्या प्रकरणांत उपचारात अडथळा येऊ न देता आवश्यक नोंदी, कायदेशीर कार्यवाही आणि समुपदेशनाचा समन्वय साधावा, असे त्यांनी सांगितले.

आशा कार्यकर्त्या, अंगणवाडी सेविका आणि सामाजिक कार्यकर्त्यांना जनजागृतीत सहभागी करून घ्यावे. पुढील बैठकीत महिला व बालविकास, ग्रामविकास, सामाजिक न्याय व संबंधित विभागांच्या अधिकाऱ्यांना सहभागी करावे. अंमलबजावणीतील अडचणी व सुधारणा प्रस्ताव लेखी सादर करावेत, असे डॉ. गोऱ्हे यांनी सांगितले.

बैठकीस डॉ. सतिश सोळंकी व संबंधित आरोग्य अधिकारी, मनीषा तोकले, ड. संगीता चव्हाण, कला शिंदे, रंजना कुलकर्णी आणि सुनीता मोरे उपस्थित होत्या.

# जरांगे पाटील यांच्या अडचणी वाढल्या; समर्थकांकडून धमक्या दिल्याचा रेखा कोंडे यांचा आरोप

मुंबई, दि. ७ ऑक्टोबर : मराठा आरक्षणाच्या प्रश्नावर आंदोलनाचे नेतृत्व करणारे मनोज जरांगे पाटील यांच्यावर गेल्या काही दिवसांपासून विविध आरोप होत आहेत. त्यातच मराठा क्रांती मोर्चाच्या समन्वयक रेखा कोंडे यांनी जरांगे पाटील यांच्या समर्थकांकडून चारित्र्यहनन, अश्लील शिवीगाळ तसेच बलात्काराच्या धमक्या दिल्याचा गंभीर आरोप केला आहे. यासंदर्भात यापूर्वी अनेक तक्रारी करूनही कारवाई झाली नसल्याचे त्यांनी सांगितले.

रेखा कोंडे यांनी सांगितले की, मनोज जरांगे पाटील २०२३ पासून मराठा समाजाचा प्रश्न मांडत असल्याने सुरुवातीला आपण त्यांना पाठिंबा दिला होता. मात्र, आझाद मैदानावरील आंदोलनानंतर त्यांच्यावरील विश्वास कमी झाला. त्यानंतर पाटोदा येथे आंदोलन गुंडाळण्यात आल्याने त्याबाबत काही प्रश्न उपस्थित केले. तसेच जरांगे पाटील यांच्या मागण्या मान्य झाल्याचे सांगितले जात असताना त्यासंदर्भातील मागण्यांचे पत्र दाखविण्याची मागणी आपण केली होती, असे कोंडे यांनी म्हटले.या भूमिकेनंतर जरांगे पाटील यांच्या समर्थकांकडून सोशल मीडियावर आणि अन्य माध्यमांतून आपले चारित्र्यहनन करण्यात आले. अश्लील भाषेत शिवीगाळ करून बलात्काराच्या धमक्याही देण्यात आल्याचा आरोप त्यांनी केला. याबाबत वेळोवेळी तक्रारी करूनही गुन्हा दाखल होत नसल्याने अखेर मंत्रालयात जाऊन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेतल्याचे कोंडे यांनी सांगितले.



मुख्यमंत्र्यांना संपूर्ण प्रकरणाची माहिती देऊन मागण्यांचे निवेदन देण्यात आले. त्यानंतर मुख्यमंत्र्यांनी गृह विभागाला या प्रकरणात आवश्यक ती कारवाई करण्याच्या सूचना दिल्याचा दावा रेखा कोंडे यांनी केला.दरम्यान, ललिता तारक यांच्याकडूनही गेल्या काही दिवसांपासून मनोज जरांगे पाटील यांच्यावर आरोप करण्यात येत आहेत. अंतरवाली सराटी येथे राहत असल्याने जरांगे यांच्या आंदोलनाची माहिती असल्याचे सांगत तारक यांनी पाटोदा येथील आंदोलन मागे घेण्याबाबत प्रश्न उपस्थित केले आहेत. त्यानंतर अंतरवाली सराटी येथील आंदोलनाचा स्टेज काढण्याचा निर्णय घेतल्याचेही त्यांनी म्हटले आहे.

या आरोप-प्रत्यारोपांमुळे मराठा आरक्षण आंदोलनातील अंतर्गत मतभेद पुन्हा एकदा चर्चेत आले आहेत. मात्र, रेखा कोंडे आणि ललिता तारक यांनी केलेले आरोप हे त्यांचे दावे असून, त्यांची स्वतंत्र अधिकृत पडताळणी होणे बाकी आहे.

# पदवीधर मतदारसंघाच्या निवडणुकीत १४ आमदार, २ खासदार मतदानापासून वंचित

नागपूर : नागपूर विभाग पदवीधर मतदारसंघाची निवडणूक सध्या चांगलीच रंगात आली असताना एक महत्त्वाची बाब समोर आली आहे. या विभागातील ३२ लोकप्रतिनिधींपैकी तब्बल १४ आमदार आणि २ खासदार यांना या निवडणुकीत मतदान करता येणार नाही. जिल्ह्याच्या राजकारणात महत्त्वाची भूमिका बजावणारे हे लोकप्रतिनिधीच पदवीधर मतदारसंघाचे मतदार नसल्याने राजकीय वर्तुळात आश्चर्य व्यक्त होत आहे.



पदवीधर मतदारसंघात मतदान करण्यासाठी संबंधित व्यक्तीने मान्यताप्राप्त विद्यापीठाची पदवी किंवा त्यास समकक्ष पात्रता पूर्ण केलेली असणे, तसेच मतदार नोंदणीच्या इतर अटी पूर्ण करणे आवश्यक असते. मात्र, नागपूर विभागातील या १६ लोकप्रतिनिधींपैकी काहींचे शिक्षण दहावी, बारावी किंवा पदवीच्या पहिल्या-दुसऱ्या वर्षापर्यंतच झाले असल्याने त्यांची पदवीधर मतदार म्हणून नोंद झालेली नाही.मतदानापासून वंचित राहणाऱ्या प्रमुख नेत्यांमध्ये भाजपचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे, काँग्रेस नेते नाना पटोले, विजय वडेट्टीवार आणि माजी मंत्री धर्मरावबाबा आत्राम यांचा समावेश आहे.

याशिवाय रामटेकचे खासदार श्यामकुमार बर्वे आणि राज्यसभा खासदार माया इवनाते यांनाही पदवीधर मतदारसंघाच्या निवडणुकीत मतदानाचा अधिकार मिळालेला नाही.दरम्यान, मतदारसंघातील निवडणुकीत राजकीय नेत्यांची भूमिका महत्त्वाची असली, तरी पदवीधर मतदारसंघासाठी लागू असलेल्या पात्रता निकषांमुळे लोकप्रतिनिधी असूनही काही दिग्गज नेत्यांना मतदान करता येत नसल्याचे चित्र आहे.

**वारस प्रमाणपत्रा बद्दल जाहीर घोषणा**
**गेवराई येथील आर.ए.मिसाळ दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर यांचे न्यायालयात**
**किरकोळ दिवाणी अर्ज क्र.८१७/२०२६**
वंदना भ्र.शिवाजी पटेकर व इतर वि.निरंक
**(मार्फत-ॲड.आर.एल.गवारे, गेवराई)**

ज्याअर्थी मयत नामे **शिवाजी धोंडीबा पटेकर रा.भगवान नगर, गेवराई ता.गेवराई जि.बीड हे दि.०६.११.२०२५ रोजी भगवान नगर, ता.गेवराई जि.बीड** येथे मयत झाले/झाल्या आहेत.सदरहु मयताच्या नावे खालीलप्रमाणे रक्कम जमा आहे.

| अ.क्र. | बँकेचे नाव/कंपनीचे नाव/ पतसंस्थेचे नाव | बचत खाते क्रमांक | रक्कम रूपये |
|---|---|---|---|
| १ | डाक घर बचत बँक शाखा गेवराई | ४५२४२०७९२१ | ५६३२७/- |

अर्जदार **१.वंदना भ्र.शिवाजी पटेकर वय-४० वर्षे, धंदा-घरकाम, रा.भगवान नगर, गेवराई ता.गेवराई जि.बीड, २.प्रज्योत पि.शिवाजी पटेकर वय-२३ वर्षे, धंदा-शिक्षण, रा.सदर, ३.दिपाली भ्र.महेश सरोदे वय-२७ वर्षे, धंदा-घरकाम, रा.गेवराई ता.गेवराई जि.बीड**यांना वरील रक्कम मिळणेकामी अर्जदार यांना कायदेशीर वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. करीता मुंबई रेग्युलेशन ॲक्टचे कलम २ प्रमाणे वारसाचे प्रमाणपत्र मिळावे असा अर्ज त्यांनी या न्यायालयाकडे केला आहे.

त्यापेक्षा सदर अर्जदार हे सदरहू मयताचे कायदेशीर वारस नव्हेत असे कोणाचे म्हणणे असेल तर या घोषणेच्या दिनांकापासून तीस दिवसाचे आत त्याने या न्यायालयात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरून असेही कळविण्यात येते की, जर सदरहु मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्यास सदर न्यायालय सदर अर्जदारांच्या हक्कावरून लागलीच पुरावा घेवून त्याचा हक्क शाबीत दिसल्यास अर्जदार यांना सदर **शिवाजी धोंडीबा पटेकर** यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज **दि.०७/१०/२०२६** रोजी माझ्या स्वाक्षरिनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

**पुढील तारिख -१९/११/२०२६**

स्वाक्षरित/-
**कनिष्ठ लिपीक**
दिवाणी न्यायालय, क.स्तर,गेवराई

शिक्का

आदेशावरून
स्वाक्षरित/-
**सहाय्यक अधिक्षक**
दिवाणी न्यायालय, क.स्तर,गेवराई

**मा. श्री. एच. एम. मोमीन, न्यायदंडाधिकारी प्र. वर्ग, न्यायालय क्र. २, गेवराई, जि. बीड यांच्या न्यायालयात**
**कि. फौ. अर्ज क्रमांक ३७०/२०२६**
**स्वदिप विश्वास डाके वि.ग्रामपंचायत कार्या.म्हाळसपिंपळगांव**
(मार्फत ॲड आर. एल. गवारे)

ज्याअर्थी अर्जदार नामे **स्वदिप विश्वास डाके वय-२१ वर्षे,रा.मु.पो.म्हाळसपिंपळगांव ता.गेवराई जि.बीड** यांनी **गैरअर्जदार वि ग्रामसेवक ग्रामपंचायत कार्यालय म्हाळसपिंपळगांव ता.गेवराई जि. बीड** यांचे विरुध्द जन्म मृत्यु नोंदणी अधिनियम १९६९ चे कलम १३ (३) अर्जदाराचा दिनांक ०६/०६/ २००५ रोजीची जन्म नोंद घेणेबाबत असा अर्ज या न्यायालयात सादर केला आहे व त्याबाबत गैरअर्जदारास नोटीस जाहिर प्रगटनाव्दारे बजावणी व्हावी असा अर्ज या न्यायालयात दाखल केला आहे.

त्यापेक्षा सदर अर्जावर गैरअर्जदारास किंवा इतर कोणास काही म्हणणे असेल तर हया घोषणेच्या दिनांकापासुन तीस दिवसाच्या आत त्याने हया न्यायालयात हजर होउन आपली हरकती कळवावी आणि हया लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहु मुदतीत गैरअर्जदाराने योग्य हरकती न दाखविल्या तर सदर अर्जाच्या हक्कावरुन लागलीच पुरावा घेउन त्याचा हक्क शाबीत दिसल्यास अर्जदाराचा अर्ज मंजुर करण्यात येईल.

आज दिनांक / १०/ २०२६ रोजी न्यायालयाचे सही व शिक्क्यानिशी दिले.

पुढील तारीख :- २६/१०/२०२६.

**क. लिपीक** शिक्का **आदेशावरुन सहा. अधिक्षक, फौजदारी न्यायालय, गेवराई.**

**मा. श्री. एच. एम. मोमीन, न्यायदंडाधिकारी प्र. वर्ग, न्यायालय क्र. २, गेवराई, जि. बीड यांच्या न्यायालयात**
**कि. फौ. अर्ज क्रमांक ४२६/२०२६**
**सुरज सुभाष गोरे वि.ग्रा.कार्या.मालेगांव बु.**
(मार्फत ॲड आर. एल. गवारे)

ज्याअर्थी अर्जदार नामे **सुरज सुभाष गोरे वय-३४ वर्षे, रा.मालेगांव बु. ता.गेवराई जि.बीड** यांनी **गैरअर्जदार वि.ग्रामपंचायत कार्यालय, मालेगाव बु. ता.गेवराई जि.बीड** यांचे विरुध्द जन्म मृत्यु नोंदणी अधिनियम १९६९ चे कलम १३ (३) **अर्जदाराची मुलगी नामे सत्यभामा पि.सुरज गोरे रा.मालेगांव बु. ता.गेवराई जि.बीड दि.१५.०२.२०२०** रोजीची जन्म नोंद घेणेबाबत असा अर्ज या न्यायालयात सादर केला आहे व त्याबाबत गैरअर्जदारास नोटीस जाहिर प्रगटनाव्दारे बजावणी व्हावी असा अर्ज या न्यायालयात दाखल केला आहे.

त्यापेक्षा सदर अर्जावर गैरअर्जदारास किंवा इतर कोणास काही म्हणणे असेल तर हया घोषणेच्या दिनांकापासुन तीस दिवसाच्या आत त्याने हया न्यायालयात हजर होउन आपली हरकती कळवावी आणि हया लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहु मुदतीत गैरअर्जदाराने योग्य हरकती न दाखविल्या तर सदर अर्जाच्या हक्कावरुन लागलीच पुरावा घेउन त्याचा हक्क शाबीत दिसल्यास अर्जदाराचा अर्ज मंजुर करण्यात येईल.

आज दिनांक / ०९/ २०२६ रोजी न्यायालयाचे सही व शिक्क्यानिशी दिले.

पुढील तारीख :- २६/१०/२०२६.

**क. लिपीक** शिक्का **आदेशावरुन सहा. अधिक्षक, फौजदारी न्यायालय, गेवराई.**

**मा. श्री. एच. एम. मोमीन, न्यायदंडाधिकारी प्र. वर्ग, न्यायालय क्र. २, गेवराई, जि. बीड यांच्या न्यायालयात**
**कि. फौ. अर्ज क्रमांक ३७२/२०२६**
**सुनिल सोनाजी फुलारे वि.ग्रामपंचायत कार्या.राहेरी**
(मार्फत ॲड आर. एल. गवारे)

ज्याअर्थी अर्जदार नामे **सुनिल पि.सोनाजी फुलारे वय-२४ वर्षे, रा.राहेरी ता.गेवराई जि.बीड** यांनी **गैरअर्जदार वि.ग्रामपंचायत कार्यालय, राहेरी ता.गेवराई जि.बीड** यांचे विरुध्द जन्म मृत्यु नोंदणी अधिनियम १९६९ चे कलम १३ (३) **अर्जदाराची मुलगी नामे पल्लवी पि.सुनिल फुलारे रा.राहेरी ता.गेवराई जि.बीड दि.१३.०३.२०२४** रोजीची जन्म नोंद घेणेबाबत असा अर्ज या न्यायालयात सादर केला आहे व त्याबाबत गैरअर्जदारास नोटीस जाहिर प्रगटनाव्दारे बजावणी व्हावी असा अर्ज या न्यायालयात दाखल केला आहे.

त्यापेक्षा सदर अर्जावर गैरअर्जदारास किंवा इतर कोणास काही म्हणणे असेल तर हया घोषणेच्या दिनांकापासुन तीस दिवसाच्या आत त्याने हया न्यायालयात हजर होउन आपली हरकती कळवावी आणि हया लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहु मुदतीत गैरअर्जदाराने योग्य हरकती न दाखविल्या तर सदर अर्जाच्या हक्कावरुन लागलीच पुरावा घेउन त्याचा हक्क शाबीत दिसल्यास अर्जदाराचा अर्ज मंजुर करण्यात येईल.

आज दिनांक / ०९/ २०२६ रोजी न्यायालयाचे सही व शिक्क्यानिशी दिले.

पुढील तारीख :- २६/१०/२०२६.

**क. लिपीक** शिक्का **आदेशावरुन सहा. अधिक्षक, फौजदारी न्यायालय, गेवराई.**

**मा. श्री. एच. एम. मोमीन, न्यायदंडाधिकारी प्र. वर्ग, न्यायालय क्र. २, गेवराई, जि. बीड यांच्या न्यायालयात**
**कि. फौ. अर्ज क्रमांक ४३०/२०२६**
**रोशन रमेश राठोड वि ग्रामसेवक कार्यालय कुंभेजळगाव**
(मार्फत ॲड आर. एल. गवारे)

ज्याअर्थी अर्जदार नामे **रोशन रमेश राठोड, वय १९ वर्ष रा. कुंभेजळगाव, ता. गेवराई जि. बीड** यांनी **गैरअर्जदार वि ग्रामसेवक ग्रामपंचायत कार्यालय कुंभेजळगाव ता. गेवराई, जि. बीड** यांचे विरुध्द जन्म मृत्यु नोंदणी अधिनियम १९६९ चे कलम १३ (३) अर्जदाराचा दिनांक ०२/०६/ २००७ रोजीची जन्म नोंद घेणेबाबत असा अर्ज या न्यायालयात सादर केला आहे व त्याबाबत गैरअर्जदारास नोटीस जाहिर प्रगटनाव्दारे बजावणी व्हावी असा अर्ज या न्यायालयात दाखल केला आहे.

त्यापेक्षा सदर अर्जावर गैरअर्जदारास किंवा इतर कोणास काही म्हणणे असेल तर हया घोषणेच्या दिनांकापासुन तीस दिवसाच्या आत त्याने हया न्यायालयात हजर होउन आपली हरकती कळवावी आणि हया लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहु मुदतीत गैरअर्जदाराने योग्य हरकती न दाखविल्या तर सदर अर्जाच्या हक्कावरुन लागलीच पुरावा घेउन त्याचा हक्क शाबीत दिसल्यास अर्जदाराचा अर्ज मंजुर करण्यात येईल.

आज दिनांक / १०/ २०२६ रोजी न्यायालयाचे सही व शिक्क्यानिशी दिले.

पुढील तारीख :- २६/१०/२०२६.

**क. लिपीक** शिक्का **आदेशावरुन सहा. अधिक्षक, फौजदारी न्यायालय, गेवराई.**

**मा. श्री. एच. एम. मोमीन, न्यायदंडाधिकारी प्र. वर्ग, न्यायालय क्र. २, गेवराई, जि. बीड यांच्या न्यायालयात**
**कि. फौ. अर्ज क्रमांक ३७४/२०२६**
**अंकुश बालासाहेब रंधे वि.ग्रामपंचायत कार्यालय राहेरी**
(मार्फत ॲड आर. एल. गवारे)

ज्याअर्थी अर्जदार नामे **अंकुश पि.बालासाहेब रंधे, वय-३० वर्षे, रा.राहेरी गेवराईता.गेवराई जि.बीड** यांनी **गैरअर्जदार ग्रामपंचायत कार्यालय, राहेरी ता.गेवराई ता.गेवराई जि.बीड** यांचे विरुध्द जन्म मृत्यु नोंदणी अधिनियम १९६९ चे कलम १३ (३) **अर्जदाराचा मुलगा नामे ओमकार अंकुश रंधे, रा.कोल्हेर रोड, शिवाजी नगर, गेवराई ता.गेवराई जि.बीड दिनांक ०२/१०/ २०२१** रोजीची जन्म नोंद घेणेबाबत असा अर्ज या न्यायालयात सादर केला आहे व त्याबाबत गैरअर्जदारास नोटीस जाहिर प्रगटनाव्दारे बजावणी व्हावी असा अर्ज या न्यायालयात दाखल केला आहे.

त्यापेक्षा सदर अर्जावर गैरअर्जदारास किंवा इतर कोणास काही म्हणणे असेल तर हया घोषणेच्या दिनांकापासुन तीस दिवसाच्या आत त्याने हया न्यायालयात हजर होउन आपली हरकती कळवावी आणि हया लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहु मुदतीत गैरअर्जदाराने योग्य हरकती न दाखविल्या तर सदर अर्जाच्या हक्कावरुन लागलीच पुरावा घेउन त्याचा हक्क शाबीत दिसल्यास अर्जदाराचा अर्ज मंजुर करण्यात येईल.

आज दिनांक / ०९/ २०२६ रोजी न्यायालयाचे सही व शिक्क्यानिशी दिले.

पुढील तारीख :- २६/१०/२०२६.

**क. लिपीक** शिक्का **आदेशावरुन सहा. अधिक्षक, फौजदारी न्यायालय, गेवराई.**

**मा. श्री. एच. एम. मोमीन, न्यायदंडाधिकारी प्र. वर्ग, न्यायालय क्र. २, गेवराई, जि. बीड यांच्या न्यायालयात**
**कि. फौ. अर्ज क्रमांक ४३२/२०२६**
**कपालेश्वर चंद्रकांत हादगुले वि.मुख्याधिकारी न.प., गेवराई**
(मार्फत ॲड आर. एल. गवारे)

ज्याअर्थी अर्जदार नामे **कपालेश्वर चंद्रकांत हादगुले, वय-२४ वर्षे, रा.शिवाजी नगर, गेवराई ता.गेवराई जि.बीड** यांनी **गैरअर्जदार वि मुख्याधिकारी नगर परिषद, गेवराई ता. गेवराई, जि. बीड** यांचे विरुध्द जन्म मृत्यु नोंदणी अधिनियम १९६९ चे कलम १३ (३) अर्जदाराचा दिनांक ०६/०३/ २००२ रोजीची जन्म नोंद घेणेबाबत असा अर्ज या न्यायालयात सादर केला आहे व त्याबाबत गैरअर्जदारास नोटीस जाहिर प्रगटनाव्दारे बजावणी व्हावी असा अर्ज या न्यायालयात दाखल केला आहे.

त्यापेक्षा सदर अर्जावर गैरअर्जदारास किंवा इतर कोणास काही म्हणणे असेल तर हया घोषणेच्या दिनांकापासुन तीस दिवसाच्या आत त्याने हया न्यायालयात हजर होउन आपली हरकती कळवावी आणि हया लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहु मुदतीत गैरअर्जदाराने योग्य हरकती न दाखविल्या तर सदर अर्जाच्या हक्कावरुन लागलीच पुरावा घेउन त्याचा हक्क शाबीत दिसल्यास अर्जदाराचा अर्ज मंजुर करण्यात येईल.

आज दिनांक / १०/ २०२६ रोजी न्यायालयाचे सही व शिक्क्यानिशी दिले.

पुढील तारीख :- २६/१०/२०२६.

**क. लिपीक** शिक्का **आदेशावरुन सहा. अधिक्षक, फौजदारी न्यायालय, गेवराई.**

**मा. श्री. एच. एम. मोमीन, न्यायदंडाधिकारी प्र. वर्ग, न्यायालय क्र. २, गेवराई, जि. बीड यांच्या न्यायालयात**
**कि. फौ. अर्ज क्रमांक ४२८/२०२६**
**देवराव कैलास जंगले वि.ग्रामसेवक भेंड बु.**
(मार्फत ॲड आर. एल. गवारे)

ज्याअर्थी अर्जदार नामे **देवराव कैलास जंगले वय-३९ वर्षे, रा.भेंड बु. ता.गेवराई जि.बीड ह.मु.कूरूली पुणे ता.जि.पुणे** यांनी **गैरअर्जदार वि.ग्रामसेवक ग्रामपांचायत कार्यालय भेंड बु.** यांचे विरुध्द जन्म मृत्यु नोंदणी अधिनियम १९६९ चे कलम १३ (३) **अर्जदाराचे वडील कैलास रामभाऊ जंगले रा.मौजे भेड बु. ता.गेवराई जि.बीड यांचा दि.१९.१०.२०२२ रोजीची** रोजीची मृत्यू नोंद घेणेबाबत असा अर्ज या न्यायालयात सादर केला आहे व त्याबाबत गैरअर्जदारास नोटीस जाहिर प्रगटनाव्दारे बजावणी व्हावी असा अर्ज या न्यायालयात दाखल केला आहे.

त्यापेक्षा सदर अर्जावर गैरअर्जदारास किंवा इतर कोणास काही म्हणणे असेल तर हया घोषणेच्या दिनांकापासुन तीस दिवसाच्या आत त्याने हया न्यायालयात हजर होउन आपली हरकती कळवावी आणि हया लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहु मुदतीत गैरअर्जदाराने योग्य हरकती न दाखविल्या तर सदर अर्जाच्या हक्कावरुन लागलीच पुरावा घेउन त्याचा हक्क शाबीत दिसल्यास अर्जदाराचा अर्ज मंजुर करण्यात येईल.

आज दिनांक / ०९/ २०२६ रोजी न्यायालयाचे सही व शिक्क्यानिशी दिले.

पुढील तारीख :- २६/१०/२०२६.

**क. लिपीक** शिक्का **आदेशावरुन सहा. अधिक्षक, फौजदारी न्यायालय, गेवराई.**

# ज्येष्ठ अभिनेते, नटसम्राट नाना पाटेकर यांच्या निधनाने व्यक्तिगत हानी

## शेतकऱ्यांच्या मदतीसाठी नानांचे काम कायम स्मरणात - उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे

मुंबई ।प्रतिनिधी

रंगभूमी आणि चित्रपट क्षेत्रात अभिनयाची उत्तुंग शिखरे गाठणाऱ्या, संवादफेकीपासून मुद्राभिनयापर्यंत प्रत्येक बाबतीत स्वतःची स्वतंत्र शैली निर्माण करणाऱ्या व प्रखर सामाजिक जाणिवा जपणाऱ्या नाना पाटेकर यांचे अकल्पित निधन हा चित्रपटसृष्टीसाठी, महाराष्ट्रासाठी आणि वैयक्तिक माझ्यासाठी फार मोठा धक्का आहे. गेल्याच आठवड्यात अनंत चतुर्थीच्या दिवशी नानांच्या पुण्याच्या घरी गणपती दर्शनाच्या वेळेस झालेली भेट ही शेवटची ठरली, अशी शोकभावना उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी व्यक्त करताना नानांच्या आठवणींना उजाळा दिला.

उपमुख्यमंत्री श्री. शिंदे आपल्या शोकसंदेशात म्हणाले, नाना पाटेकर हे अभिनयाची एक जिवंत शाळा होते. 'नटसम्राट' चित्रपटातील त्यांचे संवाद आजही प्रेक्षकांच्या कानात घुमतात. चित्रपटाच्या पडद्यावर ते जितके भारदस्त असायचे, तितकेच खऱ्या आयुष्यात ते अत्यंत साधे आणि जमिनीवर असणारे व्यक्ती होते.

नाना पाटेकर यांनी 'नाम फाउंडेशन'च्या माध्यमातून शेतकरी आणि दुष्काळग्रस्त कुटुंबांसाठी केलेले काम विशेष उल्लेखनीय आहे. संकटात सापडलेल्या शेतकरी कुटुंबांना आधार देण्यासाठी त्यांनी स्वतः पुढाकार घेतला. समाजातील सामान्य माणसाशी त्यांची नाळ कायम जोडलेली होती. शेतकऱ्यांच्या प्रश्नांबद्दल त्यांना असलेली तळमळ आणि मदतीसाठी त्यांनी केलेले काम महाराष्ट्र कधीही विसरणार नाही.

नाना पाटेकर यांच्यासोबतच्या वैयक्तिक आठवणींना उजाळा देताना उपमुख्यमंत्री शिंदे म्हणाले, पुण्यातील त्यांच्या घरी गणपती दर्शनाला मी दरवर्षी जायचो. नानांचे आदरातिथ्य मनमिळाऊ स्वभाव जवळून अनुभवता यायचा. त्यांच्याशी गप्पा मारणे आणि त्यांचे मार्गदर्शन घेणे हा नेहमीच एक सुखद अनुभव राहिला आहे. आमच्या दरे येथील निवासस्थानी नानांनी भेट दिली होती शेतीची पाहणी केली गाळ उपसण्याच्या कामासाठी देखील ते आले होते. खासगी भेटीत ते माझ्या पाठीवर हात ठेवून काय क्रांतिवीर... अशी त्यांनी दिलेली साद आणि ती कौतुकाची थाप मी कधीच विसरू शकत नाही. त्या शब्दांनी जनतेसाठी अधिक काम करण्याची ऊर्जा दिली, अशा शब्दात उपमुख्यमंत्र्यांनी नानांच्या आठवणींना उजाळा दिला.आपल्या कलेचा उपयोग समाजासाठी करणारे ते एक संवेदनशील व्यक्तिमत्त्व होते. रंगभूमी, मराठी आणि हिंदी चित्रपटसृष्टीत त्यांनी आपल्या दमदार अभिनयाची वेगळी ओळख निर्माण केली. 'नटसम्राट'सारख्या भूमिकेतून त्यांनी अभिनयाची ताकद दाखवून दिली. नाना पाटेकर यांनी रंगभूमी आणि चित्रपटसृष्टीला दिलेले योगदान आणि त्यांचे सामाजिक कार्य नव्या पिढीला नेहमीच प्रेरणा देत राहील.

नाना पाटेकर हे केवळ उत्तम अभिनेते नव्हते, तर त्यांच्या अभिनयातील सहजता, आवाजातील ताकद आणि भूमिकेत पूर्णपणे झोकून देण्याची वृत्ती कायम स्मरणात राहील. नानांच्या निधनाने मराठी आणि हिंदी चित्रपटसृष्टीतील एक मोठी पोकळी निर्माण झाली आहे. आपल्या अभिनयाने आणि सामाजिक कार्याने त्यांनी निर्माण केलेले स्थान कायम राहील.

महाराष्ट्राचा बुलंद, बाणेदार आवाज शांत झाला आहे. मी एक सच्चा, दिलदार मित्र गमावला आहे. ही हानी कधीही भरून न येणारी आहे. त्यांच्यासारखा अभिनेता शतकातून एकदाच जन्माला येतो. काश्मीरमधील मुलांसाठी शाळा सुरू करण्याचं त्यांचं अखेरचं स्वप्न होतं, ते पूर्ण करण्यासाठी सर्वतोपरी मदत करणे हे मी माझे कर्तव्य समजतो. तीच नाना पाटेकर यांना खरी श्रद्धांजली ठरेल. नानांचे कुटुंबीय, मित्रपरिवार आणि असंख्य चाहत्यांच्या दुःखात सहभागी असल्याचे उपमुख्यमंत्री शिंदे यांनी आपल्या शोकसंदेशात म्हटले.

# पत्रकार सतीश मुजमुले यांना पितृशोक

वडवणी ।प्रतिनिधी

महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ, मुंबई संलग्न डिजिटल मीडिया वडवणी तालुका अध्यक्ष तथा पत्रकार सतीश बप्पा मुजमुले यांचे वडील भानुदास (तात्या) यशवंता मुजमुले यांचे बुधवार, दि. ७ ऑक्टोबर २०२६ रोजी दुःखद निधन झाले आहे. पुसरा या त्यांच्या गावी रात्री उशिरा शोकाकुल वातावरणात अंत्यसंस्कार करण्यात आले.



वडवणी तालुक्यातील पुसरा येथील रहिवासी आता ज्येष्ठ नागरिक भानुदास (तात्या) मुजमुले यांचे बीड येथील हॉस्पिटलमध्ये उपचारा दरम्यान दुःखद निधन झाले. ते वडवणी तालुक्यामध्ये व परिसरामध्ये अत्यंत मनमिळावू व प्रेमळ स्वभावाचे म्हणून ओळखले जात होते. त्यांच्या निधनाने मुजमुले परिवारावर दुःखाचा डोंगर कोसळला असून, नातेवाईक, मित्रपरिवार तसेच पत्रकारिता क्षेत्रातून हळहळ व्यक्त होत आहे.त्यांच्या पश्चात तीन मुले यांच्यासह मुली, सुना, नातवंडे असा मोठा परिवार आहे. मुजमुले कुटुंबीयावर कोसळलेल्या या दुःखात दैनिक समर्थ राजयोग आणि महाराष्ट्राच्या पत्रकार संघ मुंबई व महाराष्ट्र राज्य डिजिटल मीडिया मुंबई सहभागी आहे.

# अनु. जाती-जमातीच्या शेतकऱ्यांनो, ठिबक-तुषारसाठी महाडीबीटीवर अर्ज करा

बीड (जिमाका)

राष्ट्रीय कृषी विकास योजना प्रती थेंब अधिक पीक योजने अंतर्गत ठिबक तुषार घटकांसाठी महाडिबीटी पोर्टलवर अनु.जाती व अनु. जमाती प्रवर्गातील शेतकऱ्यांकरिता ९० टक्के पर्यंत अनुदान उपलब्ध आहे.

अनुदानाच्या मर्यादा अल्प व अत्यल्प भूधारक (२ हेक्टर पर्यंत क्षेत्र) असलेल्या शेतकरी वार्गासाठी राष्ट्रीय कृषी विकास योजना प्रति थेंब अधिक पीक योजनेसाठी ५५ टक्के, मुख्यमंत्री श्वास सिंचन योजनेसाठी २५ टक्के तर बिरसा मुंडा कृषी क्रांती योजना डॉक्टर बाबासाहेब कृती स्वावलंबन योजनेसाठी १० टक्के आहे. या घटकांवर एकूण ९० टक्के अनुदान उपलब्ध आहे.तर बहु भूधारक (२ हेक्टर पेक्षा जास्त क्षेत्र) असलेल्या शेतकरी वार्गासाठी राष्ट्रीय कृषी विकास योजना प्रति थेंब अधिक पीक योजनेसाठी ४५ टक्के, मुख्यमंत्री श्वास सिंचन योजनेसाठी ३० टक्के, तर बिरसा मुंडा कृषी क्रांती योजना डॉक्टर बाबासाहेब कृती स्वावलंबन योजनेसाठी १५टक्के आहे. या घटकांवर एकूण ९० टक्के अनुदान उपलब्ध आहे.तरी जास्तीत जास्त शेतकऱ्यांनी या योजनेचा लाभ घ्यावा. असे, आवाहन सुभाष साळवे जिल्हा अध्यक्ष कृषी अधिकारी बीड यांनी केले आहे.



# कालिकादेवी विद्यालयात 'श्री कालिका पॅटर्न परीक्षा' संपन्न

शिरूर कासार ।प्रतिनिधी

आदर्श शिक्षण संस्था बीड द्वारा संचालित कालिकादेवी माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय,शिरूर (का.) जि. बीड येथे,विद्यालयाचे प्राचार्य केशव भांगे साहेब यांच्या संकल्पनेतून विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक गुणवत्ता वाढीसाठी दरवर्षी राबविण्यात येत असलेला 'श्री कालिका गुणवत्ता पॅटर्न' यानुसार चालू शैक्षणिक वर्षामधील इयत्ता ५ वी ते १२ वी वर्गातील सर्व विद्यार्थ्यांची आणि सर्वच विषयाची नियमित होणारी 'श्रीकालिका पॅटर्नची परीक्षा' घेण्यात आली.

आधुनिक युगात विविध क्षेत्रात गुणवत्ता चाचणी परीक्षा घेतली जाते.अशा परीक्षेला विद्यार्थ्यांना अनेक वेळा सामोरे जावे लागते.त्या दृष्टीने विद्यार्थ्यांच्या भवितव्याचा विचार करता एक दूर दृष्टिकोन लक्षात घेऊन भविष्यात सीईटी, जेईई, नीट, नर्सिंग, आयसर, बाल वैज्ञानिक, डिप्पर, ऑलिम्पियाड, शिष्यवृत्ती,सैन्य भरती, पोलीस भरती तसेच पदवीनंतर अभ्यासक्रमासाठीची सीईटी, सेट-नेट, पेट, टीईटी, पीएच.डी.,एमपीएससी, यूपीएससी, आयपीएस,आयएएस इत्यादी स्पर्धा परीक्षेच्या धरतीवर 'श्री कालिका पॅटर्न'ची परीक्षा घेतली जाते.गेल्या वर्षी या उपक्रमामुळे शिरूर तालुक्यात व पंचक्रोशीत सर्वत्र कौतुक झाले.विद्यार्थ्यांनी पण विविध क्षेत्रात प्राविण्य मिळविले.त्यामुळे आदर्श शिक्षण संस्थेचा विभागीय पातळीवर लौकिक वाढत गेला.म्हणून यावर्षी प्रथम सत्रातील विद्यार्थ्यांना शिकवून झालेल्या अभ्यासक्रमावर आधारित 'श्री कालिका पॅटर्नची परीक्षा' प्राचार्य केशव भांगे साहेब यांच्या निरीक्षणाखाली सुरळीत पार पडली.या परीक्षेतून गुणवत्तापूर्ण विद्यार्थ्यांची निवड करून त्यांना प्रोत्साहनपर बक्षीसे देण्यात येणार आहेत.या परीक्षेसाठी विद्यालयातील उपप्राचार्य, उपमुख्याध्यापक, पर्यवेक्षक, परीक्षा प्रमुख, सर्व विभागाचे विभाग प्रमुख, विषय शिक्षक, कनिष्ठ प्राध्यापक, शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी यांचे मोलाचे सहकार्य लाभले आहे.

# बुलढाणा अर्बनच्या धर्माबाद शाखेत व्यापारी बांधव व शेतकरी बांधव यांच्याशी. सुकेश झंवर यांचा संवाद

## दुष्काळी परिस्थितीत व्यापारी व शेतकरी बांधवांच्या पाठीशी बुलढाणा अर्बन खंबीरपणे उभी राहणार - डॉ. सुकेश झंवर

धर्माबाद ( अशोक पडोळे )

धर्माबाद शहरातील राजाराम काकांनी शाळेत बुलढाणा अर्बन क्रेडिट को-ऑपरेटिव्ह सोसायटी लिमिटेड, बुलढाणा ही सहकार क्षेत्रातील विश्वासार्ह संस्था म्हणून ग्राहक व सभासदांना सातत्याने सेवा देत आहे. संस्थेचे नूतन अध्यक्ष डॉ. सुकेश झंवर यांच्या धर्माबाद दौऱ्यादरम्यान विविध उपक्रमांचा आढावा घेण्यात आला. यावेळी त्यांनी राजाराम काकानी सहकार विद्या मंदिर उइडए शाळा, गोदाम, कोल्ड स्टोरेज तसेच बुलढाणा अर्बन मोंढा शाखेला भेट देऊन येथील कामकाजाची माहिती घेतली व धर्माबाद येथील कार्याचे मनापासून कौतुक केले.

यानंतर धर्माबाद येथील व्यापारी व शेतकरी बांधवांसोबत आयोजित बैठकीत डॉ. सुकेश झंवर यांनी व्यापारी क्षेत्रातील विविध प्रश्नांवर सविस्तर चर्चा केली. दुष्काळी परिस्थितीत व्यापारी व शेतकरी बांधवांच्या पाठीशी बुलढाणा अर्बन खंबीरपणे उभी आहे आणि भविष्यातही व्यापारी बांधवांना आवश्यक ते सहकार्य करण्याची संस्थेची भूमिका कायम राहील, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

सभासदांनी संस्थेवर ठेवलेला विश्वास हीच बुलढाणा अर्बनच्या यशस्वी वाटचालीची खरी ताकद आहे. बुलढाणा अर्बन यापूर्वीही व्यापारी व शेतकरी बांधवांसोबत होती, आजही आहे आणि भविष्यातही व्यापारी बांधवांच्या सोबत ठामपणे राहील, असे डॉ. सुकेश झंवर यांनी यावेळी सांगितले.

सदर बैठकीचे आयोजन नांदेड व्यापारी असोसिएशनचे अध्यक्ष सुबोध काकानी यांच्या उपस्थितीत करण्यात आले होते. बैठकीचे संपूर्ण नियोजन नांदेड विभाग-१ व विभाग-२ चे विभागीय व्यवस्थापक प्रफुल्ल संचेती सर व प्रदीप सूर्यवंशी सर यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले.

या बैठकीस आडत व्यापारी व शेतकरी आनंद पाटील शिंदे, बापूराव



पाटील कदम, शेख इलियास भाई, युवा उद्योजक निकुंज काकानी, गोपाल बियाणी, मोहमद आयनोदीन, संभाजी गांगुली, कमल किशोर राठी, राज गोपाल झंवर. रमाकांत चक्करवार , जी. राजरेड्डी, माधव बिजमवार, मन्मथ अप्पासाहेब स्वामी, पांडुरंग पाटील पांगरीकर, रूपचंद झंवर, दिनेश पाटील कदम, दीपक दुबे, रामेश्वर सावळे तसेच पत्रकार बांधव यांची प्रमुख उपस्थिती होती.या कार्यक्रमाला बुलढाणा अर्बन शाखा व्यवस्थापक नांदेड वरिष्ठ शाखा व्यवस्थापक भरत चव्हाण, नायगाव शाखा व्यवस्थापन साईनाथ सूर्यवंशी व धर्माबाद मुख्य शाखा व्यवस्थापक संजय घोंगडे सराफा धर्माबाद व्यवस्थापक महादेव कागेरु सह स्थानिक कर्मचारी अल्प बचत प्रतिनिधी यांची उपस्थिती लाभली.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन रंगनाथ ठाकर यांनी केले. बैठकीस उपस्थित राहून सहकार्य केल्याबद्दल प्रदीप सूर्यवंशी यांनी सर्व व्यापारी बांधवांचे आभार मानले.व्यापारी व शेतकरी ग्राहक बांधव आणि बुलढाणा अर्बन यांच्यातील विश्वासाचे नाते अधिक दृढ करण्याच्या दृष्टीने ही बैठक महत्त्वपूर्ण ठरली.

# दुस-या दिवशीही रणकंदन

नवी दिल्ली : वृत्तसंस्था

मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांच्या विरोधात आज दिल्लीत विरोधी पक्षांनी पुन्हा आंदोलनाचे हत्यार उपसले. राहुल गांधी आणि इंडिया आघाडीचे नेते बसने जंतरमंतरकडे निघाले होते. परंतु पोलिसांनी त्यांना अडवले. त्यानंतर पोलिसांनी राहुल आणि प्रियंका गांधी यांना बसमूधन खाली उतरवले. घटनास्थळी मोठी गर्दी जमली. जंतरमंतरवर आंदोलन करण्यावर विरोधक ठाम राहिले. त्यामुळे राहुल गांधींसह खासदार आणि नेतेमंडळींना दिल्ली पोलिसांनी ताब्यात घेतले. रस्त्यावर झोपून रास्ता रोको करण्याचा प्रयत्न करणा-या प्रियंका गांधी आणि इतर महिला खासदार आंदोलकांनाही पोलिसांनी ताब्यात घेतले आणि आंदोलनस्थळापासून दूर नेले.

काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे यांच्या निवासस्थानी आज इंडिया आघाडीच्या खासदारांसाठी स्नेहभोजनाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. त्यानंतर हे सर्व खासदार ३ बस भरून २०० पेक्षा जास्त खासदार दिल्लीच्या जंतरमंतर मैदानाकडे निघाले. परंतु या मैदानापासून १०० मीटर अंतरावर पोलिसांनी या बस अडवल्या. पोलिसांनी राहुल गांधींना आंदोलन करण्यापासून अटकाव केल्यानंतर राहुल गांधींनी त्याच ठिकाणी ठिय्या मांडला. प्रियंका गांधीही यावेळी रस्त्यावर आडव्या पडल्या. पोलिसांनी आपल्यासह इतर खासदारांना मारहाण केल्याचा आरोपही त्यांनी केला.जंतरमंतरवर जाणा-या बसेस रोखल्याने काँग्रेस कार्यकर्त्यांनी तीव्र संताप व्यक्त झाला. पोलिसांनी बसेस अडविण्यासाठी बॅरिकेटिंग केले आणि काही बसेसच्या टायरमधील हवाही काढल्याचे समोर आले. सुमारे दीड तास बसेस पुढे सरकत नसल्याने राहुल गांधी, प्रियंका गांधी आणि इतर खासदार बसमधून खाली उतरले. त्यांनी पायीच जंतरमंतरकडे जाण्याचा प्रयत्न केला. मात्र, पोलिसांनी त्यांनाही बॅरिकेटिंग करून पुढे जाण्यापासून रोखले.या परिस्थितीनंतर राहुल गांधी आणि प्रियंका गांधी यांनी कार्यकर्त्यांना त्याच ठिकाणी ठिय्या देण्याचे आवाहन केले. त्यानंतर काँग्रेसचे कार्यकर्ते आणि इंडिया आघाडीचे खासदार अडवलेल्या ठिकाणीच ठिय्या देऊन बसले. दरम्यान, पोलिसांनी राहुल गांधींना आंदोलन करू नये, यासाठी मनधरणी करण्याचा प्रयत्न केला. मात्र राहुल गांधी आंदोलनावर ठाम होते. त्यानंतर दिल्ली पोलिसांनी त्यांना ताब्यात घेतले. आधी राहुल गांधी यांना ताब्यात घेतले. त्यानंतर प्रियंका गांधी यांच्यासह इतर खासदारांनाही पोलिसांनी ताब्यात घेतले.



# शिक्षणाधिकाऱ्यांच्या लॉगिनवरील वेतन मंजुरीचा 'टॅब' तातडीने सुरु करा - मोहम्मद अझरुद्दीन

**शिक्षक-शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे सप्टेंबरचे प्रलंबित वेतन सणासुदीपूर्वी जमा करण्याची मागणी**

बीड, प्रतिनिधी : बीड जिल्ह्यातील अल्पसंख्याक व बिगर अल्पसंख्याक संस्थांमधील प्राथमिक व माध्यमिक शाळांतील शिक्षक तसेच शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे सप्टेंबर महिन्याचे वेतन अद्यापही प्रलंबित आहे. शिक्षणाधिकाऱ्यांच्या लॉगिनवर उपलब्ध असलेला वेतन देयक मंजुरीचा ऑनलाइन 'टॅब' (बटण) तांत्रिक कारणामुळे बंद असल्याने वेतन देयके मंजूर होऊ शकलेली नाहीत.



आगामी काळात घटस्थापना, नवरात्रोत्सव तसेच दिवाळीसारखे सण येत आहेत. त्यामुळे शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांवर घरखर्च, कर्जाचे हप्ते, वैद्यकीय खर्च तसेच अन्य अत्यावश्यक आर्थिक जबाबदाऱ्या पार पाडण्याचे मोठे आव्हान निर्माण झाले आहे. वेतन रखडल्यामुळे कर्मचाऱ्यांना आर्थिक अडचणींचा सामना करावा लागत आहे.

या पार्श्वभूमीवर संबंधितांनी प्रशासनाकडे तातडीने मागणी केली आहे की, वरिष्ठ अधिकारी तसेच संबंधित तांत्रिक विभाग आणि शासन स्तरावर तातडीने पाठपुरावा करून शिक्षणाधिकाऱ्यांच्या लॉगिनवरील वेतन देयक मंजुरीचा 'टॅब' त्वरित सुरू करण्यात यावा.

तसेच बीड जिल्ह्यातील अल्पसंख्याक व बिगर अल्पसंख्याक सर्व संस्थांमधील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे सप्टेंबर महिन्याचे प्रलंबित वेतन सणासुदीपूर्वी त्यांच्या बँक खात्यात जमा करण्यात यावे, अशी मागणी शेख अझरुद्दीन यांनी केली आहे.कर्मचाऱ्यांची आर्थिक अडचण लक्षात घेऊन प्रशासनाने या गंभीर बाबीची तातडीने दखल घेत सकारात्मक निर्णय घ्यावा, अशी अपेक्षा व्यक्त करण्यात आली आहे.

# सरकारच्या तिजोरीवर शेतक-यांचा पहिला हक्क : उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे

परभणी : संपूर्ण मराठवाडा दुष्काळाच्या सावटाखाली सापडला आहे. दुष्काळाचे राजकारण करण्याची ही वेळ नाही. शेतक-यांच्या पाठीशी भक्कमपणे कसे उभे राहता येईल यासाठी प्रत्येकाने पुढाकार घेतला पाहिजे. सरकारच्या तिजोरीवर शेतक-यांचा पहिला हक्क आहे. त्यामुळे आपत्कालीन स्थितीत शेतक-यांना मदतीचा हात देण्यासह कष्टक-यांच्या पाठीशी भक्कमपणे उभे राहण्याचा संकल्प राज्य व केंद्र सरकारने सोडला आहे. शेतक-यांची दिवाळी काळी होऊ देणार नाही, अशी ग्वाही राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिली.

परभणीतील स्टेडिअम मैदानावर बुधवार, दि.७ ऑक्टोबर रोजी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या सार्वजनिक जीवनातील २५ वर्षांच्या सेवापूर्ती निमित्त आयोजित गौरव अभियानाच्या अंतर्गत परभणी जिल्ह्यातील दुष्काळग्रस्त शेतकरी, गरजू कुटुंबांच्या मदतीसाठी शिवसेनेद्वारे विशेष उपक्रम राबविण्यात आला. याप्रसंगी उपमुख्यमंत्री शिंदे बोलत होते. यावेळी आयोजक तथा खा. संजय जाधव, खा.



नागेश पाटील आष्टीकर, आ. संतोष बांगर, संपर्क प्रमुख आनंद जाधव, आ. सईद खान, माजी खा. सुरेश जाधव, माजी आ. हरिभाऊ लहाने, प्रथम महापौर प्रताप देशमुख, जिल्हाप्रमुख आनंद भरोसे, जिल्हाप्रमुख विशाल कदम, ज्येष्ठ नेते भास्कर लंगोटे, राजू कापसे, सखुबाई लटपटे, अतूल सरोदे आदी उपस्थित होते.

हे पत्रक मालक,मुद्रक,प्रकाशक,संपादक वैभव विवेक स्वामी यांनी इंद्रधनुष्य प्रिंटिंग ॲण्ड पब्लिशर्स,सावता माळी चौक,मोंढा रोड,बीड,जिल्हा बीड येथे छापून दैनिक समर्थ राजयोग कार्यालय,छत्रपती कॉलनी,तहसील बॅक साईड,क्रांती नगर, बीड,जिल्हा बीड - ४३ ११ २२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.

THIS NEWSPAPERS IS PRINTED BY OWNER , PRINTER, PUBLISHER, EDITOR VAIBHAV VIVEK SWAMI AT ENDRADHANUSHYA PRINTING AND PUBLISHERS, SAVATA MALI CHOWK, MONDHA ROAD, BEED. DIST. BEED AND PUBLISHED AT. THE OFFICE OF DAINIK SAMARTH RAJYOG, CHATRAPATI COLONY, TAHASHIL BACK SIDE, KRANTI NAGAR, BEED, DIST. BEED-431122 ( MAHARSHTRA ).

# लग्नाआधी एकमेकांना जाणून घ्या कारण प्रश्न दोन आयुष्यांचा आहे..!

## विवाहाचा निर्णय केवळ रूप, पैसा, नोकरी किंवा कुटुंब पाहून घेऊ नका ? संवाद, विश्वास, पारदर्शकता आणि परस्पर सन्मानाला द्या प्राधान्य..!!

पुणे पिंपरी ।प्रतिनिधी

लग्न हे दोन व्यक्तींच्या आयुष्यातील अत्यंत महत्त्वाचे, नाजूक आणि पवित्र नाते आहे. दोन वेगवेगळ्या व्यक्ती एकमेकांना स्वीकारून आयुष्यभराचा सहवास सुरू करतात. त्यामुळे विवाहाचा निर्णय केवळ रूप, पैसा, नोकरी, शिक्षण किंवा कुटुंबाची पार्श्वभूमी पाहून घाईघाईने घेऊ नये. चुकीचा निर्णय झाल्यास त्याचा परिणाम केवळ एका व्यक्तीवर नव्हे, तर दोन व्यक्ती आणि दोन कुटुंबांच्या आयुष्यावर होऊ शकतो. त्यामुळे लग्नाआधी मुलाने मुलीला आणि मुलीने मुलाला समजून घेणे अत्यंत आवश्यक आहे.

पहिल्या भेटीत दोघांनाही संकोच, भीती किंवा दबाव जाणवू शकतो. काय बोलावे, कुठून सुरुवात करावी, समोरच्याला आपल्या बोलण्याचा काय अर्थ वाटेल, असे प्रश्न मनात असतात. मात्र पहिल्याच भेटीत सर्व काही समजणे शक्य नसते. त्यामुळे शक्य तितक्या मोकळेपणाने संवाद साधणे, एकमेकांचे विचार जाणून घेणे आणि भविष्यातील अपेक्षांवर प्रामाणिकपणे चर्चा करणे गरजेचे आहे.

लग्नाआधी 'या' विषयांवर नक्की बोला

विवाहाचा निर्णय घेण्यापूर्वी दोघांनी शिक्षण, नोकरी, करिअर, आर्थिक नियोजन, कुटुंबीय जबाबदाऱ्या, मुलांबाबतचे विचार, आवडी-निवडी, जीवनशैली, आरोग्य, भूतकाळ आणि व्यसनांबाबत मोकळेपणाने चर्चा करावी. लग्नाचा निर्णय दोघांचा असल्याने एकमेकांना जाणून घेण्याची, प्रश्न विचारण्याची, उत्तरे देण्याची आणि अंतिम निर्णय घेण्याची जबाबदारीही दोघांचीच आहे.

नात्यात संशयापेक्षा विश्वास महत्त्वाचा

लग्नानंतर गैरसमज किंवा परिस्थितीमुळे संशय निर्माण होऊ शकतो; मात्र सततचा संशय नात्यातील विश्वास कमकुवत करतो. दोघांनाही आपल्या आई-वडिलांसोबत वेळ घालवणे, मित्र-मैत्रिणींना भेटणे, छंद जोपासणे आणि स्वतःची आवड जपण्याची मोकळीक असावी. मात्र स्वातंत्र्याबरोबर प्रामाणिकपणा, पारदर्शकता, विश्वास आणि परस्पर सन्मानही आवश्यक आहे.

विवाहापूर्वी पूर्वीचे लग्न, गंभीर नातेसंबंध, मोठ्या आर्थिक किंवा कायदेशीर जबाबदाऱ्या तसेच कोणतेही व्यसन यांसारख्या वैवाहिक जीवनावर परिणाम करणाऱ्या महत्त्वाच्या बाबी लपवू नयेत. नाते खोट्यावर टिकत नाही; ते प्रामाणिकपणा, विश्वास, संवाद आणि परस्पर सन्मानावर टिकते.

आर्थिक बाबतीतही पारदर्शकता आवश्यक

दोघांनीही आपले उत्पन्न, बचत, कर्ज, हप्ते, घरखर्च, गुंतवणूक, भविष्यातील आर्थिक उद्दिष्टे आणि कुटुंबीय जबाबदाऱ्या याबाबत स्पष्टपणे बोलणे आवश्यक आहे. मुलीच्या पगारावर पती किंवा सासरच्या मंडळींचा मालकी हक्क असण्यापेक्षा परस्पर संमती आणि आर्थिक पारदर्शकता महत्त्वाची आहे. घरखर्च, बचत, गुंतवणूक, कुटुंबाला मदत आणि भविष्यासाठी निधी याबाबत दोघांनी मिळून निर्णय घ्यावा. हेच तत्त्व मुलाच्या उत्पन्नालाही लागू होते.

करिअर आणि घरकामाची जबाबदारी दोघांची

लग्नानंतर मुलीचे करिअर, नोकरी, व्यवसाय किंवा पुढील शिक्षणाबाबत काय अपेक्षा आहेत, तसेच मुलाच्या करिअरबाबत मुलीच्या अपेक्षा काय आहेत, यावर स्पष्ट चर्चा व्हावी. एकमेकांच्या स्वप्नांना आणि ध्येयांना साथ देणे हा वैवाहिक सहजीवनाचा महत्त्वाचा भाग आहे. त्याचप्रमाणे स्वयंपाक, साफसफाई, खरेदी, घराची देखभाल आणि बाहेरील कामे यांची जबाबदारी केवळ एका व्यक्तीवर टाकू नये. घर दोघांचे असेल तर घराची जबाबदारीही दोघांची असावी.

दोन्ही कुटुंबांचा आदर, पण वैवाहिक निर्णयांत दोघांचे स्वातंत्र्य..

लग्नानंतर मुलाने मुलीच्या आणि मुलीने मुलाच्या आई-वडिलांप्रती असलेल्या जबाबदाऱ्या समजून घ्याव्यात. भविष्यात पालकांना आरोग्य, आर्थिक किंवा अन्य मदतीची गरज भासल्यास दोघांनी मिळून मार्ग काढण्याची तयारी ठेवावी. त्याचवेळी दोन्ही कुटुंबांचा आदर राखतानाच पती-पत्नीच्या वैयक्तिक निर्णयांची सीमाही स्पष्ट असावी. सल्ला आणि हस्तक्षेप यातील फरक समजून घेणे आवश्यक आहे.

आरोग्य, मुले आणि वैयक्तिक स्वातंत्र्याबाबत आधीच चर्चा करा..

वैवाहिक जीवनावर परिणाम करणाऱ्या महत्त्वाच्या आरोग्यविषयक बाबी लपवू नयेत. हा संवाद चौकशी, अपमान किंवा दोष देण्याच्या पद्धतीने नव्हे, तर संवेदनशीलता, आदर आणि प्रामाणिकपणाने व्हावा. तसेच मुलांबाबतचे विचार, योग्य वेळ, पालकत्वाची जबाबदारी, करिअर आणि मुलांच्या संगोपनाबाबतच्या अपेक्षा लग्नाआधीच स्पष्ट करणे योग्य आहे.

लग्न म्हणजे व्यक्तिमत्त्व गमावणे नव्हे. दोघांनाही मित्र-मैत्रिणी, आई-वडील, छंद, करिअर आणि वैयक्तिक वेळ यासाठी आवश्यक जागा असावी. मोबाईल, सामाजिक माध्यमे, संकेतशब्द आणि खासगीपणाबाबतही दोघांनी विवाहापूर्वीच परस्परांच्या मर्यादा ठरवाव्यात.



लेखिका
**प्रा. दिपाली नारायण बागनाईक,**
भूगोल प्राध्यापिका व लेखिका
डॉ. डी. वाय. पाटील आर्ट्स, कॉमर्स अँड सायन्स कनिष्ठ महाविद्यालय,
पिंपरी, पुणे - १८

मोठे निर्णय 'मी' नव्हे, 'आपण' घेणार

घर घेणे, कर्ज घेणे, नोकरी बदलणे, व्यवसाय सुरू करणे, शहर किंवा देश बदलणे अथवा मोठी गुंतवणूक करणे यांसारखे निर्णय शक्यतो दोघांच्या चर्चेतून घेतले जावेत. संसारात सतत 'माझेच म्हणणे अंतिम' अशी भूमिका नको. मोठ्या निर्णयांत चर्चा, समजूत आणि परस्पर संमती महत्त्वाची आहे. संसारात 'मी'पेक्षा 'आपण' महत्त्वाचे आहे.

गंभीर शंका असल्यास लग्नाचा निर्णय पुन्हा विचारात घ्या

लग्न ठरले आहे म्हणून लग्न करणे अनिवार्य नाही. एखादी गंभीर बाब समोर आली किंवा मूलभूत मतभेद जाणवले, तर दोघांनी शांतपणे विचार करून निर्णय घ्यावा. 'हो' म्हणण्यापूर्वी विचार करण्याचा आणि निर्णय घेण्याचा अधिकार दोघांनाही आहे. पुढील पाच ते दहा वर्षांतील घर, करिअर, व्यवसाय, प्रवास, बचत, कुटुंब, पालकांची जबाबदारी आणि वैयक्तिक विकास याबाबतही आधीच चर्चा करणे आवश्यक आहे.

संशय निर्माण झाला तर आरोप नको, संवाद हवा

सोशल मीडियावरील एखादा फोटो, पोस्ट, संदेश किंवा मित्र-मैत्रिणीसोबतचे संबंध पाहून लगेच संशय घेण्याऐवजी प्रथम संवाद साधावा. समोरच्याचे म्हणणे ऐकावे, परिस्थिती समजून घ्यावी आणि सत्य जाणून घ्यावे. कारण नाते संशयाने नव्हे, तर संवादाने मजबूत होते.

गैरसमज किंवा संशय निर्माण झाल्यास तो मनात साठवून ठेवण्याऐवजी शांतपणे बोलावे. अपूर्ण माहिती, अफवा किंवा अंदाजावर निर्णय घेऊ नये. वैयक्तिक मर्यादा आणि खासगीपणाचा आदर करावा. स्पष्टीकरण मिळाल्यानंतर त्याच विषयाची पुन्हा पुन्हा चौकशी करणे, फोन तपासणे किंवा सतत नियंत्रण ठेवणे हा विश्वास निर्माण करण्याचा मार्ग नाही.

'हो' म्हणण्यापूर्वी स्वतःलाच एक प्रश्न विचारा.!

आपण लग्न का करत आहोत ? समाजासाठी ?

कुटुंबाच्या दबावासाठी ?

एकटेपणामुळे ? की खरंच एकमेकांसोबत आयुष्याचा प्रवास करण्यासाठी ?

या प्रश्नाचे उत्तर प्रत्येकाने सर्वप्रथम स्वतःच्या मनात प्रामाणिकपणे शोधणे गरजेचे आहे. लग्नाआधी विचार करा, मनमोकळेपणाने बोला, अपेक्षा स्पष्ट करा, आर्थिक बाबींवर चर्चा करा, आरोग्यविषयक महत्त्वाच्या गोष्टी लपवू नका, भूतकाळाबाबत प्रामाणिक रहा, व्यसन लपवू नका, करिअर आणि मुलांबाबत बोला, कौटुंबिक जबाबदाऱ्या समजून घ्या आणि एकमेकांच्या स्वातंत्र्याचा व 'नाही' म्हणण्याच्या अधिकाराचा आदर करा.

कारण लग्न हा केवळ दोन कुटुंबांचा सोहळा नाही तो दोन व्यक्तींच्या संपूर्ण आयुष्याचा निर्णय आहे. 'हो' म्हणण्याआधी एकमेकांना जाणून घ्या कारण लग्नाचा दिवस एक असतो, पण संसाराचा प्रवास आयुष्यभराचा असतो.

# बीडमध्ये विकसित भारत संकल्प सभा व सेवा ज्योती यात्रेचा समारोप

## सेवा संकल्प अभियानांतर्गत पुरस्कारप्राप्त मान्यवरांचा सन्मान, कार्यकर्ते व नागरिकांची मोठी उपस्थिती





बीड ।प्रतिनिधी

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या सार्वजनिक जीवनातील २५ वर्षांच्या कार्यकाळाच्या निमित्ताने भारतीय जनता पक्षाच्या वतीने राबविण्यात येत असलेल्या सेवा संकल्प अभियानांतर्गत बुधवारी बीड येथे विकसित भारत संकल्प सभा तसेच सेवा ज्योती यात्रा आयोजित करण्यात आली. नवगण कॉलेज येथे संकल्प सभा झाल्यानंतर नवगण कॉलेज ते भाजप जिल्हा कार्यालय या मार्गावर सेवा ज्योती यात्रा काढण्यात आली. भाजप जिल्हा कार्यालय येथे यात्रेचा समारोप करण्यात आला.

प्रदेशाध्यक्ष रविंद्र चव्हाण साहेब सूचनेनुसार, लोकनेत्या ना. पंकजाताई मुंडे, बीड प्रभारी प्रदेश महामंत्री भाजप श्री सुनील राणे माजी खासदार डॉ. प्रितमताई मुंडे यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित करण्यात आलेल्या या कार्यक्रमाला विभाग संयोजक तथा प्रमुख वक्ते नितीनजी काळे जिल्हाध्यक्ष शंकर देशमुख यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी मा. बाळराजे पवार, सौ. सारिकाताई क्षीरसागर, माधव तात्या निर्मळ यांच्यासह भाजपचे पदाधिकारी, मंडल अध्यक्ष, कार्यकर्ते व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या प्रारंभी नवगण कॉलेज येथे विकसित भारत संकल्प सभा घेण्यात आली. यावेळी नितीन काळे यांनी मार्गदर्शन करताना नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली भारताची आंतरराष्ट्रीय स्तरावरील प्रतिमा उंचावल्याचे सांगितले. देशाच्या विकासाबरोबरच सेवा, सुशासन आणि गरीब कल्याणाच्या विविध योजनांचा त्यांनी आढावा घेतला.

यावेळी जिल्हाध्यक्ष शंकर देशमुख यांनी नरेंद्र मोदी यांच्या ७ ऑक्टोबर २००१ पासून सुरू झालेल्या सार्वजनिक व संवैधानिक पदावरील कार्याचा आढावा घेतला. ७ ऑक्टोबर २००१ ते ७ ऑक्टोबर २०२६ या २५ वर्षांच्या कालावधीत त्यांनी विविध संवैधानिक पदांवर काम केले असून, सेवा आणि गरीब कल्याणासाठी विविध उपक्रम राबविल्याचे त्यांनी सांगितले.

पंतप्रधान मोदींचे ऑनलाइन मार्गदर्शन..

कार्यक्रमा दरम्यान पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी ऑनलाइन माध्यमातून उपस्थितांना मार्गदर्शन केले. त्यांच्या मार्गदर्शनाचे थेट प्रक्षेपण कार्यक्रमस्थळी करण्यात आले. जिल्हाभरातून आलेले पदाधिकारी, कार्यकर्ते आणि नागरिकांनी ऑनलाइन मार्गदर्शनास उपस्थिती लावली.

सेवा ज्योती यात्रेत कार्यकर्त्यांचा सहभाग..

संकल्प सभेनंतर नवगण कॉलेज ते भाजप जिल्हा कार्यालय या मार्गावर सेवा ज्योती यात्रा पायी काढण्यात आली. विविध पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांनी या यात्रेत उत्स्फूर्त सहभाग घेतला. भाजप जिल्हा कार्यालय येथे यात्रेचा समारोप करण्यात आला.

पुरस्कारप्राप्त मान्यवरांचा गौरव..

सेवा संकल्प अभियानांतर्गत बीड जिल्ह्यातील विविध क्षेत्रांत उल्लेखनीय कार्य केलेल्या पुरस्कारप्राप्त मान्यवरांचा यावेळी सन्मान करण्यात आला.

यामध्ये डॉ. कविता गित्ते यांना केंद्राचा राष्ट्रीय शिक्षक पुरस्कार, सौ. चंद्रकला सारुडेकर यांना राज्याचा क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले आदर्श शिक्षक पुरस्कार, श्री. सय्यद शब्बीर मामू यांना केंद्राचा पद्मश्री पुरस्कार तसेच डॉ. रसिका पारगावकर यांना स्त्रीरोग तज्ज्ञ म्हणून गोल्ड मेडल मिळाल्याबद्दल त्यांचा गौरव करण्यात आला.

पदाधिकारी व कार्यकर्त्यांची उपस्थिती..

यावेळी अल्पसंख्याक मोर्चाचे प्रदेश महामंत्री सलीम जहांगीर, पी. टी. चव्हाण, संजय आंधळे, सौ. सुवर्णा लांबरुड, हिंदूलाल काकडे, रामदास बडे, सौ. मीरा गांधले, गणेश लांडे, गणेश कराड यांच्यासह डॉ. लक्ष्मण जाधव, श्रीकांत सानप, जयश्री मुंडे, अशोक लोढा, रुपाली कचरे, सचिन दाभाडे, राजेश पवार, उद्धव रासकर, अनिल चांदणी आदी उपस्थित होते.तसेच जिल्ह्यातील विविध मंडल अध्यक्ष, पदाधिकारी, कार्यकर्ते आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. सेवा संकल्प अभियानाच्या माध्यमातून आयोजित करण्यात आलेल्या या कार्यक्रमात सेवा, विकास आणि गरीब कल्याणाशी संबंधित विविध विषयांवर मार्गदर्शन करण्यात आले.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शांतीनाथ डोरले यांनी केले, तर संजय आंधळे यांनी आभार मानले.

# डॉ.श्रावण रॅपणवाड यांना 'शिवरत्न जिवाजी महाले शौर्य पुरस्कार २०२६' जाहीर

## सर्वस्तरातून अभिनंदनाचा वर्षाव!



मुखेड ।प्रतिनिधी

काँग्रेस प्रदेश महासचिव डॉ.श्रावण रॅपणवाड यांना त्यांच्या सामाजिक आणि राजकीय क्षेत्रातील उल्लेखनीय कार्याबद्दल प्रतिष्ठित शिवरत्न जिवाजी महाले शौर्य पुरस्कार २०२६ जाहीर करण्यात आला आहे.

गेल्या अनेक वर्षांपासून डॉ.रॅपणवाड यांनी समाजकारण व राजकारणाच्या माध्यमातून समाजातील विविध प्रश्नांना वाचा फोडण्याचे काम केले आहे.त्यांच्या या निष्ठावंत सेवेची आणि कर्तृत्वाची दखल घेऊन त्यांना हा विशेष सन्मान जाहीर करण्यात आला आहे.हा पुरस्कार म्हणजे त्यांच्या सामाजिक व राजकीय वाटचालीला मिळालेली एक अत्यंत प्रेरणादायी पावती मानली जात आहे.

पुरस्कार जाहीर झाल्यानंतर खासदार प्रा.रवींद्र चव्हाण,माजी आमदार हणमंतराव पाटील बेटमोगरेकर,काँग्रेसचे तालुकाध्यक्ष राजीव पाटील रावणगावकर,शहराध्यक्ष हणमंत नारनाळीकर महिला काँग्रेस तालुकाध्यक्ष सौ.पत्रे ताई ओबिसी शहराध्यक्ष प्रकाश निमलवाड,जिल्हा युवक काँग्रेसचे उपाध्यक्ष सुरेश पाटील बेळीकर,जिल्हा सेवादलाचे उपाध्यक्ष विद्याधर अण्णा साखरे,तालुका काँग्रेसचे कार्याध्यक्ष संभाजी पाटील उन्द्रीकर,जिल्हा परिषदेचे माजी सदस्य चंद्रकांत घाटे,जिल्हा युवक काँग्रेसचे सचिव सुनिल पाटील आरगीळे,उपाध्यक्ष बालाजी वाडेकर,युवक काँग्रेस जिल्हा सरचिटणीस सचिन गुद्दे, फिशर काँग्रेसचे अध्यक्ष विठ्ठल पंदीलवाड,अल्पसंख्यांक काँग्रेस विभागाचे शहराध्यक्ष ईमराण पठाण,उद्योग आघाडी शहराध्यक्ष बाळासाहेब आकुलवाड,तालुका युवक काँग्रेसचे उपाध्यक्ष एम.आर.गोपणर,मागासवर्गिय विभाग काँग्रेस शहराध्यक्ष बालाजी साबणे,सुभाष श्रीमंगले,शिवाजी चैनपुरे,शेख रौफ,वलियोद्दीन शेख,पत्रकार संजय कांबळे,पत्रकार राजु बनसोडे,मोहसिन बल्कीसह राजकीय व सामाजिक क्षेत्रातील अनेक मान्यवरांनी डॉ.श्रावण रॅपणवाड यांचे मनःपूर्वक हार्दिक अभिनंदन केले असून त्यांच्या पुढील यशस्वी वाटचालीस उदंड शुभेच्छा दिल्या आहेत.विशेषतः मुखेड शहर काँग्रेस कमिटीच्या वतीने हार्दिक अभिनंदन करण्यात आले.

# मंडळ अधिकारी साखरे तलाठी गायकवाड सस्पेंड

## जिल्हाधिकारी संजयसिंह चव्हाण यांची कारवाई पूर्णा तालुक्यातील कावलगाव मंडळातील सातेफळ गोदा पात्रात अवैध रेती उपशा प्रकरण;महसूल विभागात खळबळ

पूर्णा, प्रतिनिधी:

तालुक्यातील कावलगांव मंडळाचे मंडळ अधिकारी जी.एस.साखरे तसेच सातेफळ, आलेगांव सज्जाच्या तलाठी प्रज्ञा गायकवाड यांना सातेफळ येथील गोदावरी नदीपात्रातून अवैधरीत्या रेती उपसा प्रकरणात कर्तव्यात कसूर केल्याचा ठपका ठेवत जिल्हाधिकारी संजयसिंह चव्हाण यांनी निलंबित केले.तसे आदेश(दि.७) सप्टेंबर रोजी निर्गमित करण्यात आले असल्याची खात्रीलायक माहिती महसूल विभागाच्या सुत्रांनी दिली आहे.या कारवाईमुळे महसूल विभागात खळबळ उडाली आहे.

पुर्णा तालुक्यातील सातेफळ येथील जुने गावठाण, ग क्रमांक १० लगतच्या गोदावरी नदीपात्रात अवैध रेती उपसा होत असल्याची तक्रार मारोती लोखंडे व इतर ग्रामस्थांनी ५ ऑक्टोबर रोजी केली होती. त्यानुसार जिल्हा खनिकर्म अधिकाऱ्यांनी पाहणी केली असता, नदीपात्रात सुमारे १०० ते १२५ ब्रास रेतीचा अवैध साठा आणि पाण्यात रेती उपशा साठी वापरण्यात येणारे आठ ते दहा लहान-मोठे तराफे आढळले होते. घटना स्थळांवरुन पंचनामा करून रेतीसाठा जप्त देखील करण्यात आला होता.

या प्रकरणी तपासणी करीता आलेल्या पथकाने दिलेल्या अहवालानुसार, जिल्हाधिकारी चव्हाण यांनी महाराष्ट्र नागरी सेवा (वर्तणूक) नियम, १९७९ मधील नियम ३ चा भंग करून कर्तव्यात कसूर केल्याचा ठपका ठेवत ७ ऑक्टोबर रोजी महाराष्ट्र




नागरी सेवा (शिस्त व अपील) नियम, १९७९ मधील नियम ४ (१) अन्वये संबंधित मंडळ अधिकारी साखरे व तलाठी गायकवाड निलंबनाचे स्वतंत्र आदेश जारी केले आहेत.निलंबन काळात दोन्ही अधिकाऱ्यांचे मुख्यालय तहसील कार्यालय, पूर्णा येथे राहणार असून, तहसीलदारांच्या पूर्वपरवानगीशिवाय त्यांना मुख्यालय सोडता येणार नाही. तसेच खासगी नोकरी किंवा व्यवसाय करण्यास मनाई करण्यात आली आहे.अवैध रेती उपशाच्या या प्रकरणातील दुहेरी निलंबन कारवाईमुळे तालुक्यातील गौण खनिज उत्खननावर नियंत्रण ठेवण्याच्या प्रशासनाच्या भूमिकेकडे लक्ष वेधले गेले आहे.

# पूर्णेतील बँकांमध्ये दलालांचा सुळसुळाट.?

## पीक कर्जासाठी शेतकऱ्यांची पिळवणूक होत असल्याच्या तक्रारी; अधिकारी-कर्मचाऱ्यांच्या कथित संगनमताची चौकशी करण्याची मागणी

पूर्णा । प्रतिनिधी

दुष्काळजन्य परिस्थितीमुळे आर्थिक अडचणीत सापडलेल्या शेतकऱ्यांना शासनाच्या विविध कर्जसवलत, पुनर्गठन व पीक कर्जाच्या योजनांचा लाभ मिळावा, यासाठी पात्र शेतकरी बँकांकडे धाव घेत आहेत. मात्र, पूर्णा शहरासह तालुक्यातील काही बँक शाखांमध्ये पीक कर्ज व कर्ज पुनर्गठनाच्या प्रक्रियेत शेतकऱ्यांची कथित आर्थिक पिळवणूक होत असल्याच्या तक्रारी पुढे आल्या आहेत. 'काम लवकर करून देतो' असे सांगून काही मध्यस्थांकडून रकमेची मागणी केली जात असल्याचा आरोप शेतकऱ्यांनी केला आहे.

पूर्णा शहरासह एरंडेश्वर, ताडकळस, चुडावा, कावलगाव, लोखंडे पिंपळा आदी ठिकाणी राष्ट्रीयीकृत बँका, बँक ऑफ महाराष्ट्र, महाराष्ट्र ग्रामीण बँक तसेच जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या शाखा आहेत. दुष्काळी परिस्थितीत शेतीचा खर्च भागविण्यासाठी अनेक शेतकरी नवीन पीक कर्ज तसेच कर्ज पुनर्गठनासाठी बँकांकडे अर्ज करीत आहेत.

शेतकऱ्यांच्या म्हणण्यानुसार, काही शाखांभोवती अनधिकृतपणे मध्यस्थ म्हणून वावरणारे दलाल सक्रिय असल्याचे दिसून येते. संबंधित व्यक्ती शेतकऱ्यांना 'तुमचे कर्जाचे काम लवकर करून देतो' असे सांगून कर्जाच्या रकमेनुसार कथितरीत्या हजारो रुपयांची मागणी करीत असल्याचा आरोप आहे. काही ठिकाणी लाख रुपयांच्या कर्जासाठी दहा ते पंधरा हजार रुपयांपर्यंत रक्कम मागितली जात असल्याच्या तक्रारी शेतकऱ्यांनी केल्या आहेत.

दलालांच्या माध्यमातून न जाता शेतकरी स्वतः बँकेत गेल्यास अतिरिक्त कागदपत्रांची मागणी, वारंवार बँकेत बोलावणे तसेच 'आठ दिवसांनी या', 'महिन्यानंतर या' अशा प्रकारे वेळकाढूपणा केला जात असल्याची तक्रार काही शेतकऱ्यांनी केली आहे. काही शाखांमध्ये अधिकारी- कर्मचाऱ्यांकडून शेतकऱ्यांशी योग्य पद्धतीने संवाद साधला जात नसल्याचेही आरोप करण्यात आले आहेत.

पूर्णा शहरातील बँक ऑफ महाराष्ट्रच्या शाखेत शेतकऱ्यांच्या कर्जप्रकरणावरून यापूर्वीही प्रश्न उपस्थित झाल्याचे सांगण्यात येते. स्थानिक लोकप्रतिनिधींनी संबंधित अधिकाऱ्यांना शेतकऱ्यांची अडवणूक करू नये, अशा सूचना केल्याचेही शेतकरी सांगतात. मात्र, त्यानंतरही काही शाखांमध्ये मध्यस्थांचा वावर कायम असल्याचा दावा करण्यात येत आहे.

'कर्ज काढून देणारे दलाल' सक्रिय

तालुक्यातील काही गावांमध्ये ओळखीच्या माध्यमातून शेतकऱ्यांशी संपर्क साधून 'कर्ज मंजूर करून देतो', 'पुनर्गठन करून देतो' असे आश्वासन देणारे मध्यस्थ फिरत असल्याच्या तक्रारी आहेत. आर्थिक अडचणीत असलेल्या शेतकऱ्यांकडून अशा प्रकारे पैसे उकळले जात असतील तर हा गंभीर प्रकार असून त्याची स्वतंत्र चौकशी होणे गरजेचे आहे.

गोपनीय चौकशी करून दोषींवर कारवाईची मागणी

शेतकऱ्यांच्या तक्रारींची दखल घेऊन जिल्हाधिकारी, पालकमंत्री, लोकप्रतिनिधी तसेच संबंधित बँकांच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनी तालुक्यातील शाखांची गोपनीय पद्धतीने चौकशी करावी, अशी मागणी शेतकरी वर्गातून होत आहे.

# पन्नाशी ओलांडली,पण दोस्ती अजूनही तरुणच!

## सुख-दुःखात खंबीरपणे उभे राहणाऱ्या वर्गमित्रांची अनोखी मैत्री

आष्टी - (एस.राजेंद्र लाड) मैत्रीला वयाचे बंधन नसते, काळाचे अंतर नसते आणि परिस्थितीचीही भीती नसते. शाळेच्या वर्गात एकत्र बसलेली काही मने आयुष्याच्या वेगवेगळ्या वाटांवर गेली, जबाबदाऱ्या वाढल्या, संसार फुलले, मुलांची लग्ने झाली, नातवंडे आली; मात्र मनातील मैत्रीची वीण मात्र आजही तितकीच घट्ट राहिली. याचे सुंदर उदाहरण म्हणजे मुख्याध्यापक श्री. साईनाथ बोडखे, सेवानिवृत्त मुख्याध्यापक श्री. आजिनाथ बोडखे, मुख्याध्यापक श्री. बाळासाहेब दुसुंगे, शेतीनिष्ठ शेतकरी श्री. बाळासाहेब बेरड आणि एलआयसी ऑफिसर श्री. राजेश लोंढे हे वर्गमित्र.

शालेय जीवनात सुरू झालेली त्यांची मैत्री आज पन्नाशी ओलांडल्यानंतरही तितक्याच उत्साहाने आणि आपुलकीने सुरू आहे. आयुष्याच्या या टप्प्यावर जवळजवळ सर्वांनी पन्नाशीचा उंबरठा ओलांडला आहे. अनेकजण आजोबा झाले आहेत; काहींवर कौटुंबिक, सामाजिक आणि व्यावसायिक जबाबदाऱ्या आहेत. तरीही या जबाबदाऱ्यांच्या गर्दीत त्यांनी आपल्या मैत्रीसाठी एक खास जागा जपून ठेवली आहे.

मुख्याध्यापक श्री. साईनाथ बोडखे, सेवानिवृत्त मुख्याध्यापक श्री. आजिनाथ बोडखे, मुख्याध्यापक श्री. बाळासाहेब दुसुंगे, शेतीनिष्ठ शेतकरी श्री. बाळासाहेब बेरड आणि एलआयसी ऑफिसर श्री. राजेश लोंढे हे केवळ वर्गमित्र नाहीत, तर एकमेकांच्या सुख-दुःखाचे सोबती आहेत. कोणाच्याही आयुष्यात आनंदाचा क्षण आला तर त्यात सहभागी होण्यासाठी हे मित्र पुढे असतात आणि संकटाची वेळ आली तर आधार देण्यासाठीही ते तितक्याच ताकदीने उभे राहतात. त्यांच्या मैत्रीचे वैशिष्ट्य म्हणजे ती केवळ भेटीगाठींपुरती मर्यादित नसून त्याला भावनिक आणि कौटुंबिक नात्याचीही जोड मिळाली आहे.

शाळेतील त्या बालपणीच्या आठवणी आजही त्यांच्या गप्पांमध्ये जिवंत होतात. जुन्या वर्गातील किस्से, शिक्षकांच्या आठवणी, शाळेतील खोड्या, एकत्र घालवलेले दिवस, त्या काळातील निरागसपणा आणि आयुष्याच्या सुरुवातीच्या स्वप्नांच्या आठवणी काढताना त्यांच्या चेहऱ्यावर आजही आनंद खुलतो. काळ बदलला, परिस्थिती बदलली, प्रत्येकाची जीवनशैली बदलली; पण त्या आठवणींचा गंध मात्र अजूनही ताजा आहे.

विशेष म्हणजे, या सर्वांची मैत्री केवळ व्यक्तिगत पातळीवर न राहता कौटुंबिक नात्यातही रूपांतरित झाली आहे. एकमेकांच्या कुटुंबीयांशीही त्यांचे जिव्हाळ्याचे संबंध निर्माण झाले आहेत. त्यामुळे एखाद्या मित्राच्या घरी जाणे म्हणजे केवळ मित्राला भेटणे नव्हे, तर एका आपुलकीच्या कुटुंबाला भेटण्यासारखेच झाले आहे.

आजच्या धावपळीच्या जीवनात अनेक मैत्री केवळ मोबाईलवरील संदेश, फोन किंवा सोशल मीडियावरील शुभेच्छांपुरती मर्यादित राहते. मात्र या वर्गमित्रांनी प्रत्यक्ष भेटीगाठी, संवाद आणि सहवासातून मैत्रीचे नाते जिवंत ठेवले आहे. जेव्हा भेटावेसे वाटते, तेव्हा वेळ काढून हे सर्वजण एकत्र येतात. गप्पा रंगतात, जुन्या आठवणींना उजाळा मिळतो आणि हास्य-विनोदाच्या वातावरणात काही क्षणांसाठी ते पुन्हा आपल्या शालेय जीवनात परतल्याचा अनुभव घेतात.

आयुष्याच्या उत्तरार्धाकडे वाटचाल करताना प्रत्येकाच्या चेहऱ्यावर अनुभवांच्या असंख्य रेषा उमटल्या आहेत. केसांमध्ये पांढरेपणा आला आहे, जबाबदाऱ्या वाढल्या आहेत आणि अनेकजण आजोबा झाले आहेत. मात्र एकमेकांना भेटल्यावर वयाचे हे अंतर कुठेच जाणवत नाही. त्यांचा उत्साह, हास्य आणि गप्पांचा रंग पाहिला की जणू काही शाळेच्या वर्गातील तेच जुने मित्र पुन्हा एकदा एकत्र आल्याचा भास होतो. त्यांच्या मैत्रीची आणखी एक खासियत म्हणजे दिलदारपणा. एकमेकांसाठी वेळ देणे, गरजेच्या वेळी धावून जाणे, मनातील गोष्ट मोकळेपणाने सांगणे आणि मित्राच्या आनंदात मनापासून आनंदी होणे, ही त्यांची खास ओळख आहे. म्हणूनच काळाच्या ओघात त्यांच्या मैत्रीमध्ये दुरावा निर्माण झाला नाही; उलट प्रत्येक भेटीनंतर हे नाते आणखी घट्ट होत गेले.

आजच्या पिढीसमोर या मित्रसमूहाची मैत्री एक आदर्श उदाहरण आहे. मैत्री म्हणजे केवळ एकत्र फिरणे किंवा मनोरंजन नव्हे; तर एकमेकांच्या आयुष्यातील चढ-उतारांमध्ये मनापासून सोबत देणे, सुखात आनंद वाटून घेणे आणि दुःखात खंबीरपणे उभे राहणे, यालाच खरी मैत्री म्हणतात, हे या वर्गमित्रांनी आपल्या कृतीतून दाखवून



दिले आहे.

शाळेच्या वर्गात सुरू झालेला हा मैत्रीचा प्रवास आज आयुष्याच्या पन्नाशीनंतरही तितकाच बहरलेला आहे. काळ कितीही पुढे गेला, संसार कितीही मोठा झाला आणि जबाबदाऱ्या कितीही वाढल्या, तरी मनाच्या कोपऱ्यात जपलेली मैत्रीची जागा कधीच कमी झाली नाही. उलट प्रत्येक भेटीत जुन्या आठवणींचे मोती पुन्हा एकदा चमकतात.

श्री. साईनाथ बोडखे, श्री. आजिनाथ बोडखे, श्री. बाळासाहेब दुसुंगे, श्री. बाळासाहेब बेरड आणि श्री. राजेश लोंढे या आठ मित्रांची ही मैत्री म्हणजे काळाच्या कसोटीवर उतरलेले नाते आहे. वय वाढले, पदे बदलली, संसार वाढले, नातवंडे आली; पण दोस्ती मात्र अजूनही तशीच तरुण आहे. त्यांच्या मैत्रीचा हा प्रवास एकच सांगतो खरी मैत्री वेळेनुसार जुनी होत नाही; उलट काळाच्या ओघात ती अधिकच मौल्यवान होत जाते.

# महेश सहकारी साखर कारखान्याच्या २६व्या गळीत हंगामाची तयारी;१२ ऑक्टोबरला बॉयलर अग्निप्रदीपन

### माजी आमदार भीमराव धोंडे यांच्या अध्यक्षतेखाली संतांच्या शुभहस्ते होणार धार्मिक व औपचारिक सोहळा

आष्टी - (एस.राजेंद्र लाड) कडा येथील महेश सहकारी साखर कारखाना लि., कडा यांच्या सन २०२६-२०२७ च्या २६व्या गळीत हंगामाच्या शुभारंभाची तयारी सुरू झाली असून, त्यापूर्वी कारखान्याचा पारंपरिक बॉयलर अग्निप्रदीपन समारंभ सोमवार, दि. १२ ऑक्टोबर २०२६ रोजी सकाळी ११.१५ वाजता कारखाना स्थळावर आयोजित करण्यात आला आहे. या समारंभामुळे कारखाना प्रशासन, ऊस उत्पादक शेतकरी तसेच परिसरातील नागरिकांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे.

या धार्मिक व औपचारिक सोहळ्याचे अध्यक्षस्थान महाराष्ट्र भूषण माजी आमदार भीमराव धोंडे भूषविणार आहेत. प्रमुख संतांच्या शुभहस्ते बॉयलर अग्निप्रदीपन समारंभ संपन्न होणार आहे. यावेळी ह.भ.प. विठ्ठल महाराज (गहीनाथगड), ह.भ.प. प्रकाश बोधले महाराज, ह.भ.प. रामकृष्ण रंधवे बापू महाराज, ह.भ.प. बबन महाराज बहीरवाल आणि ह.भ.प. अशोक महाराज भोसले यांची प्रमुख उपस्थिती



लाभणार आहे.यंदाच्या गळीत हंगामाच्या पार्श्वभूमीवर कारखान्याच्या विविध विभागांतील कामकाजाची तयारी अंतिम टप्प्यात आली असून, बॉयलर अग्निप्रदीपन हा गळीत हंगामाच्या प्रारंभापूर्वीचा महत्त्वाचा धार्मिक व औपचारिक कार्यक्रम मानला जातो. संतांच्या उपस्थितीत होणाऱ्या या कार्यक्रमातून कारखान्याच्या आगामी गळीत हंगामासाठी मंगलमय वातावरणात सुरुवात केली जाणार आहे.समारंभास कारखान्याचे चेअरमन डॉ. अजय धोंडे, व्हाईस चेअरमन दादासाहेब जगताप, कार्यकारी संचालक गिरीश झगडे यांच्यासह सर्व संचालक मंडळाचे सदस्य, अधिकारी, कर्मचारी व कामगार उपस्थित राहणार आहेत. दरम्यान, कारखान्याच्या आगामी गळीत हंगामाच्या दृष्टीने परिसरातील ऊस उत्पादक शेतकऱ्यांचे सहकार्य महत्त्वाचे असून, बॉयलर अग्निप्रदीपन समारंभास परिसरातील शेतकरी व ऊस उत्पादकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन महेश सहकारी साखर कारखान्याच्या वतीने करण्यात आले आहे.

# पुखराज नगरच्या सुरक्षिततेसाठी नगरसेविकेचा पुढाकार

नगरसेविका शीलाताई भारती यांच्याकडून जि.प.शाळेला स्वखर्चातून सीसीटीव्ही भेट

भोकरदन इसरारखान पठाण :- सामाजिक बांधिलकी जपत भोकरदन नगर परिषदेच्या प्रभाग क्रमांक ९ च्या नगरसेविका सौ. शीलाताई अभिजीत भारती यांनी परिसरातील विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेला प्राधान्य देत स्वखर्चातून जिल्हा परिषद प्राथमिक शाळेला सीसीटीव्ही कॅमेरे व मॉनिटर भेट दिला.त्यांच्या या उपक्रमामुळे नंदुबाई नगर पुखराज नगर येथील शाळेच्या सुरक्षाव्यवस्थेला अधिक बळकटी मिळाली आहे.शाळेच्या आवारात ये-जा करणाऱ्या व्यक्ती तसेच परिसरातील हालचालींवर लक्ष ठेवण्यासाठी दर्शनी भागात तीन आणि मागील बाजूस एक असे एकूण चार सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्यात आले आहेत.त्यामुळे शाळेच्या परिसरातील घडामोडींवर लक्ष ठेवणे शक्य होणार असून विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने ही सुविधा उपयुक्त ठरणार आहे.पुखराज नगर परिसरात




१६ सीसीटीव्ही नगरसेविका भारती यांनी केवळ शाळेपुरता हा उपक्रम मर्यादित न ठेवता संपूर्ण पुखराज नगर परिसरात आतापर्यंत स्वखर्चातून तब्बल १६ सीसीटीव्ही कॅमेरे बसविले आहेत.परिसरातील नागरिकांच्या सुरक्षेच्या दृष्टीने या कॅमेऱ्यांचा उपयोग होत असून चोरीसह विविध गैरप्रकारांवर नियंत्रण ठेवण्यास मदत होत असल्याचे यावेळी सांगण्यात आले.शाळेला सीसीटीव्ही कॅमेरे भेट देण्याच्या उपक्रमामुळे पालक,शिक्षक आणि नागरिकांकडून नगरसेविका शीलाताई भारती यांच्या सामाजिक उपक्रमाचे कौतुक करण्यात आले.

यावेळी ज्येष्ठ नेते अनिल पगारे शाळेच्या मुख्याध्यापिका,राष्ट्रवादी शिक्षक संघटनेचे तालुकाध्यक्ष राम शर्मा,अभिजीत भारती, श्रीमती चराटे,श्रीमती वाघ यांच्यासह शिक्षकवृंद व पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# डॉ.सी.व्ही.रमन बाल वैज्ञानिक परीक्षेतील यशाबद्दल सार्थक चाटे सन्मानित

### रेसिडेन्शियल हायस्कूलमध्ये गुणवंतांचा कौतुक सोहळा संपन्न

आष्टी - (एस.राजेंद्र लाड) अहमदनगर जिल्हा मराठा विद्या प्रसारक समाज संस्थेचे येथील रेसिडेन्सीअल हायस्कूलमध्ये आज विविध परीक्षेतील गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार संपन्न झाला. डॉ.सी.व्ही. रमण बाल वैज्ञानिक परीक्षेत यशवंत ठरलेल्या सार्थक बिभिषण चाटे याचा प्रशस्तीपत्र, पदक आणि एक्सपेरिमेंट किट प्रदान करून सन्मान करण्यात आला.

संस्थेचे विश्वस्त जयंतराव वाघ, श्रीयुत कापरे साहेब यांच्या हस्ते आणि प्राचार्य बालाजी गायकवाड, उपप्राचार्य श्री आदमाने, पर्यवेक्षक श्री. शिंदे, शाळा समितीचे सदस्य श्री. शिंदे, लवाट आबा आणि सतीश लांडे पाटील यांच्या उपस्थितीत सार्थक चाटे चे कौतुक करण्यात आले. डॉ.सी.व्ही. रमण विज्ञान परीक्षा विभाग प्रमुख प्रसिल फलके



सर आणि इतर गुरूंचे मार्गदर्शन लाभले.

जनसेवा प्रतिष्ठान अहिल्यानगर येथील डॉ.सी व्ही.रमण बालवैज्ञानिक परीक्षा २०२६ चे प्रमुख एस.ए. तुपविहिरे, डायरेक्टर एम.एल. जाधव यांच्यासह रेसिडेन्सीअल हायस्कूल अँड ज्युनिअर कॉलेजचे शिक्षक प्रशांत फलके, मिसाळ सर, सोलाट सर, श्रीमती भोसले मॅडम, गव्हाळ सर, सरदार सर आदीसह मान्यवरांनी सार्थक चाटे व गुणवंत विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले आहे.

## घनसावंगी पंचायत समितीत नेमकं चाललंय तरी काय?

# खिल्लारे-नागलवाडांचा एकाच खुर्चीवर दीर्घ मुक्काम बदली धोरणाला ब्रेक कुणाचा

घनसावंगी प्रतिनिधी :-

घनसावंगी पंचायत समितीच्या कारभारात सध्या ‘एकाच खुर्चीवर एवढा दीर्घ मुक्काम कसा? हा सवाल चांगलाच चर्चेत आला आहे.विस्तार अधिकारी पी.पी.खिल्लारे आणि एन.पी.नागलवाड हे दीर्घकाळापासून घनसावंगी पंचायत समितीत कार्यरत असल्याने शासनाच्या बदली धोरणाची अंमलबजावणी नेमकी कोणत्या पद्धतीने होते असा सवाल उपस्थित होत आहे.बदलीचे नियम आहेत की फक्त कागदावरची शोभा

जर नियम सर्वांसाठी समान असतील तर संबंधित अधिकाऱ्यांचा दीर्घ कार्यकाळ कशामुळे कायम आहे त्यांना एकाच ठिकाणी ठेवण्यामागे कोणते प्रशासकीय कारण आहे सक्षम प्राधिकाऱ्याची मंजुरी आहे का? असे प्रश्न आता थेट प्रशासनाच्या दारात येऊन ठेपले आहेत.एकाच खुर्चीवर एवढे प्रेम का

सरकारी सेवेत बदली ही प्रशासकीय व्यवस्थेचा अविभाज्य भाग आहे.मात्र एखादा अधिकारी वर्षानुवर्षे एकाच ठिकाणी कार्यरत राहिला तर त्याची कारणमीमांसा जनतेसमोर येणे अपेक्षित आहे.

खिल्लारे आणि नागलवाड यांची घनसावंगी पंचायत समितीतील नियुक्तीची तारीख आजपर्यंतचा कार्यकाळ बदलीसंदर्भातील आदेश मुदतवाढीचे आदेश आणि सक्षम प्राधिकाऱ्याची मंजुरी यांची माहिती प्रशासनाने जाहीर करावी अशी मागणी होत आहे.बदलीचे आदेश झाले होते का मग अंमलबजावणी कुठे अडकली? सर्वात महत्त्वाचा प्रश्न म्हणजे संबंधित अधिकाऱ्यांच्या बदलीसंदर्भात यापूर्वी काही आदेश झाले होते का झाले असतील तर त्यांची अंमलबजावणी झाली का झाली नसेल तर का झाली नाही आदेश कागदावर आणि अधिकारी त्याच खुर्चीवर अशी परिस्थिती असेल तर त्यामागील प्रशासकीय कारण जनतेला कळले पाहिजे.

चालक-मालक कोण चर्चेला उधाण दीर्घकाळ एकाच ठिकाणी कार्यरत राहण्यामागे नेमकी कोणती प्रशासकीय कारणे आहेत याची चर्चा सुरू आहे. काहींच्या मते यामागे प्रशासकीय कारणे असू शकतात तर काही स्तरांवर अन्य प्रकारच्या पाठबळाची चर्चा केली जात आहे.

मात्र या चर्चांना अधिकृत दुजोरा नसल्याने त्यावर निष्कर्ष काढणे घाईचे ठरेल. प्रशासनाने कागदपत्रांसह वस्तुस्थिती स्पष्ट केली तर या चर्चांना आपोआप पूर्णविराम मिळेल.जिल्हा परिषद प्रशासनाने फाईल उघडावी

घनसावंगी पंचायत समितीत संबंधित दोन्ही अधिकाऱ्यांच्या नियुक्तीपासून आजपर्यंतचा संपूर्ण कार्यकाळ तपासावा. बदलीचे शासन नियम कोणते त्यानुसार त्यांचा कार्यकाळ किती यापूर्वी बदली आदेश निघाले का एखादी विशेष प्रशासकीय मंजुरी देण्यात आली आहे का या सर्व बाबींची वरिष्ठ पातळीवर चौकशी होण्याची गरज व्यक्त होत आहे.नियम सर्वांसाठी समान असतील तर अपवाद कुणासाठी शासकीय व्यवस्थेत एकासाठी एक नियम आणि दुसऱ्यासाठी दुसरा अशी भावना निर्माण होणे प्रशासनासाठी गंभीर बाब ठरू शकते. पंचायत समितीचा कारभार कोणत्याही व्यक्तीच्या सोयीने नव्हे तर शासनाच्या नियमांनुसार आणि जनहिताच्या चौकटीत चालला पाहिजे.म्हणूनच जिल्हा परिषद प्रशासनाने या प्रकरणात मौन न बाळगता स्पष्ट भूमिका मांडावी.

सगळं नियमानुसार एवढंच सांगू नका; नियम दाखवा

या प्रकरणाचा खुलासा करण्यासाठी मोठ्या चौकशीची गरज नाही. नियुक्ती आदेश दाखवा बदली आदेश दाखवा मंजुरी दाखवा आणि कार्यकाळाची अधिकृत माहिती द्या कागदी खुलाशापेक्षा कागदपत्रे जनतेसमोर




आली तर अनेक प्रश्नांची उत्तरे मिळतील.अन्यथा घनसावंगी पंचायत समितीत नेमकं चाललंय तरी काय? हा सवाल आणखी तीव्र होणार आहे.आता जिल्हा परिषद प्रशासन खिल्लारे-नागलवाड यांच्या दीर्घ कार्यकाळाची तपासणी करून बदली धोरणाबाबत स्पष्ट निर्णय घेते का याकडे घनसावंगी तालुक्याचे लक्ष लागले आहे.

# लोकनेते,मराठवाडा भूषण आ.सुरेश आण्णा धस यांच्या कुटुंबावर बिनबुडाचे आरोप करुन माता-भगिनींचा अपमान करु नका-नगरसेवक अक्षय धोंडे



आष्टी - (प्रतिनिधी) लोकशाहीमध्ये राजकीय मतभेद आणि आरोप-प्रत्यारोप होत असतात; मात्र त्यामध्ये महिलांच्या सन्मानाची मर्यादा ओलांडली जाऊ नये. कोणत्याही महिलेविषयी वैयक्तिक अथवा पुराव्याविना आरोप करण्यापूर्वी संबंधितांनी आपल्या वक्तव्यांचा आधार आणि पुरावे जनतेसमोर मांडावेत, असे आवाहन आष्टी नगरपंचायतीचे नगरसेवक अक्षय धोंडे यांनी केले आहे. आमचे नेते आमदार सुरेश आण्णा धस यांच्या पत्नी तथा आमच्या लोकप्रिय नेत्या प्राजक्ताताई धस यांनी मतदारसंघातील महिलांसाठी बचतगटांच्या माध्यमातून आर्थिक सक्षमतेसाठी प्रयत्न केले असून विविध सामाजिक उपक्रमांमध्ये सहभाग घेतला आहे. तसेच सर्वसामान्य नागरिकांच्या सुख-दुःखात सहभागी होत सामाजिक कार्य केले आहे. त्यामुळे त्यांच्या कार्याबाबत टीका करताना वैयक्तिक स्वरूपाची वक्तव्ये टाळावीत, असे धोंडे यांनी म्हटले आहे.

महिलांचा सन्मान करतो, असे सांगतानाच एखाद्या महिलेविषयी वैयक्तिक आरोप करणे ही विसंगती असल्याचे सांगत धोंडे यांनी संबंधितांना आपली वक्तव्ये पुराव्यानिशी जनतेसमोर मांडण्याचे आव्हान दिले. राजकीय मतभेद असणे स्वाभाविक आहे; मात्र महिलांच्या प्रतिष्ठेला धक्का पोहोचेल, अशा स्वरूपाची वक्तव्ये टाळून महिलांचे प्रश्न, मतदारसंघातील विकास आणि जनतेच्या मूलभूत प्रश्नांवर चर्चा व्हावी, अशी भूमिका त्यांनी मांडली.

’इतरांवर प्रश्न उपस्थित करण्यापूर्वी आपण केलेल्या कामाचा हिशोब जनतेसमोर द्या,’ असा सवालही अक्षय धोंडे यांनी केला. राजकारणात मतभेद असू शकतात आणि प्रत्येकाला टीका करण्याचा अधिकार आहे; मात्र टीका करताना व्यक्तीच्या प्रतिष्ठेला धक्का पोहोचणार नाही, याची काळजी घेणे आवश्यक आहे. महिलांच्या सन्मानाचा मुद्दा राजकीय संघर्षापेक्षा मोठा असून, वैयक्तिक आरोपांऐवजी विकासाच्या मुद्द्यांवर चर्चा व्हावी, असे आवाहन नगरसेवक अक्षय धोंडे यांनी केले. आमच्या लोकप्रिय नेत्या प्राजक्ताताई धस यांच्या सामाजिक आणि महिला सक्षमीकरणाच्या कार्याबाबत मतदारसंघातील नागरिकांना माहिती असून, त्यांच्या कामावर टीका करण्यापूर्वी संबंधितांनी वस्तुनिष्ठ माहिती आणि पुरावे सादर करावेत. तसेच आधी स्वतः कोणती विकासकामे केली याचा लेखाजोखा जनतेसमोर मांडावा आणि त्यानंतर इतरांच्या कामांवर प्रश्न उपस्थित करावेत, तसेच आगामी काळात आमच्या लोकप्रिय नेत्या प्राजक्ताताई धस यांच्यावर बिनबुडाचे आरोप केल्यास जशास तसे उत्तर दिले

दैनिक समर्थ राजयोग
SAMARTH RAJYOG
राजमान्य-राजशक्ती



# मी जे बोलतो ते करूनच दाखवतो;कुणीही स्थलांतर करू नये.जिथे विषय गंभीर,तिथे मी खंबीर-आ.सुरेश धस

## दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांनी हवालदिल होऊ नये;शासनाकडून मदत मिळवून देणार

आष्टी - (एस.राजेंद्र लाड) तालुक्यात दुष्काळाची परिस्थिती दिवसेंदिवस गंभीर होत चालली असून, या पार्श्वभूमीवर शेतकरी, पशुपालक, फळबाग उत्पादक, मजूर, कार्यकर्ते आणि स्थानिक नागरिकांना दिलासा देण्यासाठी शासनाकडे ठोस उपाययोजनांची मागणी करून त्या मंजूर करून घेण्यासाठी आपण प्रयत्नांची पराकाष्ठा करणार आहोत. दुष्काळग्रस्तांना आधार देण्यासाठी शासन गंभीर असून, आपणही खंबीरपणे त्यांच्या पाठीशी उभे आहोत. त्यामुळे शेतकऱ्यांनी हवालदिल होण्याचे कारण नाही. तसेच नागरिकांनी गाव सोडून स्थलांतर करू नये, त्यांच्या हाताला रोजगार उपलब्ध करून देण्यासाठी शासनाकडे पाठपुरावा करणार असल्याचे आमदार सुरेश धस यांनी सांगितले.

आष्टी मतदारसंघात जिल्हा परिषद गटनिहाय दुष्काळी दौऱ्याच्या पार्श्वभूमीवर आगामी उपाययोजनांबाबत आ. धस यांनी शेतकरी, पशुपालक, फळबाग उत्पादक, कार्यकर्ते आणि स्थानिक नागरिकांच्या बैठका घेऊन त्यांच्याशी संवाद साधला. यावेळी दुष्काळाच्या परिस्थितीत नागरिकांना भेडसावणाऱ्या विविध प्रश्नांवर चर्चा करण्यात आली.

आगामी काळात पशुधन कसे जगवायचे, हा प्रश्न गंभीर बनला आहे. त्यामुळे शेतकऱ्यांनी दिवाळीपर्यंत चारा डेपो तातडीने सुरू करण्याची मागणी केली. त्यानुसार दिवाळीपर्यंत चारा डेपो आणि त्यानंतर चारा छावण्या सुरू करण्यासाठी शासनाकडे मागणी करण्यात येणार असल्याचे आ. धस यांनी सांगितले. चारा छावण्या सुरू करताना प्रत्येक वस्तीनिहाय किमान २०० ते २५० जनावरांची क्षमता असावी, अशी मागणीही शासन दरबारी करण्यात येणार आहे. त्यामुळे शेतकऱ्यांची चारा व पाण्याची गैरसोय होणार नाही आणि छावणी चालकांवरही त्याबाबतची जबाबदारी राहील, असे त्यांनी स्पष्ट केले.

पशुधनासाठी थेट अनुदान मिळावे, अशी मागणीही शेतकऱ्यांकडून करण्यात आली. दुष्काळाच्या काळात पशुपालकांना दिलासा देण्यासाठी मोठ्या जनावरांसाठी ठरावीक प्रमाणात थेट अनुदान मिळावे, ही मागणी शासनाकडे आपण निश्चितपणे मांडणार असल्याचे आ. धस यांनी सांगितले.

फळबाग उत्पादक शेतकऱ्यांच्या प्रश्नाकडेही त्यांनी लक्ष वेधले. सन २०१२ मध्ये फळबाग धारक शेतकऱ्यांच्या शिष्टमंडळासह आपण दिल्लीला जाऊन ४५ हजार रुपयांचे अनुदान मिळवून देण्यासाठी प्रयत्न केले होते. त्यानंतर तब्बल १४ वर्षांचा कालावधी लोटला आहे. वाढलेला उत्पादन खर्च, मजुरी, सिंचन तसेच फळबागांच्या देखभालीचा खर्च लक्षात घेता सध्याच्या परिस्थितीत फळबाग धारक शेतकऱ्यांना हेक्टरी किमान दीड ते दोन लाख रुपयांपर्यंत अनुदान मिळावे, अशी मागणी करणार असल्याचे त्यांनी सांगितले.

यासाठी राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस, केंद्रीय कृषिमंत्री शिवराजसिंह चौहान तसेच केंद्रीय मंत्री अमितभाई शाह यांची फळबाग धारक शेतकऱ्यांच्या शिष्टमंडळासह भेट घेऊन त्यांना या प्रश्नाची वस्तुस्थिती समजावून सांगणार असून, फळबाग उत्पादक शेतकऱ्यांना मोठ्या प्रमाणावर मदत मिळवून देण्यासाठी प्रयत्नांची पराकाष्ठा करणार असल्याचे आ. धस यांनी स्पष्ट केले.

दुष्काळाच्या काळात ग्रामीण भागातील मजुरांच्या हाताला काम मिळावे, यासाठी रोजगार हमी योजनेच्या माध्यमातून मोठ्या प्रमाणावर कामे



उपलब्ध करून द्यावीत, अशी मागणीही बैठकीत शेतकऱ्यांच्या वतीने करण्यात आली. मजुरांनो, स्थलांतर करू नका; तुमच्या हाताला काम देण्यासाठी शासनाकडे पाठपुरावा करणार, असे आश्वासन आ. धस यांनी दिले.

केसरी कूपनधारकांना पुन्हा धान्य पुरवठा कसा सुरू करता येईल, यासाठीही प्रामाणिक प्रयत्न सुरू राहतील. दुष्काळी परिस्थितीत शेतकरी आणि नागरिकांना कोणत्याही प्रकारच्या अडचणी निर्माण होणार नाहीत, यासाठी शासनाकडे सातत्याने पाठपुरावा करणार असल्याचे त्यांनी सांगितले.

दुष्काळी परिस्थितीवर सातत्याने लक्ष ठेवण्यासाठी ज्या-ज्या आमदारांना या परिस्थितीची जाणीव आहे, अशा आमदारांची एक समिती स्थापन करण्यात यावी. या समितीची दर आठवड्याला बैठक घेऊन शासनाकडून सुरू असलेल्या उपाययोजनांचा आढावा घेण्यात यावा. तसेच परिस्थितीनुसार आवश्यक सूचना आणि उपाययोजना सुचविण्याचे काम या समितीमार्फत करण्यात यावे, अशी मागणीही शासनाकडे करणार असल्याचे आ. धस यांनी सांगितले.

मी जे बोलतो ते करूनच दाखवतो; कुणीही स्थलांतर करू नये दुष्काळाची परिस्थिती गंभीर असली तरी नागरिकांनी घाबरून जाऊ नये. सुरेश धस आपल्या पाठीशी खंबीरपणे उभा आहे. शासन दरबारी आवश्यक त्या उपाययोजना करण्यासाठी सातत्याने पाठपुरावा केला जाईल. मी जे बोलतो ते करूनच दाखवतो. त्यामुळे या परिस्थितीत कुणीही गाव सोडून स्थलांतर करू नये, असा विश्वास आ. धस यांनी व्यक्त केला. तसेच गोरगरीब, दीन, दलित आणि वंचित घटकांच्या या दुष्काळी परिस्थितीत मदतीला धावून जाण्याचे आवाहन त्यांनी कार्यकर्त्यांना केले.




# कचरा व्यवस्थापनातून स्वच्छतेचा संदेश विद्यार्थ्यांनी घेतला स्वच्छतेचा संकल्प

घनसावंगी ।प्रतिनिधी

शहरातील स्वच्छता आणि पर्यावरण संवर्धनासाठी कचऱ्याचे योग्य व्यवस्थापन करणे गरजेचे असून याबाबत विद्यार्थ्यांमध्ये जनजागृती व्हावी या उद्देशाने घनसावंगी येथे कचरा व्यवस्थापन विषयक मार्गदर्शन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.यावेळी मुख्याध्यापक केशव अटकर तसेच घनसावंगी नगरपंचायतीचे विजय वाघमारे यांनी विद्यार्थ्यांना कचऱ्याचे योग्य व्यवस्थापन ओला व सुका कचरा वर्गीकरण परिसर स्वच्छता आणि पर्यावरण संवर्धनाचे महत्त्व समजावून सांगितले. दैनंदिन जीवनात स्वच्छतेच्या सवयी अंगीकारल्यास शाळेसह संपूर्ण परिसर स्वच्छ व निरोगी ठेवण्यास मदत होईल असे मार्गदर्शन यावेळी करण्यात आले.विद्यार्थ्यांनीही कचरा रस्त्यावर किंवा सार्वजनिक ठिकाणी न टाकता त्याची योग्य विल्हेवाट लावण्याचा निर्धार केला. तसेच स्वच्छ शाळा स्वच्छ परिसर आणि सुंदर पर्यावरण या संकल्पनेला प्रत्यक्ष कृतीची जोड देण्याचा संकल्प विद्यार्थ्यांनी केला.या उपक्रमातून विद्यार्थ्यांमध्ये स्वच्छता कचरा व्यवस्थापन आणि पर्यावरण संवर्धनाबाबत सकारात्मक दृष्टिकोन निर्माण करण्याचा प्रयत्न करण्यात आला.

## महावितरणच्या स्पार्किंग ने शेतकऱ्यांचे स्वप्न भस्मसात

# १०.५ एकर ऊस जळून खाक; पूर्वसूचना देऊनही मेंटेनन्स का नाही- मनसे जिल्हाध्यक्ष प्रकाश सोळंके संतप्त सवाल

परतूर ।प्रतिनिधी

शेतकऱ्यांनी विद्युत वाहिनीच्या धोक्याची पूर्वसूचना दिली तरीही महावितरणने डोळेझाक केली आणि अखेर विद्युत वाहिनीतील स्पार्किंगने शेतकऱ्यांचे वर्षभराचे कष्ट क्षणात भस्मसात झाल्याचा आरोप महाराष्ट्र नवनिर्माण सेनेने केला आहे.माव पाटोदा, ता.परतूर परिसरात ६ ऑक्टोबर रोजी लागलेल्या भीषण आगीत तब्बल १०.५ एकर उभा ऊस जळून खाक झाला असून शेतकऱ्यांचे मोठे आर्थिक नुकसान झाले आहे. या प्रकरणात महावितरणच्या संबंधित अधिकारी-कर्मचाऱ्यांची जबाबदारी निश्चित करून दोषींवर कठोर कारवाई करावी अशी मागणी मनसेचे जालना जिल्हाध्यक्ष प्रकाश सोळंके यांनी केली आहे.

दुपारी सुमारे २.५७ वाजता विद्युत वाहिनीतील स्पार्किंगमुळे आग लागल्याचे सांगण्यात आले.आगीने काही क्षणांतच रौद्ररूप धारण केल्याने महादेव विठ्ठलराव नवल यांच्या गट क्रमांक ३४३ मधील ४ एकर हरिभाऊ नारायण नवल यांच्या गट क्रमांक ३४१/३४२ मधील ३ एकर आणि विकास मनोहर गायकवाड यांच्या गट क्रमांक ३४२ मधील साडेतीन एकर ऊस जळाला.तक्रारी केल्या तरीही मेंटेनन्स कुठे गेला

सर्वात गंभीर बाब म्हणजे विद्युत वाहिनीच्या देखभालीबाबत संबंधित शेतकऱ्यांनी यापूर्वीच महावितरणच्या अधिकाऱ्यांकडे मागणी केल्याचा दावा करण्यात आला आहे.श्रीष्टी ३३ के.व्ही.



सबस्टेशनचे संबंधित फिटर, कनिष्ठ अभियंता श्री.कुरेशी, वरिष्ठ तांत्रिक कर्मचारी श्री. काळे आणि संबंधित लाईनमन यांच्याकडे विद्युत वाहिनीच्या दुरुस्ती व देखभालीबाबत माहिती देण्यात आली होती असे मनसेच्या निवेदनात नमूद आहे.मात्र त्यानंतरही आवश्यक देखभाल झाली नाही आणि विद्युत वाहिनीतील स्पार्किंगने शेतकऱ्यांचा ऊस पेटला असा आरोप करण्यात आल्याने महावितरणच्या देखभाल व्यवस्थेवरच प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.ऊसासोबत सौर यंत्रणेलाही फटका

या आगीत केवळ ऊसाचेच नुकसान झाले नाही तर शेतातील सौर ऊर्जा यंत्रणेलाही मोठा फटका बसल्याचे मनसेने म्हटले आहे. त्यामुळे ऊस पिकाच्या नुकसानीबरोबर सौर ऊर्जा यंत्रणेचे स्वतंत्र मूल्यांकन करून त्याचीही भरपाई द्यावी अशी मागणी करण्यात आली आहे.रजिस्टर उघडा शेवटचे मेंटेनन्स कधी विद्युत वाहिनीची शेवटची तपासणी नेमकी कधी झाली मेंटेनन्स रजिस्टरमध्ये काय नोंद आहे शेतकऱ्यांच्या पूर्वीच्या तक्रारींवर कोणती कारवाई झाली विद्युत वाहिनीची स्थिती तपासण्यात आली होती का? या सर्व प्रश्नांची उत्तरे चौकशीतून समोर आणावीत अशी मागणी मनसेने केली आहे.महसूल विभाग कृषी विभाग आणि महावितरणच्या संयुक्त पथकाने घटनास्थळी तातडीने पाहणी करून पंचनामा करावा. जळालेल्या ऊसाचे क्षेत्र अपेक्षित उत्पादन बाजारमूल्य आणि प्रत्यक्ष आर्थिक नुकसान याचे शास्त्रशुद्ध मूल्यांकन करावे अशी मागणी करण्यात आली आहे.प्रति एकर ७० हजारांची भरपाई द्या महावितरणच्या लागू नियम व परिपत्रकांनुसार नुकसानभरपाईची प्रक्रिया राबवून तीनही नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना प्रति एकर ७० हजार रुपये नुकसानभरपाई द्यावी अशी मागणी मनसेने केली आहे. सौर ऊर्जा यंत्रणेच्या नुकसानीचेही स्वतंत्र मूल्यांकन करून भरपाई देण्याची मागणी आहे.

दोष आढळल्यास कारवाई नव्हे जबाबदारी निश्चित करा

श्रीष्टी ३३ के.व्ही. सबस्टेशनचे संबंधित फिटर,कनिष्ठ अभियंता श्री. कुरेशी,वरिष्ठ तांत्रिक कर्मचारी श्री.काळे आणि संबंधित लाईनमन यांची भूमिका तपासून चौकशीत दोष आढळल्यास कठोर विभागीय कारवाई करावी अशी मागणी मनसेने केली आहे.

शेतकऱ्यांनी पूर्वसूचना देऊनही जर विद्युत वाहिनीची देखभाल झाली नसेल तर केवळ पंचनामा करून प्रकरण दडपण्याऐवजी जबाबदारी निश्चित करावी अशी भूमिका मनसेने घेतली आहे.

उरलेला ऊस तरी वाचवा

दरम्यान नुकसानग्रस्त शेतकरी हे घनसावंगी तालुक्यातील समृद्धी साखर कारखान्याचे अधिकृत सभासद व शेअरहोल्डर असल्याने आगीतून बचावलेला उर्वरित ऊस कारखाना सुरू झाल्यानंतर प्राधान्याने तोडणी करून गाळपासाठी स्वीकारावा अशी मागणी कारखाना प्रशासनाकडे करण्यात आली आहे.

जिल्हाधिकारी जालना आणि महावितरणच्या अधीक्षक अभियंत्यांना ८ ऑक्टोबर रोजी ई-मेलद्वारे निवेदन पाठविण्यात आले आहे. या दुर्घटनेची निष्पक्ष चौकशी नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना तातडीची भरपाई विद्युत यंत्रणेची संपूर्ण तपासणी आणि दोषी अधिकारी-कर्मचाऱ्यांवर कारवाई न झाल्यास मनसेकडून पुढील भूमिका जाहीर केली जाण्याची शक्यता आहे.

# भोकरदन उपजिल्हा रुग्णालय वाऱ्यावर अधीक्षक पद रिक्त

## जननी-शिशु सुरक्षा योजनेला घरघर गरोदर मातेला तीन महिन्यांपासून हेलपाटे

भोकरदन इसरारखान पठाण :- गरीब आणि गरजू गरोदर मातांना वेळेत आरोग्यसेवा मिळावी यासाठी शासनाकडून विविध योजना राबविल्या जातात.मात्र या योजनांचा प्रत्यक्ष लाभ रुग्णांपर्यंत पोहोचतो आहे का असा गंभीर प्रश्न भोकरदन उपजिल्हा रुग्णालयातील एका प्रकरणामुळे निर्माण झाला आहे.सोनोग्राफीसाठी तब्बल तीन महिन्यांपासून हेलपाटे मारूनही तपासणी झाली नसल्याचा आरोप एका गरोदर महिलेने केला आहे. विशेष म्हणजे शासकीय संदर्भपावती घेऊन खाजगी रुग्णालयात गेल्यानंतरही सेवा मिळाली नसल्याचे तिचे म्हणणे आहे. महिलेच्या प्रकरणामुळे हा प्रकार समोर आला.त्यांच्या नोंदीनुसार अंतिम मासिक पाळीची तारीख ५ फेब्रुवारी २०२६ तर संभाव्य प्रसूतीची तारीख १२ नोव्हेंबर २०२६ आहे. सोनोग्राफीची गरज असतानाही मागील तीन महिन्यांपासून भोकरदन उपजिल्हा रुग्णालयात चकरा माराव्या लागत असल्याचा आरोप त्यांनी केला आहे.

संदर्भपावती मिळाली पण सोनोग्राफी झालीच नाही

अखेर ७ ऑक्टोबर २०२६ रोजी डॉ.दीपक सोनी एमबीबीएस यांनी राष्ट्रीय आरोग्य अभियानाच्या जननी-शिशु सुरक्षा कार्यक्रमांतर्गत संदर्भपावती देऊन संबंधित महिलेला जालना रोडवरील




नलिनी हॉस्पिटल येथे सोनोग्राफीसाठी पाठविल्याचे सांगण्यात आले.

मात्र तेथे गेल्यानंतर मोफत सोनोग्राफीची सेवा उपलब्ध नसल्याचे सांगून महिलेला परत पाठविण्यात आल्याचा आरोप आहे.यावेळी रुग्णालयात गैरवर्तन झाल्याचाही दावा करण्यात आला आहे.या घटनेनंतर नलिनी हॉस्पिटलच्या लेटरहेडवर शासकीय नियमांनुसार सेवा सध्या बंद असून कर्मचाऱ्यांच्या अभावामुळे संबंधित कामकाज तात्पुरते स्थगित करण्यात आले आहे.सेवा लवकरच पूर्ववत सुरू करण्यात येईल असे नमूद असलेले पत्र देण्यात आल्याचा दावा महिलेच्या नातेवाइकांकडून करण्यात आला आहे.या पत्राची प्रत उपलब्ध असल्याचेही सांगण्यात आले आहे.

या प्रकरणातील सर्वात महत्त्वाचा प्रश्न म्हणजे संबंधित खाजगी रुग्णालयात शासनाच्या योजनेअंतर्गत सोनोग्राफी सेवा उपलब्ध नसेल तर शासकीय रुग्णालयाकडून रुग्णांना तेथे संदर्भित का केले जात होते

सेवा बंद असल्याची माहिती रुग्णालय प्रशासनाला होती का असल्यास पर्यायी व्यवस्था का करण्यात आली नाही आणि माहिती नव्हती तर रुग्णालयांच्या सेवांचे निरीक्षण कोण करते? या प्रश्नांची उत्तरे प्रशासनाने देणे आवश्यक आहे. उपजिल्हा रुग्णालयाला अधीक्षकच नाहीया प्रकरणाची माहिती घेण्यासाठी रुग्णासोबत उपजिल्हा रुग्णालयात गेल्यानंतर वैद्यकीय अधीक्षक आणि संबंधित डॉक्टर जागेवर नसल्याचा दावा करण्यात आला.नर्सिंग स्टाफकडे चौकशी केली असता संबंधित अधिकारी काही वेळापूर्वीच निघून गेल्याचे सांगण्यात आले.

त्यानंतर संबंधित डॉक्टरांशी मोबाईलवरून संपर्क साधण्यात आला.पुढे रुग्णालयातील अधिकाऱ्यांशी चर्चा करताना सध्या उपजिल्हा रुग्णालयात वैद्यकीय अधीक्षकाचे पद रिक्त असल्याची माहिती मिळाल्याचा दावा करण्यात आला आहे.यापूर्वी अतिरिक्त पदभार देण्यात आलेल्या अधिकाऱ्यांची बदली झाल्यानंतर नवीन पूर्णवेळ नियुक्ती झालेली नसल्याचे सांगण्यात आल्याने रुग्णालयाच्या प्रशासकीय कारभाराबाबत प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

# ऊसदरावर स्वाभिमानी आक्रमक पाच हजारांचा दर जाहीर केल्याशिवाय गाळप नको

### समर्थ कारखान्याला निवेदन पहिली उचल ४२०० रुपये मागील हंगामासाठी एफआरपी अधिक ३०० रुपयांची मागणी

घुंगर्डे हादगाव प्रतिनिधी

चालू गाळप हंगाम २०२६-२७ साठी ऊसाला प्रतिटन पाच हजार रुपये अंतिम दर जाहीर करावा आणि तो जाहीर केल्याशिवाय गाळप सुरू करू नये अशी मागणी स्वाभिमानी शेतकरी संघटनेने केली आहे. कर्मयोगी अंकुशराव टोपे समर्थ सहकारी साखर कारखान्याचे मार्गदर्शक तथा माजी मंत्री राजेश टोपे यांना संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी मंगळवारी ७ अंकुशनगर येथे निवेदन दिले.

चालू हंगामात राज्यात ऊसटंचाईची परिस्थिती निर्माण झाल्याने साखर उत्पादनावर परिणाम होण्याची शक्यता आहे. त्याचबरोबर साखरेला बाजारात मिळणारे दर लक्षात घेता शेतकऱ्यांना त्यांच्या उत्पादनाचा योग्य मोबदला मिळणे आवश्यक असल्याचे संघटनेने निवेदनात म्हटले आहे. त्यानुसार पहिली उचल प्रतिटन ४२०० रुपये



आणि अंतिम ऊसदर पाच हजार रुपये जाहीर करावा अशी मागणी करण्यात आली.

मागील हंगामासाठीही वाढीव दराची मागणी

मागील गाळप हंगामात कारखान्याला ऊस पुरवठा केलेल्या शेतकऱ्यांना एफआरपी अधिक ३०० रुपये प्रतिटन अंतिम दर देण्यात यावा अशी मागणीही करण्यात आली. उत्पादन खर्चात सातत्याने वाढ होत असताना केवळ एफआरपीच्या आधारे ऊसदर निश्चित करणे शेतकऱ्यांच्या हिताचे नाही असा दावा संघटनेने केला आहे.

साखर तसेच उपपदार्थांच्या बाजारमूल्यात होणाऱ्या वाढीचा योग्य हिस्सा ऊस उत्पादक शेतकऱ्यांना मिळणे आवश्यक आहे. त्यामुळे मागील हंगामातील ऊसासाठी एफआरपी अधिक ३०० रुपये देण्याचा निर्णय घ्यावा अशी मागणी जिल्हाध्यक्ष सुरेश काळे यांनी केली.

जालना जिल्ह्यातील शेतकरी दुष्काळसदृश परिस्थितीचा सामना करीत असल्याने कारखाना प्रशासनाने त्यांच्या अडचणींचा गांभीर्याने विचार करावा, अशी मागणी करण्यात आली. ऊसदर जाहीर केल्याशिवाय गाळप सुरू करू नये मागण्यांकडे दुर्लक्ष झाल्यास लोकशाही मार्गाने तीव्र आंदोलन छेडण्यात येईल असा इशारा संघटनेने दिला आहे.

यावेळी स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे जिल्हाध्यक्ष सुरेश काळे, अंबड तालुकाध्यक्ष राजेंद्र खटके आणि युवा नेते राहुल गढेकर उपस्थित होते.

१२ ऑक्टोबरच्या बैठकीपर्यंत गाळप थांबविण्याची मागणी

स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे संस्थापक अध्यक्ष तथा माजी खासदार राजू शेट्टी यांनी केंद्र सरकारकडे साखरेचा हमीभाव ५० रुपये प्रतिकिलो आणि सी-हेवी इथेनॉलचा दर ७० रुपये प्रतिलिटर करण्याची मागणी केली आहे. या मागण्यांसंदर्भात १२ ऑक्टोबर रोजी केंद्रीय सहकार मंत्री अमित शहा यांच्यासोबत बैठक होणार असल्याचे संघटनेने सांगितले. त्यामुळे या बैठकीपर्यंत कारखान्याचे गाळप सुरू करू नये अशी मागणीही निवेदनातून करण्यात आली आहे.

# माणूस बदलावा, समाज बदलावा हीच शिवाजीराव दादांची भूमिका-ह.भ.प. इंदुरीकर महाराज

## एकत्र रहा, आत्महत्या करू नका; हेच खरे शिवाजीराव दादांचे अभिष्टचिंतन

गेवराई (प्रतिनिधी) समाज बदलावा, माणसात परिवर्तन व्हावे, या भावनेतून शिवाजीराव पंडित परिवाराने अनेक वर्षांपासून भक्तीचा हा सोहळा सुरू ठेवला आहे. ८९ व्या वर्षीही शिवाजीराव पंडित यांचा अभिष्टचिंतन सोहळा कार्यकर्त्यांकडून भक्तिमय वातावरणात साजरा होत आहे, दादांनी गरिबांसाठी आणि सर्वसामान्यांसाठी केलेल्या कार्याची पावती आहे, असे प्रतिपादन सुप्रसिद्ध प्रसिद्ध कीर्तनकार प्रबोधनकार ह.भ.प. इंदुरीकर महाराज यांनी केले.यावेळी माजी मंत्री शिवाजीराव पंडित, माजी आमदार अमरसिंह पंडित, शिवशारदा पब्लिक स्कूलचे संस्थापक अध्यक्ष जयसिंग पंडित, युवा नेते पृथ्वीराज पंडित, शारदा स्पोर्ट्स अकॅडमीचे अध्यक्ष रणवीर पंडित यांच्यासह अभिष्टचिंतन सोहळा समितीचे सर्व पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

माजी शिवाजीराव (दादा) पंडित यांच्या वाढदिवसानिमित्त आयोजित श्रीराम कथा ज्ञानयज्ञ व कीर्तन महोत्सवाच्या पाचव्या दिवशी इंदुरीकर महाराज यांच्या कीर्तनाचे आयोजन करण्यात आले होते. त्यांच्या कीर्तनाला गेवराई शहरासह तालुक्यातील हजारो भाविक भक्तांनी रेकॉर्डब्रेक गर्दी केली. आपल्या खास शैलीत इंदुरीकर महाराज यांनी संत तुकाराम महाराजांच्या अभंगांचे निरूपण करताना उपस्थितांना चिमटे घेत मार्मिक भाष्य केले आणि समाजातील विविध प्रश्नांवर प्रबोधन केले. यावेळी बोलताना इंदुरीकर महाराज म्हणाले की, यायचे आणि जायचे आपल्या हातात नाही; मात्र कसे जगायचे हे आपल्या हातात आहे. प्रत्येक माणसाने धर्म पाळणे हीच खरी देवपूजा आहे. आज मायेचा तमाशा सुरू आहे. पैसा, संपत्ती आणि शरीर हे सर्व चंचल आहे. शरीर थकेल तेव्हा कोणीही आपल्या सोबत राहणार नाही. त्यामुळे वेळ असतानाच विचारपूर्वक जागे व्हा.



आपल्याकडे पैसा आणि संपत्ती असेल तर अनेक गोष्टी बदलता येतात; मात्र नशीब बदलता येत नाही, असे सांगत त्यांनी पालकांना आपल्या मुलांच्या भवितव्याबाबत जागरूक राहण्याचे आवाहन केले. आपली येणारी पिढी बरबाद होऊ नये, एवढे आपल्या लेकरांना शिकवा. आज बापाच्या आधी मुलाला अग्नी द्यावा लागतो, ही अत्यंत धक्कादायक बाब आहे. वेळीच लक्ष दिले नाही तर काळ आपल्याला माफ करणार नाही, असा इशाराही त्यांनी दिला.

मी महाराज म्हणून सांगत नाही, तर तुमचा माणूस, तुमचा भाऊ म्हणून सांगत आहे. माझ्या पाया पडा असे मी म्हणत नाही. माणसं बदलावी, समाज बदलावा, माणसांमध्ये परिवर्तन व्हावे, हीच माझी भूमिका आहे, असे स्पष्ट करत इंदुरीकर महाराज यांनी शिवाजीराव पंडित यांच्या कार्याचे कौतुक केले.पूर्वीचे राजकारण आणि कार्यकर्त्यांची निष्ठा यावर भाष्य करताना ते म्हणाले की, शिवाजीराव दादांच्या काळात कार्यकर्ते घरच्या भाकरी घेऊन आपल्या नेत्याने मोठे व्हावे, या भावनेने काम करीत होते. आज मात्र संधीसाधू कार्यकर्त्यांची नेत्यांच्या भोवती गर्दी वाढली आहे, अशी खंत त्यांनी व्यक्त केली.

दुष्काळ आणि शेतकरी आत्महत्यांवरही त्यांनी परखड भाष्य केले. दुष्काळावर आत्महत्या करणे हे औषध नाही. तडजोड करायला शिका, आत्महत्या करू नका. एकत्र राहायला शिका, भांडण-तंटे करू नका. आत्महत्या करू नका. झेडपीच्या शाळा वाचवा; हेच खरे शिवाजीराव दादांचे अभिष्टचिंतन असेल, असे आवाहन त्यांनी केले. शिवाजीराव पंडित परिवाराचे कौतुक करताना इंदुरीकर महाराज म्हणाले, शिवाजीराव पंडित परिवार भाग्यवंत आहे. कारण शिवाजी दादांच्या ८९ व्या वाढदिवसानिमित्त भजन आहे, संगीत आहे, कीर्तन आहे. हे खरे समाजविधायक काम आहे. हाच खरा पांडुरंगाचा प्रसाद आहे.

यावेळी इंदुरीकर महाराजांनी आपल्या खास विनोदी आणि मार्मिक शैलीत जोरदार फटकेबाजी करत उपस्थित भाविकांना हसवतानाच अंतर्मुख केले. त्यांच्या कीर्तनाला गेवराई शहरासह तालुक्यातील भाविक भक्तांची मोठी गर्दी झाली होती. कीर्तनासाठी महिला भाविकांना स्वतंत्र बसण्याची व्यवस्था करण्यात आली होती. शिवाजीराव पंडित परिवाराच्या पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी चोख नियोजन केले होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन माधव चाटे यांनी केले, तर उपस्थितांचे आभार मानण्यात आले.

# मोबाईल शॉपी फोडून चोरी करणारा आरोपी जेरबंद

परळी / प्रतिनिधी

मोबाईल दुकानाचा पत्रा कापून आत प्रवेश करत तब्बल १० लाख ३१ हजार ४२० रुपयांचे ७५ मोबाईल व इतर साहित्य चोरी करणाऱ्या आरोपीला संभाजीनगर परळी वैजनाथ पोलिसांनी परभणीतून अटक केली. तांत्रिक तपास, सुमारे २५० ते ३०० सीसीटीव्ही कॅमेऱ्यांची तपासणी आणि गोपनीय माहितीच्या आधारे पोलिसांनी ही कारवाई केली. दरम्यान, चौकशीत आरोपीने माजलगाव शहर पोलीस ठाण्याच्या हद्दीत घडविलेल्या आणखी एका चोरीच्या गुन्ह्याची कबुली दिल्याने तो गुन्हाही उघडकीस आला आहे.

परळी शहरातील एका मोबाईल शॉपीमध्ये अज्ञात चोरट्याने पत्रा कापून अनधिकृतपणे प्रवेश केला. दुकानात विक्री तसेच दुरुस्तीसाठी आलेले नवीन व जुने मोबाईल असा एकूण १० लाख ३१ हजार ४२० रुपयांचा मुद्देमाल चोरून नेण्यात आला होता. याप्रकरणी संभाजीनगर परळी वैजनाथ पोलीस ठाण्यात गुन्हा रजिस्टर क्रमांक २३८/२०२६, कलम ३०५, ३३१(३), ३३१(४) भा.न्या.सं. २०२३ अन्वये ४ ऑक्टोबर रोजी गुन्हा दाखल करण्यात आला होता.

घटनेचे गांभीर्य लक्षात घेऊन वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिसांनी




तपासासाठी विशेष पथक तयार केले. पथकाने परळी शहरातील विविध ठिकाणांसह परळी रेल्वे स्थानक ते परभणीदरम्यान सुमारे २५० ते ३०० सीसीटीव्ही कॅमेऱ्यांचे फुटेज तपासले. तांत्रिक माहिती आणि गोपनीय माहितीच्या आधारे चोरीमागे परभणी जिल्ह्यातील व्यक्तीचा सहभाग असल्याचे निष्पन्न झाले. त्यानंतर पोलिसांचे पथक परभणी येथे रवाना झाले. शोधमोहीम राबवून शाहरुख हमीद शेख (रा. सरफराज नगर, परभणी) याला ताब्यात घेण्यात आले. पोलिसांनी विश्वासात घेऊन चौकशी केली असता त्याने परळीतील मोबाईल शॉपी चोरीची कबुली दिल्याचे पोलिसांनी सांगितले. त्याला ५ ऑक्टोबर २०२६ रोजी अटक करण्यात आली.आरोपीकडून चोरीस गेलेले नवीन व जुने मिळून ७५ मोबाईल, किंमत १० लाख ३१ हजार ४२० रुपये, तसेच इतर मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. त्यामुळे चोरीचा मोठा मुद्देमाल अवघ्या काही दिवसांत हस्तगत करण्यात पोलिसांना यश आले.

दरम्यान, आरोपीची अधिक चौकशी केली असता त्याने माजलगाव शहर पोलीस ठाण्यात २५ ऑगस्ट २०२६ रोजी दाखल झालेल्या गुन्हा रजिस्टर क्रमांक २८०/२०२६ मधील चोरी केल्याची कबुली दिल्याचे पोलिसांनी सांगितले. त्यामुळे तपासादरम्यान माजलगावातील आणखी एक चोरीचा गुन्हा उघडकीस आला आहे. आरोपीला परळी येथील प्रथमवर्ग न्यायालयासमोर हजर केले असता न्यायालयाने ८ ऑक्टोबर २०२६ पर्यंत पोलीस कोठडी सुनावली आहे. पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक श्री. पुजरवाड करीत आहेत.ही कारवाई पोलीस अधीक्षक नवनीत कॉवत, अपर पोलीस अधीक्षक चेतना तिडके आणि सहाय्यक पोलीस अधीक्षक, अंबाजोगाई ऋषिकेश शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली संभाजीनगर परळी वैजनाथ पोलीस ठाण्याचे प्रभारी अधिकारी सपोनि. अनमोल केदार, पोउपनि. पुजरवाड, ग्रे. पोउपनि. नागरगोजे, पोलीस अंमलदार चव्हाण, घुगे, डोंगळे आणि ठोंबरे यांच्या पथकाने केली.

# गेवराईत ज्ञानेश्वरी पारायणास वाचकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद

माजीमंत्री शिवाजीराव पंडित यांच्या वाढदिवसानिमित्त विविध धार्मिक कार्यक्रमांची रेलचेल

गेवराई (प्रतिनिधी) गेवराई तालुक्याचे भाग्यविधाते तथा माजी मंत्री शिवाजीराव (दादा) पंडित यांच्या ८९ व्या वाढदिवसानिमित्त गेवराई शहरात सुरु असलेल्या श्रीराम कथेसह भव्य कीर्तन महोत्सवात विविध धार्मिक कार्यक्रमांची रेलचेल सुरु आहे.दरम्यान या सोहळ्यात ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायणाचे ह.भ.प.नामदेव महाराज शेकटेकर यांच्या नेतृत्वाखाली पारायण सुरु आहे. पारायणात शहरांसह तालुक्यातील शेकडो वाचक उस्फुर्तपणे सहभाग नोंदवून पवित्र ज्ञानेश्वरी ग्रंथाचे वाचन करत आहेत. संत ज्ञानेश्वर माऊलींच्या जयघोषाने परिसर भक्तीमय झाला आहे.



शहरातील शिवनगरी, र.भ.अट्टल कॉलेज, गेवराई येथे माजी मंत्री शिवाजीराव (दादा) पंडित यांच्या ८९ व्या वाढदिवसानिमित्त विविध धार्मिक कार्यक्रमांची रेलचेल सुरु आहे. या भव्य दिव्य सोहळ्यात शनिवार दि.३ ऑक्टोबर ते शुक्रवार दि.९ ऑक्टोबर २०२६ दरम्यान सकाळी ७ ते १० यावेळेत ह.भ.प.नामदेव महाराज शेकटेकर, ह.भ.प.भाऊसाहेब महाराज जोशी, ह.भ.प.राम महाराज अंबुले यांच्या प्रमुख उपस्थितीत ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायण सुरु आहे. ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायण सोहळ्याला भाविक आणि श्रोत्यांकडून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे. आध्यात्मिक वारसा जपणाऱ्या या सोहळ्यात ज्ञानेश्वरीच्या ओव्यांचे वाचन आणि श्रवणासाठी अबालवृद्धांची मोठी गर्दी होत आहे. शहरासह तालुक्यातील शेकडो भाविक एकत्र येऊन ज्ञानेश्वरीच्या अध्यायांचे पद्धतशीर पारायण करत आहेत. सोहळ्यात महिला आणि तरुणांची लक्षणीय उपस्थिती आहे. तर या सोहळ्याची शुक्रवार दि.९ ऑक्टोबर रोजी सांगता होणार आहे. तरी भाविकांनी जास्तीत जास्त संख्येने उपस्थित रहावे असे आवाहन अभिष्टचिंतन सोहळा समितीच्या वतीने करण्यात आले आहे.




# दादा नशीबवान, पण त्याहून आमचा शिवछत्र परिवार भाग्यवान –रणवीर पंडित

## रामकथेत वनवास प्रसंगाने भाविक गहिवरले

वराई (प्रतिनिधी)माजी मंत्री शिवाजीराव (दादा) पंडित यांच्या ८९ व्या वाढदिवसानिमित्त आयोजित श्रीराम कथा ज्ञानयज्ञ व भव्य कीर्तन महोत्सवाला आज शारदा स्पोर्ट्स अकॅडमीचे अध्यक्ष तथा शिवाजीराव पंडित यांचे नातू रणवीर पंडित यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी बोलताना त्यांनी आपल्या भावना व्यक्त करत शिवाजीराव ( दादा) पंडित यांच्या कार्यकर्त्यांशी असलेल्या जिव्हाळ्याच्या नात्याचा भावनिक उल्लेख केला.

रणवीर पंडित म्हणाले, आदरणीय शिवाजीराव (दादा ) म्हणजे माझे आजोबा. गेल्या पाच वर्षांपासून आमचे सर्व कार्यकर्ते एकत्र येऊन दादांचा वाढदिवस कीर्तन महोत्सवाच्या माध्यमातून साजरा करीत आहेत, याचा आम्हाला मनस्वी अभिमान आहे. यासाठी आम्ही खूप भाग्यवान आहोत. दादा नशीबवान आहेत आणि त्याहीपेक्षा आमचा शिवछत्र परिवार फार नशीबवान आहे की, असे जिवाभावाचे कार्यकर्ते आम्हाला लाभले. आमचे सर्व कार्यकर्ते आणि पदाधिकारी अतिशय प्रेम देणारे व जिवाभावाचे आहेत. त्यांच्या प्रेमापुढे मी आज नतमस्तक होतो. आजचा हा क्षण आमच्यासाठी भाग्याचा आहे, असेही रणवीर पंडित यांनी भावनिकपणे सांगितले.

वनवासाच्या प्रसंगाने रामकथा मंडप गहिवरला

दरम्यान, आजच्या रामकथेत रामायणाचार्य संजय महाराज पाचपोर यांनी प्रभू श्रीरामचंद्रांच्या वनवासाचा प्रसंग आपल्या अमोघ वाणीतून कथन केला. श्रीराम, सीता आणि लक्ष्मण यांच्या वनवासाचे प्रसंग उलगडताना त्यांनी केलेल्या भावपूर्ण निरूपणाने संपूर्ण रामकथा मंडप भावविवश झाला. उपस्थित भाविक भक्त मंत्रमुग्ध होऊन कथा ऐकत होते. कथेच्या समारोपानंतर गेवराई शहरातील पत्रकारांच्या हस्ते आरती करण्यात आली. यानंतर रणवीर पंडित यांनी आपली प्रतिक्रिया व्यक्त केली. संजय महाराज पाचपोर यांनी 'गोधन वाचवा' या विषयावर केलेले भाष्य आमच्या डोळ्यात पाणी आणून गेले, असे सांगत त्यांनी महाराजांच्या प्रबोधनात्मक निरूपणाचे कौतुक केले.

यावेळी माजी सभापती आरुण डाके, सखाराम पवार, रमेशलाल जाजू, संतोष गिल्डा, बाबासाहेब जाधव, कैलास गिल्डा, केदार जाधव यांच्यासह शिवाजीराव पंडित अभिष्टचिंतन सोहळा समितीचे पदाधिकारी, कार्यकर्ते व भाविक मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन माधव चाटे यांनी केले.

# जनजागृती सेवा संस्थेच्या सदस्यांची महिला मोफत प्रशिक्षण शिबिराला भेट आणि मार्गदर्शन

बदलापूर(प्रतिनिधी-गुरुनाथ तिरपणकर)

जनजागृती सेवा संस्थेच्या ग्रुप सदस्यांनी कुळगाव बदलापूर नगरपरिषद आणि ॐग्रामण्ये इन्स्टिट्यूट ऑफ एज्युकेशनल एक्सलेन्स यांच्या संयुक्त विद्यमाने मोफत महिला शिबिराला भेट देऊन माहिती जाणून घेतली.

महिला नेहमीच कुटुंबासाठी पुढाकार घेवून झटत असतात, पुरुषांची मक्तेदारी असलेली सगळी क्षेत्रे महिलांनी काबीज केली आहेत. पुरुषांपेक्षा महिला जास्त कार्यक्षम आहेत. पुरुषांच्या तुलनेत जास्त काम करतात आणि त्यांचा मान सन्मान त्यांना मिळाला पाहिजे असे मत जनजागृती सेवा संस्थेचे जेष्ठ सल्लागार आणि समता साहित्य अकादमीचे महाराष्ट्र अध्यक्ष श्रीयुत दिलीप नारकर यांनी केले.

उमेश बहुउद्देशीय सामाजिक संस्थेचे अध्यक्ष श्रीयुत सुहास सावंत यांनी महिलांना डिजिटल माध्यमे आणि सोशल एप्सचा वापर करून आपला व्यवसाय वेगळ्या ऊंचीवर घेवून जाण्याबाबत मार्गदर्शन केले. आपल्या इच्छेला दिशा देऊन,नवनव्या गोष्टी आणि व्यवसायातील गमके समजून घेवून, हें प्रशिक्षण घेवून पुढे आपण आपल्या व्यवसायाची प्रगती कशी करू शकतो याचा विचार करणे आणि आपल्या इच्छेला दिशा देऊन नवीन गोष्ट शिकण्याची तयारी ठेवून आणि हे प्रशिक्षण घेतल्यानंतर आपण पुढे काय करु शकतो ?याचा विचार करण हीच खरी प्रगतीतीची सुरुवात आहे.असे मत सोहम इको सोल्युशनच्या संस्थापिका सौ. रोहिणी शिंदे यांनी मांडले.



याप्रसंगी शिवण कामातील विविध प्रकार यासंदर्भात शिक्षिका राणी सचिन भंडारे, मिनाक्षी शदर वाघमारे, ज्योती सागवेकर यांनी बेसिक माहिती सांगितली.तसेच यावेळी जनजागृती ग्रुप सदस्या(संचालिका-सोहम इको सोलुनशन, घनकचरा व्यवस्थापन समुपदेशिका)रोहिणी प्रशांत शिंदे मॅडम यांनी महिलांना शिवणकाम त्यातील बारकावे अशी विविधांगी सविस्तर उपयुक्त माहिती त्यांनी महिलांना दिली.त्याच प्रमाणे जनजागृती सदस्य दिलीप नारकर(अध्यक्ष-समता साहित्य अकादमी महाराष्ट्र), जनजागृती ग्रुप सदस्य सुहास सावंत(अध्यक्ष-उमेद बहुउद्देशीय सामाजिक संस्था), जनजागृती ग्रुप सदस्य राजेंद्र नरसाळे(सचिव-सिटीझन वेल्फेअर असोसिएशन, बदलापूर) यांनीही मार्गदर्शन केले.कार्यक्रमाचे प्रास्ताविक व आभारप्रदर्शन संस्थेचे अध्यक्ष गुरुनाथ तिरपणकर यांनी केले.हा उपक्रम यशस्वी करण्यासाठी ॐग्रामण्ये इन्स्टिट्यूट ऑफ एज्युकेशनल एक्सलेन्सचे डायरेक्टर शिवराम चव्हाण सर, प्रकल्प अधिकारी प्रविण कुंभार सर यांचे मार्गदर्शन लाभले.विशेष म्हणजे कुळगाव बदलापूर नगरपरिषद आयोजित महिला बालकल्याण योजनेअंतर्गत मोफत महिला प्रशिक्षण शिबीरासाठी नगरसेवक किरण भोईर यांच्या विशेष मार्गदर्शन व सहकार्याने हे मोफत महिला प्रशिक्षण शिबीर आनंद दिघे भाजी मार्केट,सहकार हॉटेलच्या मागे, बदलापूर पश्चिम येथे सुरु आहे.या मोफत महिला प्रशिक्षणासाठी महिला व बाल कल्याण अधीक्षक मा.श्रीकांत निकुळे याचे बहुमोल सहकार्य लाभत आहे.